मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

**मुंबई कार्यालय**
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

**पालघर कार्यालय**
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५

**नाशिक कार्यालय**
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

**वितरण**
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक | PRGI Reg. No.MHMAR/25/A0219 | शनिवार, २१ जून २०२५ | वर्ष: १ | अंक:२४ | पाने-८ | किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३


## धनंजय मुंडेंना उच्च न्यायालयाचा दणका

**मुंबई , दि. २० प्रतिनिधी**

माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी वांद्रे येथील कुटुंब न्यायालयाने करुणा मुंडे यांना पोटगी पोटी देण्यात येणाऱ्या २ लाख रुपये रकमेच्या विरोधात उच्च न्यायालयात दाखल याचिकेवर सुनावणी प्रकरणात धनंजय मुंडे यांनाच उच्च न्यायालयाने दणका दिल्याचे पाहायला मिळत आहे. वांद्रे दंडाधिकारी न्यायालयाने काही दिवसांपूर्वी करुणा शर्मा या पोटगीस पात्र असल्याचे मान्य करत त्यांना दरमहा १ लाख २५ हजार रुपये देण्याचे आदेश दिले होते. यालाच धनंजय मुंडे यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले आणि यावर उच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे यांच्या एकलपीठापुढे सुनावणी पार पडली आणि न्यायमूर्ती यांनी धनंजय मुंडे यांनाच दणका दिला. ऑगस्ट २०२२ ते जून २०२५ या ३५ महिन्यांच्या कालावधीची एकूण रक्कम ४३ लाख ७५ हजार इतकी आहे. यातील २१, ८७,५०० रुपये ही ५० टक्के रक्कम वांद्रे न्यायालयात पुढील ४आठवड्यांत जमा करा. तसेच करूना मुंडे यांची मुलगी हिच्यासाठी असलेली पोटगीची रक्कम १००टक्के कोर्टात जमा करा. या याचिकेवर ८ आठवड्यांनी अंतिम निर्णय देऊ, असे कोर्टाने म्हटले आहे.

# मनसेसोबत युतीसाठी सकारात्मक

### स्थानिक पातळीवर आढावा घ्या, महिनाभरात अहवाल द्या

### उद्धव ठाकरेंच्या जिल्हाप्रमुखांना सूचना

**मुंबई , दि. २० प्रतिनिधी**

आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांनी जिल्हाप्रमुख आणि संपर्कप्रमुख नेत्यांची बैठक घेतली. राज्यभरात स्थानिक पातळीवर युती, आघाडी करण्यासंदर्भात आढावा घेण्याच्या सूचना दिल्या. जर युती, आघाडी झाली नाही तर सर्व जागांवर पक्ष म्हणून लढण्यास तयार राहण्याच्या सूचना उद्धव ठाकरे यांनी दिल्या. महिन्याभरात हा अहवाल जिल्हाप्रमुख संपर्कप्रमुख यांनी द्यायचा आहे.

मनसेसोबत युतीसाठी आपण सकारात्मक आहोत. मात्र स्थानिक पातळीवर युती, आघाडी संदर्भात आढावा घेऊन माहिती द्या अशा सूचना उद्धव ठाकरे यांनी जिल्हाप्रमुखांना दिल्या. स्थानिक पातळीवर कुठे आघाडी, युती करायची याचा निर्णय पक्ष घेईल.

मतदार याद्यांचा अभ्यास करा, लोकसभेनंतर विधानसभा निवडणुकीत मतदार कसे वाढले? कुठे वाढले? बोगस मतदार शोधा? गटप्रमुखांनी 40 लाख मतदार कसे वाढले हे तपासा, मतदार याद्यांच्या घोळाबाबत माहिती समोर आणा अशा सूचना उद्धव ठाकरेंनी दिल्या.



राज ठाकरेंना सोबत घेण्यासाठी उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदेंमध्ये रस्सीखेच असल्याचं चित्र आहे. मनपात आकड्यांचे गणित जुळवण्यासाठी उद्धवना राज महत्त्वाचे वाटतात. तर आपली विश्वासार्हता वाढवण्यासाठी शिंदेंना हवा ठाकरे ब्रँड. त्यामुळे दोघांमध्येही राज ठाकरे सोबत यावेत यासाठी प्रयत्न सुरू आहे. जे राज्याला हवंय ते करणारच, असं स्पष्ट करत उद्धव ठाकरेंनी वर्धापनदिनाच्या मेळाव्यात मनसेशी युती करण्यासाठी सकारात्मक असल्याचे संकेत दिले.

त्यावर एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरे युतीसाठी लाचार झाल्याची टीका केली. पण शिंदेंनीसुद्धा राज ठाकरेंना आपल्यासोबत घेण्यासाठी पडद्यामागून हालचाली सुरू केल्याचं समजतंय.

ठाकरे आणि शिंदेंमधला संघर्ष आमदार, खासदार, नगरसेवक, पक्ष, चिन्ह यानंतर आता महापालिकेच्या सत्तेसाठी राज ठाकरेंना आपल्या गोटात ओढण्यापर्यंत पोहोचला आहे. सध्याची अवस्था बघता मुंबई महापालिकेत आकड्यांचं गणित जुळवण्यासाठी उद्धव ठाकरेंना राज ठाकरे हवे आहेत. तर ठाकरे आपल्यासोबत आहेत, हे दाखवत मराठी मतदारांमध्ये आपली विश्वासार्हता वाढवण्यासाठी शिंदेंनाही राज ठाकरे सोबत हवे आहेत. त्यामुळे आता राज ठाकरे टाळी कुणाला देणार, ते पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

## अग्राग्रलेख खरीखरी

### परिवहनातील महाखड्डे

केंद्रीय परिवहन मंत्रालयाने काही महत्त्वाचे निर्णय घेतलेले आहेत. त्यामध्ये दुचाकी वाहनधारकांसाठी जानेवारी २०२६ पासून दोन हेल्मेट असणे सक्तीचे करण्यात आलेले आहे. केंद्रीय परिवहन मंत्रालय सध्या नितीनजी गडकरी यांच्या ताब्यात आहे. ते जीव तोडून सर्वांच्याच जिवाचे रक्षण करावे. म्हणून प्रयत्नशील असतात. आपल्या भारतात मोठा प्रश्न हा आहे की, केवळ २० ते २५ टक्के वाहनधारकच नियमांचे पालन करतात. बाकी वाहनधारक आणि चालकांच्या बाबत सगळा आनंदी आनंद आहे. मात्र जोपर्यंत आपल्या वाहन चालकांची ही मानसिकता बदलत नाही. तोपर्यंत आपल्या देशात आपण कितीही कायदे आणले, काहीही सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. तरी त्याचा फारसा परिणाम होईल असे वाटत नाही. आम्ही नेहमी सकारात्मक विचार करतो. पण काही बाबी अशा आहेत की, त्याच्यावर आपल्या महान भारतात तरी कधी सुधारणा होतील, असे वाटत नाही. आपल्या देशातील अपघातात सर्वात जास्त अपघात दुचाकी वाहनांचे असतात. या अपघातांची कारणेही तुम्हा आम्हाला ठाऊक आहेत. आपल्या येथे दुचाकीवर दोन लोकांना बसण्याची कायदेशीर परवानगी आहे. आतापर्यंत फक्त चालकाच्या डोक्याला हेल्मेटचे बंधन होते. आता नव्या कायद्याप्रमाणे मागे बसणाऱ्यालाही हेल्मेट घालावे लागेल. या हेल्मेटचीही मोठीच गंमत आहे. अनेक शहाणे हेल्मेट एवजी साधी प्लास्टिकची टोपी वापरतात. त्यामुळे धड डोकेही झाकले जात नाही. विशेष म्हणजे अशा डुप्लिकेट आणि तथाकथित हेल्मेटवर अजूनही गंभीरपणे कोणतीही कारवाई होत नाही. म्हणजेच यापुढे हेल्मेट सारखेच हेल्मेट असावे. ते मजबूत असावे. आयएसआय मार्क असावे, हा महत्त्वाचा संदेश वाहन चालकांच्या डोक्यात बसला पाहिजे. दुसरी बाब म्हणजे आपले दीड शहाणे वाहनचालक दोन एवजी, गाडीवर किमान तिघांना तरी सर्रासपणे बसवतात. काही बहाद्दर तर चार ते साडेचार जणांना बसवून तुफान वेगाने गाडी दामटवतात. यामुळे अपघाताची शक्यता कित्येक पटीने वाढते. यापुढचा मुद्दा सिग्नल तोडणाऱ्या गाढवांचा आहे. आपल्याला समोर जायचे आहे. सिग्नल वर लाल बत्ती दिसत आहे. तरी आजूबाजूला पाहून किंवा दुर्लक्ष करून कितीतरी सिग्नलतोडू गाढव सम्राट आपल्या गाड्या बिनदिक्कतपणे पुढे घुसवत असतात. ही गोष्ट जशी आपली जनसंख्या आटोक्यात येत नाही तशीच आटोक्यात न येणारी आहे. या पुढची गोष्ट म्हणजे आता आपल्या देशात अनेक ठिकाणी रस्त्याची दोन भागात विभागणी करणारे द्विभाजक बसवलेले आहेत. त्यामुळे एका बाजूने जाणे आणि दुसऱ्या बाजूने येणे अपेक्षित असते. सुरक्षिततेच्या दृष्टीने ही गोष्ट कितीही महत्त्वाची असली. तरी तशी सवय अजून तरी आपल्या वाहनधारकांना लागलेली नाही. उलट दिशेने वाहन चालवणे, हा आपला जन्मसिद्ध अधिकार आहे. अशा तोऱ्यात वाहन चालवणाऱ्यांचे दररोज हजारोंनी अपघात होतात. त्याला आळा कसा बसेल, हा सुद्धा आपल्या समोरील यक्षप्रश्न आहे. यापुढचा मोठा विषय म्हणजे आपले मोबाईलप्रेम, कान आणि खांदा यांच्यामध्ये मोबाईल दाबून सडकेकडे तिरका डोळा करून वाहन चालवणारे मोबाईलप्रेमी वेगबहाद्दर आपण काही गुन्हा करीत आहोत. असे समजतच नाहीत. याशिवाय महत्त्वाचे म्हणजे कोणतेही कारण नसताना निव्वळ उन्माद म्हणून तुफान वेगाने गाडी चालवणे. हे अपघातांचे सर्वात मोठे कारण आहे. गर्दीच्या ठिकाणी उलटसुलट गाडी चालवून स्वतःबरोबर इतरांचाही जीव धोक्यात घालणारेही कमी नाहीत. एक खास गोष्ट तर आम्ही विसरलोच. ती म्हणजे अनेक वीर बहाद्दर घरून किंवा बारमधून मस्तपैकी झिंगून रस्त्यावर बेदरकारपणे वाहन चालवण्याच्या नादात निरपराध लोकांना मारतात आणि स्वतःही मरतात. आमच्या डोक्यात जे जे धोके शिरलेले आहेत. ते ते या खरीखरी मध्ये सांगण्याचा हा आमचा खराखुरा प्रयत्न आहे. आता यावर काय उपाय, तर भारतातील जी काही पोलीस ठाणी आहेत. तेथील सर्व पोलिसांना केवळ वाहतूक संचालनाचे काम देण्यात आले. तरच या बाबी बंद होऊ शकतील. मात्र पोलिसांची इतर सर्व कामे बंद ठेवता येतील काय. कोणत्याही शहरातील पोलिसांच्या वाहतूक शाखेत आवश्यक तेवढे मनुष्यबळ उपलब्ध राहत नाही. जे काही उपस्थित असतात. त्यापैकी ६० ते ७० टक्के पोलीस अगदी इमानदारीने काम करतात. इतर पोलीस चक्क डोळे उघडे ठेवून झोपा काढत असतात. त्यामुळे केंद्रीय परिवहन मंत्रालयाने हेल्मेट बाबत काढलेल्या आदेशानंतर वरील सर्व बाबींचा गंभीरपणे विचार करून, जो कोणी नियम तोडणार असेल. त्याच्यावर कठोरात कठोर कारवाई करणे हाच एकमात्र उपाय ठरणार आहे. त्यामध्ये पहिल्यांदा दंड, दुसऱ्यांदा जादा दंड आणि तिसऱ्यांदा परवाना स्थगिती एवढे कठोर झाल्याशिवाय शिस्त लागेल, असे दिसत नाही. आपल्या परिवहन यंत्रणेत शिस्त आणण्यासाठी परिवहनातील हे महाखड्डे बुजवण्याचे काम करणे अत्यंत गरजेचे आहे. आपल्या देशातील जुगाडू नागरिकांचा अनुभव पाहता, हे शिवधनुष्य पेलणे किती कर्मकठीण आहे. याची प्रचिति येईल. अपघात वीरांना नमन असो!



nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023


# सहकारच ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आधार - अमित शाहांचे प्रतिपादन

### जीडीपीपेक्षा रोजगारनिर्मिती महत्त्वाची

**मुंबई, दि. २० प्रतिनिधी**

केंद्रीय गृहमंत्री आणि सहकार मंत्री अमित शाह यांनी शुक्रवारी स्पष्टपणे सांगितले की भारताचा विकास केवळ जीडीपीवर अवलंबून असू शकत नाही, तर रोजगारनिर्मिती हा देखील महत्त्वाचे घटक आहे, तसेच सहकारच ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आधार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जी पावले उचलली आहेत, त्यामुळे देशभरात सहकार क्षेत्राचा समतोल विकास होईल आणि त्याचा अर्थव्यवस्थेला मोठा आधार मिळेल. आपला देश फक्त जीडीपीवर वाढू शकत नाही. १३० ते १४० कोटी लोकसंख्या असलेल्या देशात जीडीपी निश्चितच झपाट्याने वाढेल, पण प्रत्येकाला रोजगारही मिळायला हवा. ग्रामीण महिलांना आणि युवकांना जर रोजगार मिळवून द्यायचा असेल, तर सहकार हेच एकमेव माध्यम आहे जे त्यांना रोजगाराच्या संधींशी जोडते," असे शाह म्हणाले. ते नाफेडने आयोजित केलेल्या राष्ट्रीय परिषदेच्या वेळी बोलत होते. २०२५ हे 'आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष' म्हणून साजरे करण्यात येत आहे, त्या निमित्ताने ही परिषद आयोजित करण्यात आली होती.




शाह यांनी सांगितले की देशाच्या उत्तर आणि पूर्व भागात सहकार क्षेत्र कमकुवत झाले होते आणि पुढील काळात समान विकास साधण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

"सहकार क्षेत्राचा असमतोल विकास बदलून सममित वाढ साधण्यासाठी आम्ही आधीच काही पावले उचलली आहेत. उत्तरेकडील आणि पूर्वेकडील भागात सहकारी चळवळ कमकुवत झाली होती आणि ती मुख्यत्वेकरून पश्चिम भारतात स्थिर होती... सहकार क्षेत्र कमी भांडवलात अधिक नफा देत अर्थव्यवस्थेचा विकास घडवून आणते. आम्ही सहकार क्षेत्रात ऐतिहासिक वाढ घडवून आणू असेही शाह यांनी स्पष्ट केले.

## बोल बच्चन भैरवी असणाऱ्यांना मी उत्तर देत नाही!

### फडणवीसांचे उद्धव ठाकरेंना प्रत्युत्तर

**मुंबई, दि. २० प्रतिनिधी**

"बोल बच्चन भैरवी असणाऱ्यांना मी उत्तरे देत नाही", अशा ठाम शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांच्या टीकेला एका वाक्यात सडेतोड उत्तर दिलं. राज ठाकरे आणि फडणवीस यांच्या भेटीवरून उद्धव ठाकरेंनी केलेल्या टोलेबाज वक्तव्यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी अत्यंत नेमकं प्रत्युत्तर देत टीकाकारांना गप्प केलं आहे.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वर्धापन दिन कार्यक्रमात उद्धव ठाकरे यांनी नाव न घेता भाजप आणि राज ठाकरे यांच्यावर टीकेची झोड उठवली. "मराठी माणसाची एकजूट होऊ नये म्हणून यांच्या मालकाचे नोकर इकडेतिकडे गाठीभेटी घेत आहेत," असा टोलाही त्यांनी लगावला. त्यांच्या या वक्तव्याने राजकीय वातावरणात चांगलाच धुरळा उडाला.



मात्र, फडणवीस यांनी कोणतीही टीका-प्रतिटिका न करता, एका वाक्यात अत्यंत सडेतोड आणि राजकीय चातुर्य दाखवत उत्तर दिलं. "बोल बच्चन भैरवी असणाऱ्यांना मी उत्तरे देत नाही!" असा शब्दांत त्यांनी उद्धव ठाकरे यांचा उल्लेख टाळत सणसणीत प्रत्युत्तर दिले.

मुख्यमंत्री फडणवीस जळगाव दौऱ्यावर असताना माध्यमांशी बोलत होते. धरणगाव येथे क्रांतिकारी खाज्याजी नाईक यांच्या स्मारक व संग्रहालयाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी आदिवासी स्वातंत्र्यसैनिकांच्या योगदानाची आठवण करून दिली. "पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात आदिवासी वीरांच्या गौरवासाठी वेगवेगळे कार्यक्रम राबवले जात आहेत. खाज्याजी नाईक यांच्या स्मारकाच्या भूमीपूजनापासून ते उद्घाटनापर्यंतची जबाबदारी मला मिळाली, ही माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे," असंही त्यांनी नमूद केलं.

राजकीय कटाक्ष आणि प्रतिउत्तरांच्या या खेळीने आगामी निवडणुकांचे पारडे जड करण्याचा दोन्ही गटांचा प्रयत्न असल्याचं स्पष्ट होत आहे.

## मुख्यमंत्र्यांच्या ताफ्यात घुसून ठेकेदाराचा आत्मदहनाचा प्रयत्न




**जळगाव, दि. २० प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जळगाव दौऱ्यात शुक्रवार रोजी सकाळी धक्कादायक प्रकार घडला. धरणगाव येथे ख्वाजाजी नाईक यांच्या स्मारकाच्या अनावरणासाठी मुख्यमंत्री जात असताना, आकाशवाणी चौकात एका व्यक्तीने अंगावर रॉकेल टाकून जीवनयात्रा संपवण्याचा प्रयत्न केला. यामुळे पोलिस बंदोबस्ताच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे.

मुख्यमंत्री फडणवीस हे शुक्रवार रोजी जळगाव येथे, 'उपजिल्हा रुग्णालयाच्या मुख्य व निवासस्थान इमारतीच्या भूमिपूजन आणि क्रांतिकारी खाज्याजी नाईक स्मारकाच्या उदघाटन कार्यक्रमा'साठी आले होते. तसेच धरणगाव व जामनेर तालुक्यातील गोद्री येथे विविध कार्यक्रमांसाठी आले असताना सकाळी १० वाजताच्या सुमारास जळगाव शहरातील आकाशवाणी चौकात त्यांच्या ताफ्याचा मार्गात संजय वराडे नावाच्या एका व्यक्तीने ताफ्यासमोर येत अंगावर रॉकेल ओतून जीवनयात्रा संपवण्याचा प्रयत्न केला. प्राथमिक माहितीनुसार, संबंधित व्यक्ती हा ठेकेदार असून शासनाकडून प्रलंबित असलेल्या थकबाकीपोटी त्याने हे टोकाचे पाऊल उचलले. पोलिसांनी तत्काळ प्रसंगावधान राखत त्याला ताब्यात घेतल्यामुळे मोठा अनर्थ टळला. मात्र, मुख्यमंत्री यांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून हा प्रकार अत्यंत गंभीर मानला जात असून, पोलीस यंत्रणा किती गाफील होती?, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. या प्रकारानंतर संबंधित सुरक्षा अधिकाऱ्यांची तातडीने हजेरी घेण्यात आली असून, पुढील चौकशी सुरू आहे. मुख्यमंत्र्यांच्या ताफ्यासमोर असा प्रकार घडणे ही गंभीर चूक मानली जात असून, याप्रकरणी वरिष्ठ पातळीवरून कारवाई होण्याची शक्यता आहे.

## नवीन सर्व दुचाकींना 'एबीएस' आणि दोन हेल्मेट सक्तीचे; केंद्रीय परिवहन मंत्रालयाचा मोठा निर्णय

**नवी दिल्ली, दि. २० वृत्तसंस्था**

रस्ते अपघात नियंत्रणात आणण्यासाठी केंद्रीय परिवहन मंत्रालयाने आणखी एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. १ जानेवारी २०२६ पासून बाजारात येणाऱ्या नवीन दुचाकींसाठी (स्कूटर आणि मोटारसायकल) एबीएस (ॲण्टी लॉक ब्रेकिंग सिस्टिम) सक्तीचे करण्याच्या निर्णयाला मंजुरी देण्यात आली आहे. त्याचबरोबर नवीन दुचाकी दोन हेल्मेटही अनिवार्य करण्यात आले आहेत.

केंद्रीय परिवहन आणि महामार्ग मंत्रालयाने या निर्णयाची घोषणा केली आहे. वाढते रस्ते अपघात, त्यातून होणारे मृत्यू याला आळा घालण्यासाठी केंद्रीय मंत्रालयाने हा निर्णय घेतला आहे.

सध्या एबीएस १२५ सीसी इंजिन क्षमता असलेल्या दुचाकींसाठीच सक्तीचे हे. म्हणजे सध्या देशातील अंदाजे ४० टक्के दुचाकींना एबीएस सुरक्षा प्रणाली नाहीये. पण, आता सर्वच



प्रकारच्या इंजिन असलेल्या दुचाकींसाठी हे सक्तीचे करण्यात आले आहे. एबीएस हे वाहनांमध्ये वापरले जाणारे नव तंत्रज्ञान आहे. एबीएस हे एक प्रकारची सुरक्षा प्रणाली आहे, जी वाहनाच्या ब्रेक सिस्टममध्ये वापरली जाते.

एबीएस वाहनाच्या ब्रेक प्रणालीमध्ये वापरण्याचा मुख्य उद्देश म्हणजे अचानक वाहनाचा ब्रेक दाबल्यावर त्याची चाके लॉक होऊ नयेत. अचानक ब्रेक लावल्यानंतर वाहनांचे संतुलन बिघडते. त्यामुळे वाहनावर नियंत्रण राहत नाही. ते टाळण्यासाठी आणि वाहन घसरू होऊ नये याची मदत होते.

एबीएसमुळे ब्रेक लावल्यानंतरही चाकं लॉक न होता फिरत राहतात. तसेच रस्ता ओलसर किंवा घसरट असतानाही वाहनावर नियंत्रण ठेवता येते. त्यामुळे वाहन अपघाग्रस्त होण्यापासून टाळता येते.

जेव्हा अचानक ब्रेक लावला जातो, तेव्हा दुचाकीचे संतुलन बिघडले. पण, एबीएस असेल, तर दुचाकी अनियंत्रित होण्यापासून वा, घसरण्याचा धोका कमी असतो. एका अभ्यासात असे आढळून आले आहे की, एबीएसमुळे दुचाकींचा अपघात होण्याचा धोका ३४ ते ४० टक्क्यांनी कमी होऊ शकतो.

**दोन हेल्मेट हवेच**

केंद्र सरकारकडून एबीएस बरोबरच नवीन दुचाकी देताना दोन बीआयएस प्रामाणित हेल्मेट देणे अनिवार्य केले जाणार आहे. सध्या एकच हेल्मेट देणे सक्तीचे आहे. भारतात रस्ते अपघातात होणाऱ्या मृत्यूंपैकी ४४ टक्के मृत्यू हे दुचाकी वापरणाऱ्याचे होत आहेत. बहुतांश वेळा मृत्यू डोक्याला मार लागल्याने होत आहेत. त्यामुळे सरकारकडून या निर्णयाला मंजुरी देण्यात आली आहे.

## चंद्रभागेत बुडून भाविकाचा मृत्यू

**पंढरपूर, दि. २० प्रतिनिधी**

आषाढी वारीच्या तोंडावर चंद्रभागेत बुडून भाविकाचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. शुभम ज्ञानेश्वर पावले (२७) असे चंद्रभागेत बुडून मृत्यू पावलेल्या युवकाचे नाव आहे. चंद्रभागेत पाण्याचा अंदाज न आल्याने युवकाचा बुडून मृत्यू झाला आहे. तीन तासाचा शोधकार्यानंतर शुभमचा मृतदेह चंद्रभागेत सापडला. विठ्ठलाच्या भेटीसाठी निघालेल्या भाविकाचा असा मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या प्रस्थानावेळी आळंदी येथे इंद्रायणीला पूर आला. अशीच परिस्थिती आता पंढरपूरच्या आषाढी वारीवर येऊन ठेपली आहे. उजनी धरण हे पुणे जिल्ह्यातील पावसाने झपाट्याने वाढत आहे. अशा परिस्थितीत पुढील २४ तासात भीमा नदीत धरणातून पाणी सोडले जाऊ शकते. पंढरपुरात ४० हजार क्युसेक्स इतका पाणीसाठा आला तरी चंद्रभागेचे संपूर्ण पात्र पाण्याने व्यापते. अशा परिस्थीतीत प्रशासनाला आषाढी वारीचे नियोजन करावे लागणार आहे.

## मनसेत संघटनात्मक मोठे बदल होणार

### काम न करणाऱ्यांना नारळ

**मुंबई, दि. २० प्रतिनिधी**

मुंबई महापालिका निवडणुकीआधी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे युती करतील की नाही यासंदर्भात वेगवेगळे अंदाज लावले जात आहे. दोन्ही नेत्यांनी याबाबत सकारात्मकता दर्शवली असली तरी त्यावर अधिकृत भाष्य केलं नाही. मुंबई महापालिकेवर उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचं वर्चस्व असून, राज ठाकरेंसोबत युती केल्यास जागावाटप कसं करावं याचा तिढा निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यातच आता राज ठाकरेंनी पालिका निवडणुकीच्या दृष्टीकोनातून तयारी सुरु केली आहे. काम न करणाऱ्यांना थेट पक्षातून काढून टाकण्याचा आदेश त्यांनी दिला आहे.



मनसेकडून मुंबईत संघटनेत मोठे फेरबदल होणार आहेत. काम न करणाऱ्या विभाग अध्यक्षांना तसंच शाखाध्यक्षांना नारळ देण्यात येण्याची शक्यता आहे. २५ जूनला याबाबतीत सविस्तर अहवाल राज ठाकरेंना देण्यात येणार आहे. जुलैच्या पहिल्या आठवड्यात फेरबदल आणि नवीन नेमणूका जाहीर होतील.

मुंबई महापालिकेच्या दृष्टीने राज ठाकरे आक्रमक झाले आहेत. काम न करणाऱ्यांना काढून टाका व तात्काळ पर्यायासह २४ जूनला अहवाल सादर करा असा आदेश त्यांनी केंद्रीय समित्यांना दिला आहे. मनसेत अनेक विभागात पर्याय शोधणे सुरू आहे.

## कांकेरमध्ये चकमकीत महिला नक्षलवादी ठार

**रायपूर, दि. २० वृत्तसंस्था**

छत्तीसगड राज्यातील कांकेर जिल्ह्यात पोलीस आणि नक्षलवाद्यांमध्ये आज सकाळपासून जोरदार चकमक सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. जिल्ह्यातील छोटेबेटिया पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही धुमश्चक्री सुरू असून, यामध्ये आतापर्यंत एका महिला नक्षलवाद्याला ठार करण्यात पोलिसांना यश आले आहे.

कांकेर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक आय.के. एलिसेला यांनी या वृत्ताला दुजोरा दिला आहे. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, नक्षलवाद्यांसोबतची चकमक अजूनही सुरू आहे. मात्र, घटनास्थळी असलेल्या पोलीस पथकाशी सध्या संपर्क होऊ शकलेला नाही. त्यामुळे या कारवाईबाबत अधिक तपशील तात्काळ उपलब्ध होऊ शकलेला नाही, असेही एलिसेला यांनी स्पष्ट केले आहे. संपर्क प्रस्थापित होताच अधिक माहिती दिली जाईल असेही ते म्हणाले. या घटनेमुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, पोलीस दल सतर्क झाले आहे.

## मुख्यमंत्र्यांशी भेट झाली नसल्याची खंत नाही - खडसे

**जळगाव, दि. २० प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे शुक्रवारी क्रांतीवीर खाज्याजी नाईक यांच्या स्मारकाच्या अनावरणाप्रसंगी जळगाव जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. यावेळी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे आणि देवेंद्र फडणवीस यांची भेट होण्याची शक्यता वर्तविली जात होती. क्रांतीवीर खाज्याजी नाईक स्मारक अनावरणाच्या कार्यक्रमाला एकनाथ खडसे दाखल झाले. मात्र, देवेंद्र फडणवीस यांच्याशी त्यांची भेट झाली नाही. आता यावर एकनाथ खडसे यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे.

एकनाथ खडसे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत माझी भेट होणार होती, हे खरं नाही. कार्यक्रमाच्या निमित्ताने मी या कार्यक्रमाला उपस्थित राहिलो. औपचारिकरित्या जर भेट झाली तर भेट घेईल, असा माझा प्रयत्न होता. हा कार्यक्रम शासकीय नव्हता हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा कार्यक्रम होता. या कार्यक्रमात राजकीय चर्चा होईल, अशी अपेक्षा नव्हती. मी कार्यक्रमाला उपस्थित होतो व या कार्यक्रमाला मला आग्रहपूर्वक बोलवण्यात आले होते, असे त्यांनी म्हटले. आपण व्यासपीठावर न जाता व्हीआयपी कक्षात बसला, याबाबत विचारले असता एकनाथ खडसे म्हणाले की, सर्वांना



व्यासपीठावर स्थान द्यावं, अशी अपेक्षा नव्हती. मोजक्यात लोकांना व्यासपीठावर स्थान देण्यात आले. व्यासपीठावर फक्त मंत्री आणि संघाचे प्रचारक होते. आमदारांना व्हीआयपी कक्षात बसवण्यात आलं. आम्ही विरोधी पक्षात आहोत. कर्जमुक्तीची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली होती. देवेंद्र फडणवीस यांची भेट झाली नाही, याची खंत नाही. त्यांची शांततेत अपॉइंटमेंट घेऊन मी केव्हाही भेट घेऊ शकतो, असे त्यांनी म्हटले.

एकनाथ खडसे मुख्यमंत्र्यांची भेट घेणार यात वाईट काय? एकनाथ खडसे म्हणाले होते की बडगुजरांपेक्षा मी गेलेलो आहे का? त्याबाबत कदाचित एकनाथ खडसे बोलतील. एकनाथ खडसेंना भाजपमध्ये का घेतलं नाही? याचं आत्मपरीक्षण त्यांनी करावं, असा सल्ला मंत्री गिरीश महाजन यांनी एकनाथ खडसेंना दिला होता. याबाबत विचारले असता गिरीश महाजन यांनी आत्मपरीक्षण करण्याचा दिलेला सल्ला म्हणजे हा फार मोठा जोक आहे, असा टोला त्यांनी गिरीश महाजनांना लगावला.

# भारतातील प्राचीन आणि वास्तविक योग

'वा आंतरराष्ट्रीय योग दिवस हा दरवर्षी २१ जून रोजी जगभरात साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्रांनी याला मान्यता दिली आहे. या विशाल विश्वात योगाचे अनेक प्रकार प्रचलित आहेत. या योगाच्या अनेक प्रकारांची चर्चा ऐकून लोकांच्या मनात एक प्रश्न निर्माण होतो की यापैकी खरा योग कोणता? त्यांना हे जाणून घ्यायचे आहे की ज्या योगाने मनुष्याला मनःशांती मिळते, तो भगवंताशी एकरूप होऊन उत्सव साजरा करतो, अपार आनंद मिळतो आणि त्याची अवस्था अव्यक्त आणि स्थिर असते, तो योग कोणता? ते विचारतात की ज्या योगामुळे पापे जळून जातात आणि मनुष्याला भविष्यात मोक्ष किंवा जीवनमुक्ती (देव-पद) मिळू शकते आणि अपार पवित्रता, दिव्यत्व आणि आध्यात्मिक आनंद मिळू शकतो, त्या योगाची ओळख काय? या सर्व प्रश्नांची अचूक उत्तरे मिळवण्यासाठी प्रथम 'योग' या शब्दाचा खरा अर्थ जाणून घेणे आवश्यक आहे.

**योग म्हणजे काय?**

भारत ही अध्यात्माची भूमी आहे. इथे अनेक प्रकारचे योग प्रचलित आहेत. हठयोग, राजयोग, ध्यानयोग, भक्ति योग इत्यादी. पण खरा योग कोणता? असा योग जो आत्म्याला शांतता देतो, देवाशी जोडतो, पापांपासून मुक्त करतो आणि परमसुखाची अनुभूती देतो?'योग' म्हणजे जोडणं आत्म्याचं परमात्म्याशी. केवळ श्वासावर नियंत्रण ठेवणं, डोळे मिटून बसणं किंवा काही विशिष्ट आसने करणं म्हणजे योग नव्हे. योगाचा खरा अर्थ आहे. आपल्या मनाला देवाच्या स्मरणात, त्याच्या प्रेमात, त्याच्या मार्गदर्शनात एकाग्र करणं.योग म्हणजे आत्मा आणि परमात्म्याचा मिलन. आपण म्हणतो, "तोच माझा बाप, तोच माझी आई आहे", पण आज हे नातं केवळ बोलण्यापुरतं उरलंय. प्रत्यक्ष जगण्यात देवाशी संबंध नाही, म्हणूनच सुख आणि शांती दूर गेली आहे. योग म्हणजे ईश्वरीय स्मृतीत राहणं:- योग हे केवळ एक तांत्रिक प्रक्रिया नाही. जसं आपण आपल्या वडिलांना ओळखतो, त्यांचं कर्तृत्व, स्वभाव, घर, मूल्यं जाणतो, तसंच परमपित्याचं ओळखणं, हेच खरं ज्ञान. आणि त्या ज्ञानातून येणारा विश्वास आणि स्मृती हाच खरी



योगसाधना. जसं एखादा प्रिय व्यक्ती मनात सतत असतो, त्याच्या आठवणीने प्रेरणा मिळते, तसंच जर देवाची आठवण आपल्या मनात असेल, तर आपण आपोआप त्याच्याशी जोडले जातो. मन आणि बुध्दी दोन्ही परमात्म्याच्या स्मरणात मग्न झाल्या की, तोच खरा 'बुद्धियोग' आहे.ही स्मृती केवळ भावनिक नसून ज्ञानावर आधारलेली असते. म्हणूनच ब्रह्माकुमारीजमध्ये योग शिकवताना "ज्ञानयोग", "राजयोग", "बुद्धियोग" असे विविध प्रकार एकत्रित केले जातात. देवाच्या श्रेष्ठ मतावर चालणं म्हणजे योग:- खरा संबंध त्या व्यक्तीशी असतो ज्याच्या सल्ल्यानुसार आपण चालतो. जर मुलगा वडिलांच्या मतावर चालत नसेल, तर केवळ नातं आहे म्हणणं व्यर्थ ठरतं. तसंच, जर आपण देवाच्या मताऐवजी आपल्या इच्छेप्रमाणे किंवा मायेच्या प्रभावाने वागत असू, तर आपला योग खोटा ठरतो. देव म्हणतो:"माझ्या स्मरणात रहा, माझ्याशी अपार प्रेम जोडा, आणि माझ्या मतावर चालत राहा. मी तुम्हाला उत्तम मार्ग दाखवीन, ज्यामुळे तुम्ही दुःख-सागर पार कराल." अर्थात, योग म्हणजे एकेकाळी शिकवलेलं, पण नंतर विसरलेलं खूप गूढ आणि श्रेष्ठ ज्ञान पुन्हा शिकवण्याची ईश्वरी योजना आहे. ही योजना यशस्वी होते तेव्हाच आत्मा आणि परमात्मा यांचा खरा योग होतो.

**सहज, सर्वश्रेष्ठ आणि व्यवहार्य योग**

आजच्या काळात जेव्हा देव स्वतः अवतरतो आणि आपलं नाव, रूप, निवासस्थान, कार्य आणि मत स्पष्ट करतो, तेव्हाच खरा योग शक्य होतो. ब्रह्माकुमारीजच्या शिक्षणानुसार, परमपिता परमात्मा परमधामातून पृथ्वीवर येतो आणि आपल्या ज्ञानाने आत्म्यांना जागृत करतो. या योगासाठी ना आसन, ना प्राणायाम, ना घर सोडावं लागतं. आपण आपलं कर्तव्य करत करत, मनाने देवाशी जोडले जाऊ शकतो. म्हणूनच याला "सहज राजयोग" म्हणतात. हे योग सर्व योगांमध्ये श्रेष्ठ आहे. याने आत्मा पवित्र होतो, विकारांवर विजय मिळवतो आणि भविष्यात स्वर्गासारखं जीवन प्राप्त करतो. या योगांना विविध नावांनी ओळखलं जातं:- १) ज्ञान योग – ज्ञानावर आधारित योग, २) कर्म योग – कर्म करत करत स्मरणात राहणं, ३) संन्यास योग –वासनांचा त्याग,४) समत्व योग – सुख-दुखः, मान-अपमानात एकसमान राहणं,५) राजयोग – सर्व योगांचा राजा,६)सहज योग – सहजतेने साधला जाणारा योग. आंतरराष्ट्रीय योग दिन हा दिवस खूप महत्त्वाचा आहे कारण तो आपल्याला निरोगी आणि शांत राहण्याची आठवण करून देतो. सर्वांना आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या हार्दिक शुभेच्छा! ओम् शांती!



**– राजयोगिनी ब्रह्माकुमारी वासंती दीदी, मुख्य संचालिका, प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय, नाशिक जिल्हा**

---

# हभप आचार्य रामकृष्ण महाराज लहवितकर ट्रस्ट, देहूकर महाराज फड यांचे वारकरी पुरस्कार जाहीर

**बेलगाव कुऱ्हे ।** हभप आचार्य रामकृष्ण महाराज लहवितकर ट्रस्ट व देहूकर महाराज फड यांच्याद्वारे प्रतिवर्षी महाराष्ट्रातील अतिशय गौरवशाली व सेवाभावी व्यक्तींचा वै. सद्‌गुरु सोपानकाका महाराज देहूकर यांच्या पुण्यस्मरणार्थ वारकरी पुरस्कार देऊन गौरव करण्यात येतो. २०२५ चे वारकरी पुरस्कार नुकतेच जाहीर झाले असून सोमवारी ७ जुलै रोजी श्री देहूकर वाडा, कुंभार घाट, पंढरपूर येथे पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती आचार्य रामकृष्ण महाराज लहवितकर ट्रस्टचे अध्यक्ष हभप गंगाधर कारभारी जाधव यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.



या पुरस्कारात सद्गुरु वै. हभप सोपानकाका महाराज देहूकर वारकरी पुरस्कार, सांप्रदायिक मृदंग वादक सेवा पुरस्कार, सांप्रदायिक वारकरी भजन सेवा पुरस्कार, देहकर महाराज फड सेवा पुरस्कार या पुरस्कारांचे वितरण देहूकर महाराज फड तथा पंढरपूरचे जेष्ठ अधिकारी हभप श्रीगुरु बाळासाहेब महाराज देहूकर यांच्या शुभहस्ते होणार आहे. श्री विठ्ठल रुख्मिनी मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, चैतन्य महाराज देगलूरकर पंढरपुर, संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजननाथजी महाराज उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संतवीर बंडा तात्या महाराज कराडकर, द्वाराचार्य डॉ. रामकृष्णदास महाराज लहवितकर, संत तुकाराम महाराज संस्थानचे अध्यक्ष जालिंदर महाराज मोरे, प्रमोद महाराज जगताप (बारामती) राहणार आहेत. कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून देहूकर महाराज फड जेष्ठ अधिकारी श्रीगुरु बापूसाहेब महाराज देहूकर, संत निवृत्ती महाराज संस्थान त्र्यंबकेश्वर अध्यक्ष अँड. सोमनाथ ज्ञानेश्वर घोटेकर, संत मुक्ताई संस्थानचे अध्यक्ष अँड. रविंद्र पाटील उपस्थित राहणार आहेत. या भव्य पुरस्कार सोहळ्यासाठी वारकरी संप्रदायाचे श्रद्धेने कार्य करणाऱ्या सर्व संघटनांचे पदाधिकारी, फड प्रमुख, दिंडी प्रमुख, महाराज मंडळी उपस्थित राहणार असल्याचे कळवण्यात आले आहे.

### आत्ताच्या पुरस्काराचे मानकरी

सद्‌गुरु वै. हभप सोपानकाका महाराज देहूकर वारकरी पुरस्कार हभप गुरुवर्य संदिपन महाराज शिंदे हासेगावकर अध्यक्ष सद्गुरू जोग महाराज वारकरी शिक्षण संस्था आळंदी देवाची यांना जाहीर झाला असून ५१ हजार निधी, पोषाख, महावस्त्र, सन्मान चिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. सांप्रदायिक मृदंग वादक सेवा पुरस्कार मृदंग अलंकार गंभीर महाराज अवचार (आळंदी देवाची) सांप्रदायिक वारकरी भजन सेवा पुरस्कार हभप संगीत अलंकार राधाकृष्ण महाराज गरड, गुरुजी (वांगी संस्थान), श्री देहकर महाराज फड सेवा पुरस्कार हभप ज्ञानोबा सदाशीव ढोक यांना पुरस्कार जाहीर झाले असून या पुरस्काराचा निधी रुपये २५ हजार, पोषाख. महावस्त्र, सन्मान चिन्ह देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

---

# प्राणघातक हल्ल्याच्या निषेधार्थ मनमाड बंदचे आयोजन

**मनमाड ।** व्यापारी महासंघाचे अध्यक्ष राजेंद्र पारीक आणि बंधू,



पुतण्यावर झालेल्या प्राणघातक हल्ल्याच्या निषेधार्थ बुधवारी व्यापारी महासंघातर्फे मनमाड बंदचे आव्हान करण्यात आले होते या अनुषंगाने मनमाड शहरात व्यापाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत निषेध नोंदवला. सकाळपासूनच शहरातील सर्व व्यवहार बंद असून व्यापारी महासंघातर्फे मनमाड पोलीस तालकाचे पोलीस निरीक्षक विजय करे यांना निवेदन देण्यात आले. घटनेतील आरोपी तत्काळ पोलीस प्रशासनाने अटक केल्याबद्दल व्यापाऱ्यांनी प्रशासनाचे आभार मानले. व्यापारी संघाचे पदाधिकारी व शहरातील व्यापारी वर्ग उपस्थित होता.

---

# टाकेदला आबाजी बारे यांच्या फार्मवर बिबट्याचा धुमाकूळ

**सर्वतीर्थ टाकेद ।** इगतपुरी तालुक्यातील सर्वतीर्थ टाकेद येथील तीर्थावर कायम रहिवासी असलेल्या शेतकरी आबाजी हरी बारे यांच्या फार्मवर सोमवारी रात्री १० वाजेच्या दरम्यान बिबट्याने झापावरील पडवीच्या फळ्या बाजूला करून घराच्या आतमध्ये प्रवेश केला व ज्या ठिकाणी शेळ्या बांधलेल्या होत्या ठिकाणी बिबट्याने झडप घालत दोन शेळ्या व एक बोकड जागीच फस्त केल्या. यात एक गाभण शेळी व एक पाठ मृत्यमुखी पडली. तर एक बोकड बिबट्याने जागेवर फस्त केला.

या घटनेत शेतकरी बारे यांचे मोठे नुकसान झाले असून सदर घटना त्यांनी सामाजिक कार्यकर्ते राम शिंदे यांना सांगितली. त्यांनी वन विभागाचे मेजर गोरख बागुल यांना दूरध्वनी वरून संपर्क केला. वनविभागाकडून जीपीएस फोटो काढत पंचनाम्यासाठी पाठपुरावा केला. दरम्यान या घटनेमुळे व बिबट्याच्या रोजच्याच दहशतीमुळे शेतकरी बारे फार्मवरील ग्रामस्थ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण तयार झाले. या परिसरात रोज बिबट्याचा वावर असतो. ही घटना झाल्यानंतर सुद्धा मंगळवारी रात्री अकराच्या दरम्यान व त्यानंतर बुधवार रात्री एक दोन च्या दरम्यान पुन्हा बिबट्याने शेतकरी बारे यांच्या फार्मवर पुन्हा दरवाजा जवळच्या फळ्या बाजूला करत झापाच्या आतमध्ये शेळ्यांच्या गोठ्यात प्रवेश करत पुन्हा दहशत निर्माण केली.परंतु झापाच्या आतल्या भागात घरामध्ये दरवाजा लावून शेतकरी आबाजी बारे यांनी सर्व घटना स्वतः प्रत्यक्ष डोळ्यांनी बघितली. बिबट्याच्या दहशतीने या कुटुंबियांना रात्री आठनंतर घराच्या बाहेर येता येत नाही. या कारणास्तव वनविभागाने तत्काळ याठिकाणी पिंजरा लावून सदर बिबट्याला पकडावे व रोजची बिबट्याची दहशत दूर करावी, यासोबतच बिबट्याच्या हल्ल्याचा पंचनामा करून तात्काळ नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी आबाजी बारे, सामाजिक कार्यकर्ते राम शिंदे यांनी केली आहे.

> रोज बिबट्याची झापावर दहशत असते, यामुळे सायंकाळ नंतर घराबाहेर कुटुंबियांना जाता येत नाही. घराच्या आतमध्ये घुसून बिबट्याने दोन शेळ्या व एक बोकड फस्त केल्यामुळे आमचे शेती जोडव्यवसायाचे नुकसान झाले आहे. संबंधित वनविभागाने तात्काळ पंचनामा करून नुकसानभरपाई द्यावी व याठिकाणी तात्काळ पिंजरा लावून सदर बिबट्याला रेस्क्यू करावे.
>
> **– आबाजी बारे, नुकसानग्रस्त शेतकरी**



---

## ➤ महत्त्वाचे

### नांदगाव आयटीआय शाखेच्या निदेशक संघटनेच्या अध्यक्षपदी गायकवाड

**नांदगाव ।** महाराष्ट्र राज्य आयटीआय निदेशक संघटनेच्या नांदगाव शाखेच्या नवीन कार्यकारणी निवडणूक 2025 करिता दिनांक



19 जून 25 रोजी गुरुवारी निवड प्रक्रिया पार पडली. या मध्ये दुपारी दोन वाजेपर्यंत आलेल्या उमेदवारी अर्जांची छाननी करण्यात आली. असता प्रत्येक पदासाठी एकच उमेदवारी अर्ज आलेला असल्यामुळे अध्यक्ष पदासाठी श्री पंढरीनाथ सटवाजी गायकवाड तसेच सचिव पदासाठी श्री अरुण रमेश मढवई, कोषाध्यक्ष पदासाठी सौ. वनिता सुरेश बर्वे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. सदस्य म्हणून मुकुंद दत्तात्रय निकुंभ, संकल्पना शांताराम काटे, नारायण शंकरराव सरनाईक, गोविंद राजेंद्र शिंदे, सुशील सुभाष तायडे, सौ शर्मिला ज्ञानेश्वर उदावंत यांचे प्रत्येक एका पदासाठी अर्ज दाखल झाले होते. त्यामुळे पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड झाल्याचे यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी निकुंभ यांनी जाहीर केले. अध्यक्ष व सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांची अभिनंदन करण्यात आले.

### अभिनव बालविकास मंदिर, विद्यालयात शाळा प्रवेशोत्सव उत्साहात

**एकलहरे ।** जेल रोड येथील स्व गणेश द धात्रक शिक्षण संस्था संचलित अभिनव बालविकास मंदिर व आशिष मॉन्टेसरी स्कूलमध्ये शाळा प्रवेशोत्सव उत्साहात संपन्न झाला.यावेळी संस्थेचे संस्थापक माननीय दत्तात्रय धात्रक, शाळेच्या मुख्याध्यापिका जयश्री सरोदे, बालवाडी विभाग प्रमुख विजया कोल्हे उपस्थित होत्या. शाळेच्या प्रथम दिवशी सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत औक्षण करून पेन्सिल व चॉकलेट वाटप करण्यात आले.तसेच, संस्थेचे संस्थापक माननीय दत्तात्रय धात्रक सर यांच्या हस्ते सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके वाटप करण्यात आले.संस्थेचे संस्थापक माननीय दत्तात्रय धात्रक यांनी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.यावेळी नलिनी गांगुर्डे, सुजाता जाधव, शुभांगी खैरनार, किरण बागडे, माधवी जाधव, नयना चौधरी, राजश्री मोहिते, छाया कोतवाल, वैशाली चव्हाणके, आरती डेर्ले, प्रियंका ढकोलिया उपस्थित होत्या.

---

# राजमाता जिजाऊ महाअभिवादन यात्रेचा पाचाड रायगडावर समारोप

**नाशिक ।** महाराष्ट्राची प्रेरणा आणि अस्मिता असलेल्या स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ यांच्या ३५१ व्या स्मृती दिनानिमित्त आयोजित 'जिजाऊ महाअभिवादन यात्रा' यंदाही मोठ्या उत्साहात आणि ऐतिहासिक स्वरूपात संपन्न झाली. १५ ते १७ जून २०२५ या तीन दिवसांच्या कालावधीत शेकडो चारचाकी वाहनाच्या ताफ्यासह निघालेल्या या पवित्र यात्रेचा समारोप मंगळवारी (दि १७) रोजी पाचाड, रायगड येथे राजमाता जिजाऊंना महाअभिवादन करून करण्यात आला. या तीन दिवसीय यात्रेत हजारो शिवभक्तांनी जिजाऊ मासाहेबांचे दर्शन घेतले.

या यात्रेचे हे चौथे वर्ष असून, मातृशक्तीचा सन्मान करणे आणि तिची ताकद संपूर्ण महाराष्ट्राला दाखवणे हा या यात्रेचा मुख्य उद्देश होता. या यात्रेमुळे महाराष्ट्रात सामाजिक परिवर्तन घडून हुंडा मुक्त समाज, नशा मुक्त समाज आणि प्रगतशील समाज घडवण्यासाठी ती महत्त्वपूर्ण ठरली. समाजात नवचैतन्य निर्माण करून सशक्त राष्ट्र उभारणे हा या यात्रेमागील प्रमुख संकल्प होता. राजमाता जिजाऊंचा आदर्श घेऊन



प्रत्येक स्त्रीने स्वतःच्या पायावर उभे राहून स्वाभिमानाने जीवन जगावे, असा संदेश या यात्रेतून देण्यात आला.

सिंदखेडराजा येथील लखुजीराजे जाधव यांचे वंशज शिवाजीराजे जाधव यांनी या पवित्र यात्रेचे नेतृत्व केले. या महाअभिवादन यात्रेत विदर्भ, मराठवाडा, खान्देश, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र आणि कोकण विभागातून शिवभक्तांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून हजारो चारचाकी गाड्या या यात्रेत सहभागी झाल्या होत्या. यात्रेच्या मार्गावर ठिकठिकाणी भव्य स्वागत करण्यात आले, ज्यामुळे हा सोहळा जनसामान्यांपर्यंत पोहोचला.

यावेळी लखुजीराजे जाधव यांचे वंशज शिवाजीराजे जाधव, मेहकरचे आमदार सिद्धार्थ खरात, भारत क्रांती मिशनचे राष्ट्रीय समन्वयक डॉ. विलास पांगारकर, भारत क्रांती मिशनचे मुख्य समन्वयक विजय काकडे पाटील, योगेश देशमुख, नितीन धांडे, शंभुराजे जाधव, रविंद्र बोचरे, सविता कदम, पूजा काकडे, कुमारी अक्षरा काकडे, ओम कदम, पृथ्वीराज देशमुख, बाळासाहेब देशमुख, अमोल सोनवणे, अतुल पांगारकर, विजय नन्नावरे, देवीदास पाठे, समीर जाधव, चंद्रकांत माने, कैलास पाटील, लिंबा मराठे, अरुण पाटील, बाळू पाटील, प्रमोद पाटील, संदीप पाटील, दत्तू पाटील, विठ्ठल पाटील, अतुल पाटील, बापू सोनवणे, तुकाराम पाटील, सचिन पाटील, सत्यवान पाटील, योगेश पाटील व हजारो माताभगिनी आणि शिवभक्त उपस्थित होते. भारत क्रांती मिशनचे राष्ट्रीय समन्वयक डॉ. विलास पांगारकर यांनी या पवित्र आणि ऐतिहासिक यात्रेत सहभागी झालेल्या सर्वांचे आभार मानले. महाराष्ट्राच्या या महान मातेला आदरांजली वाहून, त्यांच्या त्याग आणि शौर्याचा आदर्श आत्मसात करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

---

# आज जयपूर घराण्याच्या पुणे येथील सुप्रसिद्ध गायिका सानिया पाटणकर यांचा कार्यक्रम

**नाशिक ।** सार्वजनिक वाचनालय, नाशिक ही १८५ वर्षे परंपरा असलेली वाचन संस्कृती आणि सांस्कृतिक कार्य करणारी अग्रगण्य संस्था आहे. नाशिकच्या सांस्कृतिक क्षेत्रात विविध उपक्रम संस्थेच्यावतीने नेहमीच होत असतात. शास्त्रीय संगीताचा प्रचार आणि प्रसार तसेच अभिजात संगीताची जपणूक, कलाकारांना व्यासपीठ आणि सुजाण संगीत प्रेमी रसिकांना आनंद देणे या हेतूने संस्थेच्यावतीने स्वर सावाना या सांस्कृतिक (सांगितिक) कार्यक्रमाचे अकरावे पुष्प बरखा बहार या कार्यक्रमात जयपूर घराण्याच्या पुणे येथील सुप्रसिद्ध गायिका सानिया पाटणकर या वर्षा ऋतूतील आविष्कार, मल्हार तसेच अन्य रागातील बंदिशी शास्त्रीय उपशास्त्रीय रचनाचे सादरीकरण करण्यात येणार आहे.



वेदवती परांजपे, अदिती नगरकर, नितीन महाबळेश्वरकर, सहगायन निवेदन इंद्रायणी पटणी, हार्मोनियम पं. सुभाष दसककर, तबलासंगत नितीन वारे, साऊंड सचिन तिडके यांची असणार आहे. संकल्पना सार्वजनिक वाचनालय नाशिक यांची आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. दिलीप फडके हे असणार आहेत. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून बांधकाम व्यवसायिक प्रीतम पावशे हे उपस्थित रहाणार आहेत. शनिवार दि. २१ जून, २०२५ रोजी सायंकाळी ६.०० वाजता मु.शं. औरंगाबादकर सभागृह, सावाना आवार, नाशिक येथे हा कार्यक्रम होईल.

संगीत प्रेमी रसिकांनी या विनामुल्य कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन वाचनालयाचे अध्यक्ष प्रा. दिलीप फडके, उपाध्यक्ष वैद्य विकांत जाधव, डॉ. सुनील कुटे, कार्याध्यक्ष संजय करंजकर, प्रमुख सचिव सुरेश गायधनी, सहा. सचिव प्रा.सोमनाथ मुठाळ, अर्थ सचिव गिरीश नातू, ग्रंथसचिव देवदत्त जोशी, सांस्कृतिक कार्य सचिव जयप्रकाश जातेगावकर, नाट्यगृह सचिव जयेश बर्वे, वस्तुसंग्रहालय सचिव अँड. अभिजित बगदे, सदस्य- सौ.प्रेरणा बेळे, डॉ.धर्माजी बोडके, सांस्कृतिक कार्य सह सचिव प्रशांत जुन्नरे, मंगेश मालपाठक, अँड. अभिजित बगदे यांनी केले आहे.

---

# निकृष्ट दर्जाच्या कामामुळे ग्रामपंचायत कार्यालयाला ठोकले कुलूप

**देवळा ।** तालुक्यातील भऊर येथे जल जीवन मिशनअंतर्गत करण्यात आलेल्या पाणी पुरवठा योजनेच्या अपूर्ण व निकृष्ट दर्जाच्या कामामुळे गावात पाणी पुरवठा विस्कळीत झाल्याने बुधवारी दि. १८ रोजी संतप्त महिलांनी गावात हंडा मोर्चा काढून ग्रामपंचायत कार्यालयाला कुलूप ठोकले. गावात तात्काळ पुरवठा सुरळीत सुरू करावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल अशा आशयाचे निवेदन यावेळी ग्रामपंचायत सदस्य काशिनाथ पवार यांना देण्यात आले.



याबाबत सविस्तर माहिती अशी की, देवळा तालुक्यातील भऊर गावात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून हर घर नल अंतर्गत जल जीवन मिशन योजनेंतर्गत नवीन पाणी पाणी पुरवठा योजनेचे काम करण्यात आले असून, त्या कामात संबंधित ठेकेदाराकडून अनेक त्रुटी आढळून आल्या आहेत. यामुळे गावात सुरळीत पाणी पुरवठा होत नाही. गेल्या अनेक दिवसांपासून सुरू करण्यात आलेले सदर काम अद्याप अपूर्ण असल्याने ही योजना ग्रामपंचायतीकडे हस्तांतरीत करण्यात आली नाही. योजनेच्या उद्भव विहिरीला मुबलक प्रमाणात पाणी असताना गावात पाणी पुरवठा सुरळीत होत नसल्याने बुधवारी संतप्त महिलांनी ग्रामपंचायत कार्यालयावर हंडा मोर्चा काढून कार्यालयाला कुलूप ठोकण्यात आले. योजनेचे काम तात्काळ पूर्ण करून पाणी पुरवठा सुरळीत करावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा देण्यात आला. यावेळी निलाबाई पवार, योगिता पवार, शिलाबाई पवार, संगीता जोंधळे, लीला जोंधळे, हर्षदा पवार, सविता पवार, वर्षा पवार, विद्या पवार, इंदुबाई पवार, मताबाई शिंदे, केदा पवार, मिलिंद पवार, प्रदीप पवार, उमेश पवार, दीपक पवार, नंदू सोनवणे, ग्रामपंचायत सदस्य सीमा गरुड, गंगाराम ठाकरे, उर्मिला गवळी, चित्रा बिरारी, मनीषा पवार, निर्मला देवरे, शोभा पवार, उषा पगार आदी उपस्थित होते. दरम्यान या योजनेच्या कामावरील ठेकेदाराला सूचना करण्यात येऊन पाईपलाईनचे लिकेज काढण्याचे काम सुरू केले असून, नळ कनेक्शन देण्याचे कामही करण्यात येणार आहे, असे पाणी पुरवठा विभाग पंचायत समिती, देवळा येथील कनिष्ठ अभियंता वासंती बोरसे यांनी सांगितले.

# दीडशे दिवसांच्या कार्यक्रमाची जिल्ह्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करावी

## पालक सचिव एकनाथ डवले यांच्या सूचना । जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक

**नाशिक ।** राज्य शासनाने अलीकडेच दिलेला 100 दिवसांच्या कार्यक्रमात विविध विभागांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. आता शासनाने 150 दिवसांचा कार्यक्रम दिला आहे. त्याची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करावी. ई ऑफिस प्रणालीचा वापर करावा, अशा सूचना पालक सचिव एकनाथ डवले यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात राज्य शासनाने दिलेल्या १५० दिवसांच्या कार्यक्रमाचा पालक सचिव डवले यांनी आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, विशेष पोलिस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, जिल्हाधिकारी जलज शर्मा, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, अतिरिक्त आयुक्त करिश्मा नायर, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल, पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.




डवले यांनी सांगितले की, शासनाच्या शंभर दिवसांच्या समारोपप्रसंगी मुख्यमंत्री महोदयांनी भविष्यातील वाटचालीसाठी विकसित महाराष्ट्र २०४७ च्या अनुषंगाने व्हीजन डॉक्युमेंट तयार करण्यासाठी दीडशे दिवसांच्या कार्यक्रमाची घोषणा केली आहे. त्यात दीर्घकालिन म्हणजे २०४७ पर्यंत गाठावयाची उद्दिष्टे, मध्यमकालिन उद्दिष्टे म्हणजे राज्याच्या अमृत महोत्सवापर्यंत गाठावयाची उद्दिष्टे आणि अल्पकालिन म्हणजे २ ऑक्टोबर २०२९ पर्यंतच्या पाच वर्षांत वर्षनिहाय गाठावयाच्या उद्दिष्टांचा समावेश आहे.

दीडशे दिवसांच्या कार्यक्रमात विकसित महाराष्ट्र २०४७, ई गव्हर्नन्स, सेवाविषयक, प्रशासकीय सुधारणांचाही समावेश आहे. तसेच तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करावा. आगामी काळात शंभर टक्के ई- ऑफिस प्रणालीचा वापर करावा, असेही डवले यांनी सांगितले. विभागीय आयुक्त डॉ. गेडाम यांनी मार्गदर्शन केले. जिल्हाधिकारी श्री. शर्मा यांनी १५० दिवसानिमित जिल्हा प्रशासनातर्फे सुरू असलेल्या कार्यवाहीची माहिती दिली. या बैठकीनंतर पालक सचिव डवले यांनी नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या आगामी कुंभमेळ्यातील विविध विकास कामांचा आढावा घेत त्यांना गती देण्याचे निर्देश दिले. कुंभमेळा प्राधिकरणाच्या सह अध्यक्ष श्रीमती नायर यांनी कुंभमेळ्यानिमित्त सुरू असलेल्या कामांची माहिती दिली.

# बनावट शासन आदेशाच्या आधारे निविदा प्रक्रिया

## बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यावर गुन्हा दाखल

**नाशिक ।** जिल्ह्यातील पर्यटनस्थळांच्या विकासासाठी बनावट शासन आदेश तयार करून शासनाची फसवणूक केल्याच्या प्रकरणात जिल्हा परिषद बांधकाम विभागातील तत्कालीन कार्यकारी अभियंता शैलजा नलावडे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी कनिष्ठ प्रशासन अधिकारी प्रदीप अहिरे यांनी सातपूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

प्राप्त माहितीनुसार, डिसेंबर २०१४ ते फेब्रुवारी २०१५ या कालावधीत शैलजा नलवडे या बांधकाम विभागात कार्यरत असताना त्यांनी शासन निर्णय डिटीपीएस पर्यटन-१, दिनांक ६ फेब्रुवारी २०१५, क्र. २०१४/०६/प्र.क्र.३७० असा बनावट आदेश तयार करून त्याद्वारे




पर्यटनस्थळांच्या पायाभूत सुविधांसाठी निधी मिळवण्याचा प्रयत्न केला. फिर्यादीनुसार, हा आदेश शासनाच्या अधिकृत नोंदीमध्ये अस्तित्वात नसताना बनावट दस्तऐवज तयार करण्यात आला आणि त्याच्यावर आधारित निविदा प्रक्रिया राबवण्यात आली. संबंधित प्रक्रियेत शासनाची दिशाभूल होऊन आर्थिक नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली. प्रदीप अहिरे यांनी या प्रकरणी १८ जून रोजी सातपूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानंतर पोलिसांनी शैलजा नलवडे यांच्या विरोधात फसवणूक व खोटे दस्तऐवज तयार करण्याचा प्रयत्न केल्याचा ठपका ठेवून गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, हे प्रकरण न्यायप्रविष्ट असूनदेखील, त्यावर प्रक्रिया करून निविदा पुढे नेल्याने प्रकरण अधिक गंभीर झाले आहे. पोलिस अधिक तपास करीत आहे.

# पोलीस भरतीच्या नावाखाली विद्यार्थ्यांची फसवणूक; गुन्हा दाखल

**नाशिक ।** 'प्रथम फाउंडेशन' या संस्थेच्या माध्यमातून पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षण देण्याच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांची फसवणूक झाल्याचे उघडकीस आले आहे. यामध्ये संस्थेचे संचालक योगेश नारायण पानसरे यांनी शासनाकडून प्रशिक्षणासाठी मिळणाऱ्या ५०,००० रुपयांच्या अनुदानाचा दाखला देत फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा




दाखल करण्यात आला आहे. या रकमेतून विद्यार्थ्यांना ५ जी टॅब, कॉलेज बॅग, सर्व विषयांची पुस्तके, नोटबुक, १२ पेन इत्यादी साहित्य देण्यात आले. मात्र, हे साहित्य आणि प्रशिक्षण केवळ नावेपुरते होते. संस्थेने स्वःताच्या फायद्यासाठी या वस्तूंची किंमत फुगवून दाखवली. शिवाय अनेक विद्यार्थ्यांना प्रशिक्षणच दिले गेले नाही, तर काहींना प्रशिक्षण दिले तरी ते अपुरे होते.विशेष म्हणजे या प्रशिक्षणासाठी गरीब आणि अनुसूचित जाती जमातीतील विद्यार्थ्यांना लक्ष्य करण्यात आले. महिला प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण पूर्ण करूनही काहींचे फॉर्म शासनास सादरच करण्यात आले नाहीत. या संपूर्ण प्रकरणात योगेश पानसरे यांच्यावर शासनाची मदत दर्शवून विद्यार्थ्यांची फसवणूक केल्याचा आरोप असून, फिर्यादीसह शैक्षणिक साहित्य न देता विद्यार्थ्यांची फसवणूक करून त्यांचा अपमान केल्याचेही स्पष्ट झाले आहे. त्यामुळे याप्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांचेकडून पंढरपूर सायकल वारीचे सिन्नर येथे स्वागत!

# शांतता झोनमध्ये डीजे वाजवून गोंधळ घालणाऱ्या तरुणास न्यायालयाची चपराक

## आठ दिवसांची कैद व दंड

**निफाड ।** निफाड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात मोठ्या आवाजात डीजे वाजवून शांतता झोनमध्ये सार्वजनिक शांतता भंग करणाऱ्या आरोपीस न्यायालयाने आठ दिवसांची साधी कैद व एक हजार रुपयांचा दंड अशी शिक्षा सुनावली आहे. हा निर्णय १९ जून रोजी निफाड न्यायालयाने दिला.

१८ जून रोजी सकाळी सुमारे ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकात एम एच ०६ एक्यु ९०९६ क्रमांकाच्या आयशर ४०७ वाहनातून बेकायदेशीरपणे कर्णकर्कश आवाजात डीजे वाजवला जात असल्याचे निफाड न्यायालयाच्या निदर्शनास आले. न्यायालयीन कामकाजात व्यत्यय येत असल्याने कोर्ट ड्युटीवरील पोलीस नाईक कल्पना पवार यांनी तातडीने सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी वाहन रोखून आवाज बंद करण्याचे आदेश दिले असता, चालकाने दुर्लक्ष करून आवाज आणखी वाढवला. पोलिसांनी डीजे मालकाची विचारणा केली असता, तो योगेश ज्ञानेश्वर वारुळे (वय ३१, रा. खडक, माळेगाव, ता. निफाड) असल्याचे निष्पन्न झाले. त्याच्याकडे डीजे वाजवण्याची कोणतीही परवानगी नव्हती. त्यामुळे त्याच्यावर निफाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सदर प्रकरणात आरोपीस निफाड न्यायालयात हजर करण्यात आले. माननीय प्रथम वर्ग न्यायिक दंडाधिकारी मा. शुभदा एस. सुकरे यांनी आरोपीस भारतीय न्यायसंहिता कलम २९२, ३८, १३६ , ३३(१)(डि), महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३० व मोटार वाहन कायदा कलम ११९/१७७ अंतर्गत दोषी ठरवत १००० रुपयांचा दंड आणि ८ दिवसांची साधी कैद अशी शिक्षा ठोठावली. सार्वजनिक ठिकाणी डीजे किंवा मोठ्या आवाजाचे वाद्य वाजवण्यापूर्वी शासनाची परवानगी घ्यावी. अन्यथा कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलीस निरीक्षक गणेश गुरवयांनी दिला आहे.

# कृष्णावंती नदीवरील वाकी तलाव ओव्हर फ्लो



## धरणाच्या पाणलोट क्षेत्रात दमदार पाऊस

**अकोले ।** भंडारदरा परिसरात पावसाचा जोर वाढल्याने प्रवरा नदीची उपनदी कृष्णावंती नदीवरील ११२ दलघफू क्षमतेचे वाकी जलाशय पूर्ण क्षमतेने भरले. निळवंडे धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील या जलाशयातून ओव्हर फ्लोचे पाणी प्रवरा नदीपात्रातून ओसंडून वाहू लागले. यामुळे यापुढील काळात निळवंडे धरण जलदगतीने भरण्यास मदत होईल. पाणीसाठ्यात झपाट्याने वाढ होत आहे.

अकोले तालुक्यातील प्रवरा व मुळा नदी खोऱ्यांच्या उगमापासून ओढे नाले दुथडी भरून वाहत आहेत. सह्याद्रीच्या डोंगररांगा धबधब्यांनी सजल्या. सर्वप्रथम मुळा नदीवरील १९३ दलघफू क्षमतेचा अंबित लघुपाटबंधारे प्रकल्प तुडुंब भरला. त्यानंतर कोतूळ जवळील ६०० दलघफू क्षमतेचा पिंपळगाव खांड प्रकल्प ओव्हरफ्लो झाला. ओव्हरफ्लोचे हे पाणी मुळा नदीतून राहुरीतील ज्ञानेश्वर सागर धरणाकडे झेपावले. निळवंडे धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील प्रवरा नदीची उपनदी असलेल्या कृष्णावती नदीवरील ११२ दलघफू क्षमतेचा वाकी तलाव पूर्ण क्षमतेने भरल्यामुळे ओव्हरफ्लो झाला. भंडारदऱ्याचा पाणीसाठा 3994 दलघफूटवर पोहचला. तर निळवंडे धरणाचा 2863 द.ल.घ.फूटवर पोहोचला आहे.

# वणी-मुळाणा रस्त्याची दुर्दशा

## चिखल, खड्डे आणि अपघातांचे साम्राज्य

**वणी ।** वणी-मुळाणा रस्त्याची अवस्था सध्या अत्यंत दयनीय झाली असून, लक्ष्मी चित्रपटगृह ते पाटा या रस्त्यावर अक्षरशः तीनतेरा वाजले आहेत. चिखल, खड्डे आणि अपूर्ण कामामुळे या मार्गावरून प्रवास करणं म्हणजे तारेवरची कसरतच बनली आहे. विशेषतः के.आर. हायस्कूल परिसर, विद्यार्थ्यांची वसतिगृहे, महाविद्यालयीन विद्यार्थी, शेतकरी, शेतमजूर, दुध-भाजी विक्रेते, व्यावसायिक आणि मार्कंडेय पर्वतावर दर्शनासाठी जाणारे भाविक यांना याच मार्गाचा वापर करावा लागतो.

या रस्त्याचे काँक्रीटीकरण नियोजित होते. मात्र निधीची तरतूद नसतानाही ठेकेदाराने रस्ता खोदल्यामुळे सर्वत्र चिखलाचे साम्राज्य निर्माण झाले आहे. त्यामुळे वाहने घसरून



अपघात होण्याचे प्रकार वाढले असून पायी चालणाऱ्या विद्यार्थ्यांचे हाल सुरू आहेत. शाळेत आणि महाविद्यालयात येणाऱ्या शेकडो विद्यार्थ्यांना दररोज धोका पत्करून या रस्त्याने प्रवास करावा लागत आहे.संतप्त नागरिक, शेतकरी आणि व्यावसायिकांचा एकच सवाल आहे.

"निधी नव्हता तर रस्ता का खोदला?" मात्र या परिस्थितीतही संबंधित विभाग, ठेकेदार आणि प्रशासन गप्प आहे. पावसाळ्यात काम करता येणार नाही आणि त्यानंतर निधीची वाट पाहावी लागणार, त्यामुळे किमान चार महिने हा मार्ग जीवघेणा ठरणार आहे.या रस्त्याचा ठेका 'मर्जीतील' ठेकेदाराला दिल्याचा आरोप नागरिक करत असून कामाची गती अत्यंत संथ आहे. सुरक्षित राजाश्रय असलेल्यांना या परिस्थितीची सवय झाली असली तरी सामान्य नागरिक, विद्यार्थी, भाविक आणि शेतकरी यांची अवस्था "हाका मारणाऱ्याशिवाय मुकी बिचारी" अशीच झाली आहे.

# इगतपुरी महाविद्यालयातील बारावी पुरवणी परीक्षेची आसन व्यवस्था जाहीर

**कावनई ।** येथील कर्मवीर पुंजाबाबा गोवर्धने महाविद्यालय इगतपुरी येथील केंद्र क्रमांक (०३९५) जून-जुलै एच.एस.सी.बोर्ड पुरवणी परीक्षा -२०२५ ची आसन व्यवस्था जाहीर करण्यात आली आहे. सदर परीक्षा ही दि.२४ जून २०२५ ते ०९ जुलै २०२५ या कालावधीत होणार असून सर्व विषयांची परीक्षा महाविद्यालयाच्या मुख्य इमारतीत होणार असून सकाळ सत्रातील परीक्षार्थींनी सकाळी ठिक १०:३० तर दुपार सत्रातील परीक्षार्थींनी दुपारी ठिक २:३० वाजता परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक आहे.

परीक्षार्थी यांनी परीक्षेस येताना लिखाणासाठी आवश्यक साहित्य, हॉल तिकीट व ओळखपत्र जवळ बाळगणे आवश्यक आहे.

कोणतेही लिखाण केलेले साहित्य तसेच इतर अनावश्यक साहित्य, इलेक्ट्रॉनिक साहित्य, मोबाईल परीक्षा केंद्रात आणण्यास सक्त मनाई आहे अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किरण रकिबे, केंद्र संचालक प्रा.राजेंद्र दिवटे व उपकेंद्र संचालक प्रा, राकेश गायकवाड यांनी दिली आहे.

### महत्त्वाचे

## कुंभमेळ्यातील विविध कामांचा आढावा

**नाशिक ।** नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या आगामी कुंभमेळ्यानिमित्त होणाऱ्या विविध कामांचा आढावा जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी घेतला. दीड वर्षांपेक्षा जास्त कालावधी लागणाऱ्या कामांना गती देण्याचे निर्देश त्यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती सभागृहात कुंभमेळा आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. महाजन यांनी सांगितले की, कुंभमेळ्यानिमित्त प्रस्तावित विकास कामे तातडीने सुरू करावीत. दीर्घ कालावधी लागणारी कामे वेळेत पूर्ण होतील, असे नियोजन करावे. या कामांचा वेळोवेळी आढावा घ्यावा. आगामी कुंभमेळ्यासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या लक्षात घेता नव्याने बांधण्यात येणाऱ्या घाटांचे काम निर्धारित कालावधीत पूर्ण करावे, असेही महाजन यांनी सांगितले. साधुग्रामकरिता आवश्यक भूसंपादन, रस्ते, पूल, जलशुद्धीकरण प्रकल्प आदींचा सविस्तर आढावा घेतला. कुंभमेळा प्राधिकरणाच्या सह अध्यक्ष श्रीमती नायर यांनी विविध कामांची माहिती दिली. यावेळी विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

# नाशिक सायक्लिस्ट फाऊंडेशनतर्फे नाशिक-पंढरपूर सायकल वारी

**नाशिक ।** येथील सायक्लिस्ट फाऊंडेशनतर्फे दिनांक २०,२१,२२ जुन रोजी नाशिक ते पंढरपूर ३६० किलोमीटर पर्यावरण संवर्धन सायकल वारीचे आयोजन करण्यात आले.

या वारीचा शुभारंभ आज सकाळी अनंत कान्हेरे मैदान येथे विठ्ठलाच्या आरतीने झाला. त्या प्रसंगी नाशिकचे जिल्हाधिकारी जलज शर्मा, नाशिक महापालिका आयुक्त मनिषा खत्री, नाशिक फाऊंडेशनचे संस्थापकीय अध्यक्ष हरिष बैंजल व सौ. बैजल, फाऊंडेशनचे माजी अध्यक्ष राजेंद्र वानखेडे, भाजप नेते व महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी, माजी नगरसेवक सतीशबापू सोनवणे, नाशिक शहर पर्यटन आघाडी प्रमुख नंदकुमार देसाई, पोलीस अधिकारी बाळासाहेब पाटील, फाऊंडेशनचे विद्यमान अध्यक्ष किशोर काळे यांसह अनेक मान्यवर, सायक्लिस्ट, जॉगर्स व नागरिक मोठ्या संख्येने विठ्ठलाच्या आरतीस व







सायक्लिस्टना शुभेच्छा देण्यासाठी उपस्थित होते. यंदाचे या वारीचे हे १३ वे वर्ष आहे. नाशिक सायक्लिस्ट फाऊंडेशनचे संस्थापकीय अध्यक्ष माजी पोलीस आयुक्त हरिष बैजल यांनी आईच्या स्मरणार्थ अवघ्या आठजणांना सोबत घेऊन वारीची सुरुवात केली होती. यावर्षी या वारीत ३०० लोकांनी आपला सहभाग नोंदविला आहे. फाऊंडेशन तर्फे दरवेळी वेगवेगळे सामाजिक उपक्रम वारी दरम्यान राबविले जातात. या वेळी सायबर फसवणूक या ज्वलंत विषयावर प्रबोधन व पथनाट्य सादर करणार आहेत. सायबर गुन्हेगारी पासुन सतर्क रहाण्यासाठी संदेश बोर्ड सायकलला लावण्यात येणार आहे. ३००० सायक्लिस्ट महाराष्ट्रातुन पंढरपूर येथे एकत्रित येणार आहेत व मंदिराला प्रदक्षिणा घालतील व तेथील रेल्वे मैदानात सर्व सायक्लिस्टचा रिंगण सोहळा रंगणार आहे. या वारीत विठ्ठलाची मूर्ती असलेला रथ हे प्रमुख आकर्षण आहे. या वारीत दरवर्षी आपला सहभाग उत्स्फूर्तपणे नोंदविणारे भाजप नेते व प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी नाशिक सायक्लिस्ट फाऊंडेशन सोबत आहेत व त्यांचे मोलाचे सहकार्य वारी यशस्वी होण्यासाठी लाभणार आहे.

# आत्मशुध्दीसाठी विवेकपूर्ण ध्यान



(जागतिक योग दिन)
२१ जून या दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यासाठी निवडण्यामागे खास कारण आहे. २१ जून हा वर्षांत सर्वात मोठा दिवस मानला जातो, ज्याला उन्हाळी संक्राती असे म्हटले जाते. उन्हाळी संक्रांती हा उत्तर गोलाधार्तील सर्वात जास्त प्रकाश असलेला दिवस आहे. पृथ्वीचा अक्ष त्याच्या कमाल कोनात सूर्याकडे झुकतो, त्यामुळे दिवस मोठा होतो. २१ जूननंतर सूर्य दक्षिणायनात प्रवेश करतो. योग आणि अध्यात्मासाठी हा दिवस खूप खास मानला जातो. त्यामुळे २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. जगभरात योगाचा प्रसार करण्यासाठी आणि त्याच्या फायद्यांची जाणीव करून देण्यासाठी आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा केला जातो.

------------------

संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत केलेल्या भाषणात पंतप्रधानांनी योगाचे महत्त्व सांगितले होते. ह्यह्योग ही भारताच्या प्राचीन परंपरेने दिलेली एक अमूल्य देणगी आहे. योग मन व शरीर, विचार व कृती, संयम व पूर्णता, मनुष्य व निसर्ग यांच्यातील ऐक्याला मूर्त रूप देतो. आरोग्य व स्वतःच्या कल्याणसाठी सर्वांगीण दृष्टिकोन प्राप्त करून देतो.

योगासने हा केवळ एक व्यायाम नाही, तर स्वतःशी, जगाशी आणि निसगार्शी एकरूपतेची भावना शोधण्याचा मार्ग आहे. आपली जीवनशैली बदलून आणि चेतना निर्माण करून आरोग्य सुधारण्यासाठी आंतरराष्ट्रीय योग दिन स्वीकारण्याच्या दिशेने काम करू या,पंतप्रधानांच्या या भूमिकेनंतर संयुक्त राष्ट्रांतील विविध देशांनी योगांचे महत्त्व जाणून हा दिवस साजरा करण्यास मान्यता दिली.

योग एक पूर्ण विज्ञान आहे, एक पूर्ण जीवन शैली आहे, एक पूर्ण चिकित्सा पद्धती आहे आणि एक पूर्ण अध्यात्म विद्या आहे. योगाच्या लोकप्रियतेचे रहस्य हे आहे की लिंग, जाति, वर्ग, संप्रदाय, क्षेत्र आणि भाषाभेदांच्या संकीर्णतांमध्ये कधी आबद्ध न असणे होय. चिंतक, बैरागी, अभ्यासी, ब्रह्मचारी, गृहस्थ कोणीही याचे सानिध्य प्राप्त करून लाभांन्वित होऊ शकतात. व्यक्तींच्या निमार्णात आणि उत्थानामध्येच नाही तर परिवार, समाज, राष्ट्र आणि विश्वाच्या चहूमुखी विकासामध्येही याचा उपयोग सिद्ध झाला आहे.

योग मनुष्याला सकारात्मक चिंतनाच्या प्रशस्त मार्गावर आणण्यासाठी एक अद्भुत विद्या आहे, ज्याला हजारो वर्षापूर्वी भारताच्या प्रज्ञावान ऋषी-मुनींनी आविष्कृत केले होते. महर्षि पतंजलीनी अष्टांग योगच्या रूपात याला अनुशासनबद्ध, संपादित आणि निष्पादित केले. जेव्हा मनाला एकाग्र करून ध्यानावस्थित रूपात जीव परमात्म्याबरोबर मिलनाची आकांक्षा करत असते तोच योग आहे. योगासनांना आधुनिक जीवनात फक्त व्यायामच मानले जाते. इंग्रजीमध्ये याला योगच्या ऐवजी योगा संबोधिले जाते.

योगाचे कित्येक प्रकार शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक हालचालींना आपल्या ताब्यात ठेवतात ज्यांचा उद्देश असतो की मनुष्याला आपल्या स्वरूपाच्या बाबतीत ज्ञान मिळवणे हेच मानव जीवनाचे परम लक्ष्य मोक्ष प्राप्त करणे. योग वैदिक तत्त्वशास्त्रात सहा विचारधारांमध्ये दर्शनांमध्ये एक आहे.

इथे याचे तात्पर्य राजयोगाबरोबर आहे. तो एक ब्रह्मन्न मिळविण्यासाठी ईश्वरीय ध्यानाचा राजसी मार्ग आहे. हिंदू संस्कृतीत योगाचे कित्येक प्रकारपण आहेत, उदा. निष्काम कर्म योग, आत्महित विहीन भक्ति योग आणि ज्ञान योग (विवेकपूर्ण ध्यान). जागतिक योग दिन हा योगास मान्यता देणारा एक दिवस आहे, जो २०१४ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाने स्वीकारल्यानंतर दरवर्षी २१ जून रोजी जगभरात साजरा केला जातो.

मानसिक तंदुरुस्ती, प्राचीन भारतात उगम पावलेल्या या निरोगीपणाच्या प्रथेचा जागतिक स्तरावर प्रचार करणे संयुक्त राष्ट्रांनी महत्त्वाचे मानले होते. भारतीय धर्म संस्कृतीमधील योग संकल्पनेची मांडणी श्रीमदभगवद्गीता ग्रंथात केलेली आहे. त्याच जोडीने पतंजली मुनी यांनी आपल्या योगसूत्राद्वारे मानवाच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक विकासाची संकल्पना स्पष्ट केली आहे.

याद्वारे आध्यात्मिक उन्नतीही साधता येते असे पातंजल योगसूत्र ग्रंथात सांगितले आहे. जगभरातून स्वीकारले गेलेले भारतीय संस्कृतीतील योगाचे महत्त्व अधोरेखित होण्याचे प्रयत्न या दिवसाच्या निमित्ताने होते. योग हा शब्द संस्कृत युज् या धातुपासून तयार झाला आहे. पाणिनी व्याकरणामध्ये युज् समाधौ असे सूत्र आहे. योग या शब्दाचा अर्थ जोडणे, एकत्र आणने, जुळवणे असा अनेक प्रकारे होतो.



प्रविण बागडे
नागपूर. 9923620919
pravinbagde@gmail.com

योगावर पतंजली मुनींनी जवळजवळ इ.स.पू. १५० मध्ये योगसूत्र लिहिले. पतंजलींच्या अनुसार अष्टांग योगाचे पालन करणारी व्यक्ति आपल्या मनाला शांत करू शकते आणि शाश्वत ब्रह्मात सामावू शकते. याच अष्टांग पथा ने नंतर येणाऱ्या राज योग, तंत्रयोग आणि बौद्ध (वज्रयान) योगाचा पाया घातला.

दोन वर्षांत या उपक्रमाने चळवळीचे रूप घेतले आहे. १८ जून रोजी ऑस्ट्रेलियन संसदेमध्ये माजी पंतप्रधान टोनी अबॉट यांच्या उपस्थितीत योगसत्र झाले. स्वतः अबॉट यांनी यावेळी योगासने केली. दरवर्षी एक विशेष थीम लक्षात घेऊन योग दिनाचे आयोजन केले जाते.

यंदा म्हणजे २०२५ या वर्षीची थीम एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग आहे. या थीमचा अर्थ असा आहे की, आपल्या सर्वांचे आरोग्य या पृथ्वीच्या आरोग्याशी जोडलेले आहे. जेव्हा पृथ्वी निरोगी असेल तेव्हा मानव देखील निरोगी असतील. योग हा दुवा मजबूत करण्यास मदत करतो.

हे अधोरेखित करण्यासाठी ही थीम निवडण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय योग दिन २०२५ हा एक महत्त्वाचा टप्पा आहे, या जागतिक उत्सवाचा ११ वा वर्धापन दिन आहे. एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग या थीम अंतर्गत या वर्षीचा कार्यक्रम समग्र कल्याण आणि पर्यावरणीय सुसंवाद वाढविण्यात योगाच्या महत्त्वाच्या भूमिकेवर प्रकाश टाकतो.

२०१५ मध्ये पहिल्यांदा योग दिन साजरा करण्यात आला, त्यावेळी थीम होती, सुसंवाद आणि शांततेसाठी योग. त्याच्याच पुढील वर्षी म्हणजे २०१६ मध्ये शाश्वत विकास उद्दिष्ट साध्य करण्यासाठी योग अशी थीम होती. २०१७ मध्ये आरोग्यासाठी योग, २०१८ मध्ये शांततेसाठी योग, २०१९ मध्ये हृदयासाठी योग, २०२० मध्ये घरी आणि कुटुंबासह योग, २०२१ मध्ये निरोगीपणासाठी योग, २०२२ मध्ये मानवतेसाठी योग, २०२३ मध्ये वसुधैव कुटुंबकमसाठी योग सर्वांच्या कल्याणासाठी योग, हे दर्शविण्यासाठी ही थीम निवडण्यात आली होती.

गेल्या वर्षी म्हणजेच २०२४ मध्ये महिला सक्षमीकरणासाठी योग अशी थीम ठेवण्यात आली होती. या मध्यवर्ती कल्पनेसह महिलांचे मानसिक आणि शारीरिक स्वास्थ्य वाढवण्यावर भर दिला गेला होता. महिलांचे सर्वांगीण कल्याण वाढविण्यात आणि परिवर्तनात महत्त्वपूर्ण योगदान देण्यासाठी त्यांची भूमिका महत्त्वाची आहे. हे अधोरेखित करण्यासाठी ही थीम निवडण्यात आली होती.

हा दिवस महिलांच्या शारीरिक, मानसिक, भावनिक आणि सामाजिक विकासातील प्रगती साजरी करेल, असा विश्वास ही थीम निवडतांना व्यक्त करण्यात आला होता. संयुक्त राष्ट्रसंघाचा ठराव स्वीकारल्यानंतर, भारतातील आध्यात्मिक चळवळीतील अनेक नेत्यांनी या उपक्रमाला पाठिंबा दर्शविला.

आर्ट ऑफ लिव्हिंगचे संस्थापक रविशंकर यांनी मोदींच्या प्रयत्नांचे कौतुक करतांना म्हटले आहे की, कोणत्याही तत्वज्ञान, धर्म किंवा संस्कृतीला राज्याच्या संरक्षणाशिवाय जगणे फार कठीण आहे. योग आतापर्यंत जवळजवळ अनाथाप्रमाणे अस्तित्वात आहे. आता, अधिकृत मान्यता. यूएन योगाच्या फायद्याचा आणखी प्रसार करेल.

११ डिसेंबर २०१४ रोजी भारताचे स्थायी प्रतिनिधी अशोक मुखर्जी यांनी संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत मसुदा ठराव सादर केला. मसुदा मजकूराला १७७ सदस्य राज्यांकडून व्यापक समर्थन मिळाले ज्यांनी मजकूर प्रायोजित केला, जो मताशिवाय स्वीकारला गेला.

या उपक्रमाला अनेक जागतिक नेत्यांचा पाठिंबा मिळाला. एकूण १७७ राष्ट्रांनी हा ठराव सह-प्रायोजित केला, जो अशा स्वरूपाच्या ठरावासाठी आतापर्यंतची सर्वाधिक सह-प्रायोजकांची संख्या आहे. भारतीय कॅलेंडरमध्ये, उन्हाळी संक्रांती दक्षिणायनामध्ये संक्रमण दर्शवते. उन्हाळ्यातील संक्रांतीनंतरची दुसरी पौर्णिमा ही गुरु पौर्णिमा म्हणून ओळखली जाते.

हिंदू पौराणिक कथांमध्ये, शिव, पहिला योगी (आदि योगी), या दिवशी उर्वरित मानवजातीला योगाचे ज्ञान देण्यास सुरुवात केली आणि ते पहिले गुरु (आदि गुरु) बनले असे म्हटले जाते. निरोगी तन आणि शांत मन याची गुरुकिल्ली म्हणजेच योग, त्यानिमित्त सर्वांना जागतिक योग दिनाच्या खूप खूप शुभेच्छा !!

■ ■ ■

# एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग

***योगस्थ कुरु कर्माणि***
***सङ्गं त्यक्त्वा धनजंय***
***सिद्धयसिध्दयोः समो भूत्वा***
***समत्वं योग उच्यते***

आजचे जीवन इतके गतिमान व धकाधकीचे झाले आहे की आपण आपल्या शारीरिक व मानसिक आरोग्यास वंचित झालो आहोत. जुन्या परंपरा लोप पावल्यामुळे शारीरिक कष्ट व अंगमेहनतीची कामे कमी झालीत, त्यामुळे शारीरिक तक्रारी सुरु होऊन मानसिक स्वास्थही नाहीसे झाले आहे.

शारीरिक व मानसिक स्वास्थ उत्तम रहावे यासाठी योगाभ्यास साधना करणे अतिशय उपयुक्त आहे. हा अभ्यास अंतस्फुर्तीने, स्वेच्छापुर्वक करावयाचा असतो. शारीरिक व मानसिक आरोग्याचे निवारण व्हावे यासाठी नियमित योगासने करणे काळाची गरज आहे,

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्याचा प्रस्ताव मांडला होता, ज्याला ११ डिसेंबर २०१४ रोजी संयुक्त राष्ट्रांनी मंजुरी दिली. तेव्हापासून २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा केला जातो. आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यामागे मुख्य उद्देश योगाचे फायदे जगभरात पोहोचवणे आणि लोकांना तो आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनवण्यासाठी प्रोत्साहित करणे हा आहे.

२०२५ मध्ये आपण ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करत आहोत. एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग ( yoga for One Earth, One Health) ही यावर्षीची थीम असून या थीमचा मुख्य उद्देश वैयक्तिक आरोग्यासोबतच संपूर्ण पृथ्वीच्या आरोग्यासाठी आणि पर्यावरणासाठी योगाचे महत्त्व अधोरेखित करणे आहे.

सौ. कविता फाले-बोरीकर
माहिती व जनसंपर्क कार्यालय
नागपूर.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मन की बात कार्यक्रमात ही थीम जाहीर केली होती. ही थीम वसुधैव कुटुंबकम् या भारतीय तत्त्वज्ञानावर आधारित आहे, ज्याचा अर्थ संपूर्ण जग एक कुटुंब आहे असा होतो. योगाच्या माध्यमातून आपण स्वतःला आणि पर्यावरणाला निरोगी ठेवू शकतो, हा संदेश या थीममधून देण्यात येत आहे.

योग हा भारताच्या प्राचीन परंपरेचा एक अमूल्य ठेवा आहे, जो शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर ठरतो. शरीराला लवचिक, मजबूत आणि निरोगी बनवतो. तसेच, ताण कमी करून मानसिक शांती प्रदान करतो.

योगामुळे मन शांत होते, एकाग्रता वाढते आणि नकारात्मक विचार दूर होतात. यामुळे व्यक्ती अधिक सकारात्मक आणि उत्साही बनते. नियमित योगाभ्यासामुळे रोगप्रतिकारशक्ती वाढते आणि अनेक गंभीर आजारांपासून बचाव होतो. मधुमेह, उच्च रक्तदाब, कर्करोग यांसारख्या आजारांमध्येही योगासने फायदेशीर ठरतात.

योग म्हणजे निव्वळ व्यायाम आणि आसन नव्हे. हा भावनात्मक समतोल आणि अनंत तत्वाला स्पर्श करत अध्यात्मिक प्रगतीतील सर्व शक्यतांची ओळख करुन देणारे शास्त्र आहे. योगाचा उल्लेख नारदीय सुक्त आणि सर्वात प्राचीन अशा ऋग्वेदामध्ये आढळतो.

पतंजलीचे लेखन देखील अष्टांग योगसाठी आधार बनले आहेत. जैन धर्मातील पांच प्रतिज्ञा आणि बौध्द धर्मातील योगाचाराची बीजे पतंजली योग सूत्रामध्ये आहेत. योग जीवनशैलीचा उपयोग योगाच्या अंतिम लाभांचा अनुभव होण्यास सहाय्यभूत अश्या आपले लक्ष केंद्रित करणाऱ्या काही प्रक्रियांचा उल्लेख आहे.

योगाभ्यास म्हणजे आसने, सूर्यनमस्कार, प्राणायम, एवढेच आपल्या डोळ्यासमोर येते. परंतु योगाभ्यासाची व्याप्ती खूप मोठी आहे. यामध्ये प्रार्थना, पूरक व्यायाम, आसने, प्राणायाम, मुद्रा, बंध, शुध्दीक्रिया धारण, पौष्टिक आहार इत्यादींचा समावेश होतो.

शरीरशुध्दी ही योगाभ्यासाची पहिली गरज सांगितली आहे. योगाभ्यास सहजपणे व चांगल्या प्रकारे ग्रहण करता यावा यासाठी विशिष्ट क्रमाने शिकले पाहिजे. तंज्ञाच्या मार्गदर्शनाद्वारे शिकणे उत्तम, ८४ प्रकारची आसने, २५ मुद्रा, ५ बंध, ८ प्रकारचे प्राणायम, ८ कुंभकासह धौती, नेती इत्यादी शुध्दी क्रियांचा अभ्यास योजलेला आहे.

योगाच्या अभ्यासाची सुरुवात यम-नियम पालनापासून होते. त्यापासून अपेक्षित फल प्राप्ती हवी असेल तर यम-नियम पाळलेच पाहिजे. तेथे तडजोड नाही.

योग हा शब्द युज या संस्कृत धातू पासून बनलेला आहे, त्याचा अर्थ आहे आत्म्याचे परमात्म्यात विलीन होणे. योग ही भारतातील पांच हजार वर्ष प्राचीन ज्ञानशैली आहे. पुष्कळ लोकांचा असा समज आहे की योगाभ्यास म्हणजे शारीरिक व्यायाम आहे, त्यात शरीर जाणले, वाकवले, पिळले जाते आणि अवघड श्वसन प्रक्रियांचा अवलंब केला जातो. खरेतर मानवी मन आणि आत्मा यांची अनंत क्षमता जाणून घेणाऱ्या या विज्ञानाची ही योगाभ्यासाची केवळ वरवरची ओळख झाली. योगाभ्यासामध्ये जीवनशैलीचा परिपूर्ण सारांश प्राप्त होतो.

योग अशी परिपूर्ण जीवनशैली आहे ज्यामध्ये योगाच्या सर्व प्राचीन तत्वांचा अंतर्भाव आहे, जेणेकरुन शरीर कृतज्ञ आणि शिस्तबध्द रहात तसेच मन आणि आत्मा एकत्र होऊ शकतो. एका क्रमाने प्रभावी योगासने, प्राणायम आणि ध्यानाच्या आंतरिक अनुभवावर भर दिला जातो. कारण मानसिक स्वास्थ आणि मानवी अस्तित्वाच्या काही छुप्या तत्वासाठी हे गरजेचे आहे. तेव्हाचं त्यांचे जीवन शांत, सुखद आणि परिपूर्ण होते.

योगाचे वैशिष्ट्य हे आहे की तुम्ही युवक असा कि वयोवृध्द, निरोगी असा कि आजारी, योगाभ्यास सर्वांसाठी लाभदाई आहे आणि तो सर्वांना प्रगती पथाकडे घेऊन जातो. वयपरत्वे आली आसनांची समज अधिक परिपक्व होऊ लागते. मग आपण शारीरिक आसनांसोबत अंतर्गत सुक्षतेवर अधिक कार्य करु लागतो.

योग हा आपल्यासाठी कधीही नविन नव्हता. आपण हे सर्व अगदी बालपणापासून करत आलो आहेत. मग ते पाठीचा कणा मजबूत करणारे माजारसिन असो कि पचनशक्ती वाढवणारे पवनमुक्तासन.

आपण शिशूंना दिवसभर काही न काही योग क्रिया करतांना पाहतो. प्राणायम म्हणजे आपल्या श्वासोश्वासाचे नियंत्रण आणि विस्तारीकरण, श्वासोश्वसाच्या योग्य तंत्रांचा सराव केल्यास रक्तामधील आणि मेंदूला होणारा ऑक्सिनजचा पुरवठा वाढतो. त्यामुळे प्राणशक्ती आणि जीवन ऊर्जा यांच्या नियंत्रणास मदत होते.

प्राणायम आणि योगासने हे एकमेकास पूरक आहे. या दोन योगतत्वांचा मिलाफ झाल्याचे शरीर आणि मनाच्या उत्तम प्रतीचे शुध्दीकरण व आत्म नियमन प्राप्त होते. प्राणायम ही ध्यानाच्या गहऱ्या अनुभवाची तयारी असते.

योग शिबिबरामध्ये विविध योग प्रक्रियांना शास्त्रोक्त, पूर्णपणे आणि सुलभतेने शिकवले जाते. या शिबिराद्वारे निरोगी शरीर, शांत मन, ध्यान लागणे आणि आत्मविश्वास बळावण्यासाठी सर्वांगीण समतोल प्राप्त होतो.

योगाचा नियमित सराव करणाऱ्यांच्या जीवनशैलीमध्ये उल्लेखनीय परिवर्तन होऊन त्यांचे जुने आजार नाहीसे होतात. योग आरोग्याचा आणि आनंदाचा मोठा खजिना आहे. योगाद्वारे शरीर निरोगी व मन प्रसन्न राहु शकते ही जाणीव निर्माण करुन स्व-परिवर्तनातून समाज परिवर्तन होऊ शकते.

२१ जून हा उत्तर गोलार्धातील वषार्तील सर्वात मोठा दिवस असतो, ज्याला 'ग्रीष्म संक्रांती' (Summer Solstice) असेही म्हणतात. या दिवशी सूर्यप्रकाश जास्त काळ असतो. या दिवशी शाळा, महाविद्यालये, शासकीय कार्यालये आणि विविध संस्थांमध्ये योगाचे कार्यक्रम आयोजित केले जातात, जेणेकरून जास्तीत जास्त लोक योगाचे फायदे अनुभवू शकतील.

योग ही भारताला मिळालेली मोठी देणगी आहे. भारतीय संस्कृतीचा एक अविभाज्य घटक आहे. प्रत्येक व्यक्तिला योगाचे वेगवेगळे महत्व आणि आवश्यकता आहे. योग प्रत्येकाच्या जीवनाची आदर्श दिशा ठरवण्यासाठी सहाय्य करायला दृढ संकल्प आहे. आपणही यात सहभागी होऊन निरामय आनंदी जीवन व्यथित करु या. मनाचा योग कसा साधला जातो. तुम्ही स्वतः आतून जोडून घ्या, मग मानसिक शांती कुठे बाहेर शोधावी लागत नाही....

■ ■ ■

# निरोगी आयुष्यासाठी योग..!

**भारत ही संत महंत ऋषि मुनी यांनी पावन झालेली भूमी आहे योग ही शरीराच्या मानसिक शारीरिक व आध्यात्मिक संवेदना सक्षम होण्यासाठी एक सहज केली जाणारी क्रिया असून शारीरिक दुर्बलता ठीक व्हावी यासाठी अनेक प्रकारच्या आसन व क्रियांद्वारे मानवी आरोग्य उत्तम राहुन आपल्या देशाचे सशक्त नागरिक तयार झाल्यास खरा बलशाली भारत निर्माण होण्यासाठी योग माध्यम पुरेसे आहे.**

--------------

योग हा संस्कृत शब्दाचा अर्थ जोडणे किंवा एकजूट होणे आहे म्हणजेच मनाची शांती व शारीरिक स्थिती जोड मिळाली की माणूस परिपूर्ण होतो ही ताकत योगात आहे

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संयुक्त राष्ट्र संघात २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा व्हावा यासाठी ११ डिसेंबर २०१४ रोजी प्रस्ताव मांडला जो १९३ देशपैकी १७५ देशांनी या प्रस्तावाला मान्यता देऊन हा दिवस संपूर्ण विश्वात आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून २१ जून २०१५ पासून साजरा होऊ लागला.

उमेश ज्ञानेश्वर ईखे
कृष्णा विहार, नागपूर.
9518571138



यावर्षीची संकल्पना ही एक पृथ्वी एक आरोग्यासाठी योग अशी असून २१ जुन हा उत्तरी गोलार्धात सर्वात मोठा दिवस असल्यानं आपलं आरोग्य हेही सर्वात उत्तम, मोठं राहावे म्हणूनच या दिवसाची निवड करण्यात आली

भगवान शिव यांना योगाचे प्रवर्तक म्हणजे आदीगुरू म्हटल्या जाते त्यानंतर ऋषि मुनी पासून तर भगवान कृष्ण, महावीर, भगवान बुद्ध यांनीही योगचा विस्तार केला तो पुढे पतंजली ऋषी नी शास्त्रीय योग ग्रंथात सूत्रबद्ध केला.

भारतीय संस्कृतीत योगा हजारो वर्षे पूर्वी आपल्या ऋषी मुनी यांनी आपलं आरोग्य, तन मन, तसेच ध्यान एककेंद्रि राहावे यासाठी योग आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग म्हणून जोपासला . निरोगी जीवनासाठी योगा चे शारीरिक व मानसिक फायदेही आहेत .

- मानसिक शांती व एकाग्र मन करते
- रोगप्रतिकारक शक्ति वाढविते
- शारीरिक क्षमता वाढीस लागते
- शरीराची लवचिकता वाढवते
- विविध प्रकारच्या व्याधी कमी करण्यासाठी योग प्रभावी
- निरोगी तन मन ठेवून सकारात्मक विचार वाढवते
- आत्मविश्वासाची वृद्धी करते

त्याचबरोबर योग सामाजिक स्वास्थ सुधारण्याबरोबर लोकांना जात पात धर्म सांप्रदाय विसरून एका छताखाली लोकांना एकत्र आणून एकसंघ ठेवते .

आरोग्य हीच संपत्ती असल्याने आपण सर्व रोजच्या जीवनशैली त योग करण्यासाठी वेळात वेळ काढला पाहिजे पूजा करताना ही योग करता येतो . आपली दैनंदिन कामे करता करता ही योग करता येतो . त्यासाठी काही ठिकाण, साहित्य, कोचिंग, यांची आवश्यकता नाही योग म्हणजे ध्यान, श्वासावर नियंत्रण, स्थिर बुद्धी, शरीर, मन ठेवणार प्रत्येक कृती म्हणजेच योग...

चालता बोलता उठता बसता अगदी झोपताना ही आपण काही क्रिया कृती केल्यास तोही योगच असतो. आपला भारत अधिक बलशाली सशक्त, निरोगी, सक्षम राहण्यासाठी योग आवश्यक आहे जीवनाचा निरोगी आनंद घेण्यासाठी शरिर निरोगी, मन प्रसन्न, उत्साह, स्फुर्ती, मनःशांती ही योगाच्या माध्यमातून मिळते हे सत्य नाकारता येत नाही। म्हणूनच योग करा व निरोगी राहा.

■ ■ ■

# आंतरराष्ट्रीय योग दिन

आज २१ जून, आजचा दिवस संपूर्ण जगात आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा केला जातो. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सप्टेंबर २०१४ मध्ये झालेल्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेत २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा करण्यात यावा असा प्रस्ताव मांडला.



२१ जून हा दिवस जगातील अनेक देशांमध्ये सर्वात मोठा दिवस आहे. पृथ्वीला सूर्याभोवती फिरण्यासाठी लागणाऱ्या वेगामुळे २१ जून हा दिवस इतर दिवसांपेक्षा मोठा असतो.

२१ जून रोजी उत्तरायण संपून दक्षिणायन सुरू होते. या दिवशी दिवस मोठा तर रात्र लहान असते. २१ जून रोजी सूर्योदय लवकर होतो आणि सायंकाळी जास्त वेळेपर्यंत उजेड असतो. त्यामुळे या दिवसाला विशेष महत्व प्राप्त होते म्हणून हाच दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा करावा असा प्रस्ताव पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडला. पंतप्रधान नरेंद मोदी यांच्या या प्रस्तावाला संयुक्त राष्ट्र संघाच्या १९३ देशांपैकी १७५ देशांच्या प्रतिनिधींनी पाठिंबा दिला.

सुरक्षा आयोगाचे कायमस्वरूपी सदस्य असलेले अमेरिका, इंग्लंड, फ्रांस, चीन, रशिया यासारखे देशही या प्रस्तावाचे सहप्रतिनिधी आहेत. या प्रस्तावावर विस्तृत चर्चा झाल्यानंतर डिसेंबर २०१४ मध्ये या दिनाला मान्यता देण्यात आली.

२१ जून २०१५ रोजी पहिला आंतरराष्ट्रीय योग दिन जगभर साजरा करण्यात आला. भारतीय प्राचीन संस्कृतीत योग, योगासने, योगसाधना यांना अनन्यसाधारण महत्व आहे. प्राचीन काळापासून भारतातल्या साधुसंत, ऋषीमुनींनी योगाचे महत्व, त्याचे फायदे आणि त्याची गरज पटवून दिली आहे.

तन आणि मन यांचा एकत्रित व्यायाम म्हणजे योग. आजच्या काळातील धकाधकीच्या जीवनात योगाच्या माध्यमातून आपण आपले शरीर तंदुरुस्त ठेवू शकतो ; शिवाय मनावरही चांगले संस्कार करू शकतो.

भारतातील योगाची संस्कृती जागतिक पातळीवर स्वीकारली गेली आहे. जगभरातील देशांनी योग केवळ स्वीकारला नाही, तर त्याचा प्रचार आणि प्रसारही केला आहे. कोरोनारुपी महामारीच्या काळात तर योग दिनाला विशेष महत्व प्राप्त झाले होते. कोरोना सारख्या महामारीचा मुकाबला करायचा असेल तर आपल्या शरीरातील रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यावर भर दिला पाहिजे. नियमित व्यायाम आणि योगासन यांनी आपली रोगप्रतिकारक शक्ती वाढू शकते.



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

योग कसा करावा, कोणती योगासने मनाला आणि शरीराला सक्षम ठेवू शकतात यावर अभ्यासकांनी मते मांडली आहेत त्याप्रमाणे दररोज योग साधना करणे गरजेचे आहे.

आज योग दिनानिमित्त एक दिवस योग करून त्याचे फोटो सोशल मीडियावर टाकून या दिनाचा इव्हेंट न करता सर्वांनी योगाचा अंगीकार करून नियमित सराव करावा. जगाने योगाला राजमान्यता दिली आहे आपणही नियमित सराव ठेवून योगसाधना केली तरच आजच्या योग दिनाचे सार्थक झाले असे म्हणावे लागेल.

■ ■ ■

# पित्ताचे दगड म्हणजे काय?



आता पोट फुगणे, मळमळणे आणि पोटाच्या वरच्या भागात दुखणे यासारख्या समस्या आता ४० किंवा ५० वर्ष वयोगटातील लोकांपुरत्या मर्यादित राहिलेल्या नाहीत. आजकाल २० वयवर्ष वयोगटातील तरुणांमध्येही पित्ताशयाच्या दगडांची प्रकरणे झपाट्याने वाढत आहेत. याला पित्ताचे दगड असेही म्हणतात. याचे प्रमुख कारण म्हणजे झपाट्याने बदलणारी जीवनशैली आणि खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयी.

पित्ताशयात तयार होणाऱ्या घन जमावटलाच पित्ताशयाचा दगड किंवा पित्ताशयाचा दगड म्हणतात. पित्ताशय हा एक लहान अवयव आहे जो यकृताच्या खाली स्थित असतो आणि शरीरातील चरबी पचविण्यासाठी पित्त साठवतो.

पित्ताचे दगड लहान पिंपल्सपासून ते गोल्फ बॉलइतके मोठे असू शकतात. काही लोकांना दगड झाल्यावर कोणतीही लक्षणे दिसत नाहीत, परंतु जेव्हा हा दगड पित्ताचा प्रवाह थांबवतो तेव्हा तीव्र वेदना आणि इतर गंभीर लक्षणे दिसू लागतात. ही स्थिती कधीकधी इतकी वेदनादायक बनते की रुग्णाच्या दैनंदिन कामावर वाईट परिणाम होऊ शकतो.

**फास्ट फूड आणि प्रक्रिया केलेले आहार**

बर्गर, पिज्झा, चिप्स, कोल्ड ड्रिंक्स सारख्या गोष्टींमध्ये फायबरची कमतरता असते आणि सॅच्युरेटेड फॅटचे प्रमाण जास्त असते. यामुळे पित्त जाड होण्याची आणि पित्ताशयात दगड तयार होण्याची शक्यता वाढते.

**क्रॅश डाएट आणि वेगाने वजन कमी करणे**

बरेच तरुण अचानक वजन कमी करण्यासाठी केटो आहार, अधूनमधून उपवास किंवा डिटॉक्स आहाराचे अनुसरण करतात. यामुळे यकृत अधिक कोलेस्ट्रॉल सोडते, ज्यामुळे दगड तयार होण्याची प्रक्रिया वेगवान होते.

**बसण्याच्या सवयी आणि ताण**

बराच वेळ काम करणे, ताण घेणे आणि वेळेवर न खाणे यावरही पचन आणि चयापचयावर परिणाम होतो, ज्यामुळे दगड होऊ शकतात.

**भूक लागणे आणि एकाचवेळी खूप खाणे**

जेव्हा आपण बराच वेळ उपाशी असतो आणि एकाच वेळी भरपूर अन्न खातो तेव्हा पित्ताशय व्यवस्थित आकुंचन पावत नाही, ज्यामुळे पित्त थांबते आणि दगड तयार होतात.

**पित्ताच्या दगडांची लक्षणे**

उजव्या बाजूला वरच्या ओटीपोटात तीव्र वेदना, विशेषतः तेलकट जेवणानंतर मळमळ किंवा उलट्या, पोटात सूज येणे पाठ किंवा खांद्यादरम्यान वेदना, पित्ताशयाची जळजळ, स्वादुपिंडाची जळजळ, जी प्राणघातक असू शकते. पित्ताशयाची फुटण्याची स्थिती, गंभीर रुग्णालयात दाखल करणे आवश्यक

**पित्ताच्या दगडांवर उपचार**

लॅप्रोस्कोपिक शस्त्रक्रियेद्वारे पित्ताच्या दगडांवर उपचार केले जातात. यामध्ये छोट्या छोट्या चीरांद्वारे पित्ताशय काढून टाकले जाते. ही एक सुरक्षित, प्रभावी आणि जलद रिकव्हरी आहे. एका आठवड्याच्या आत, ती व्यक्ती पुन्हा सामान्यपणे कार्य करू शकते. पित्ताशयाशिवायही शरीर सामान्यपणे कार्य करते.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### योग दिवस

**योग दिनाचे औचित्य साधुनी**
**गिरवू योगाचे धडे**
**शारीरिक मानसिक संतुलनाने**
**आनंदी जिवनाची वाट सापडे ..**

**योगदिनाच्या निमित्ताने**
**करू सुरु प्राणायाम**
**सातत्य टिकवून ठेवले तर**
**शरीर बनेल निरोग धाम...**

**हेल्थ इज वेल्थ**
**कोरोनाने केले सिद्ध**
**इम्युनिटी वाढविण्यासाठी**
**नित्य व्यायामाची ठेवू जिद्द**

# तज्ज्ञ डॉक्टरांच्या टीमने ५३ वर्षीय महिलेवर जीवन वाचवणारी यशस्वी शस्त्रक्रिया केली गंभीर श्वसनमार्ग अडथळ्याच्या प्रकरणात यश

**नागपूर, २० जून :** चंद्रपूरच्या ५३ वर्षीय महिलेला गंभीर स्थितीत वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूर येथे दाखल करण्यात आले होते. तिच्या छातीत मोठा ट्युमर आढळून आला होता जो श्वासनलिका (ट्रॅकिया)वर दाब देत होता, त्यामुळे एक फुफ्फुस पूर्णपणे बंद झाले होते आणि दुसरे जवळपास पूर्णपणे बंद होण्याच्या स्थितीत होते.

ही महिला गेल्या १० दिवसांपासून तीव्र श्वास घेण्यास त्रास, खोकला व छातीत दुखणे यासारख्या त्रासांनी पीडित होती. तिची प्रकृती २ जून २०२५ रोजी अधिकच बिघडली. सुरुवातीला वरोरा येथील रुग्णालयात प्रथम दाखल झाल्यानंतर तिच्या डाव्या वोकल कॉर्डचे पक्षाघात झाले असल्याचे निदान झाले. तिचा श्वास घेण्याचा त्रास झपाट्याने वाढल्यामुळे तिला इंट्युबेट करून तातडीने वॉकहार्ट हॉस्पिटल, नागपूर येथे हलवण्यात आले..

वोक्हार्ट येथे तपासणी दरम्यान, सीटी स्कॅन आणि डायग्नोस्टिक ब्रॉन्कोस्कोपी करण्यात आली, ज्यामध्ये छातीच्या मध्यभागी (मीडियास्टिनममध्ये) एक मोठी गाठ आढळून आली जी तिच्या श्वसनमार्गावर दाब टाकत होती. यामुळे तिची श्वासनलिका जवळजवळ पूर्णतः बंद झाली होती आणि उजव्या मुख्य ब्रॉन्कसचा मार्ग पूर्णतः बंद झाल्यामुळे फुफ्फुस कोलमडले होते व त्यात हवा अडकली होती. तसेच डाव्या ब्रॉन्कसचाही मार्ग जवळजवळ पूर्ण बंद झालेला होता.

परिस्थिती अत्यंत नाजूक असल्यामुळे एक अत्यंत गुंतागुंतीची व उच्च जोखमीची



शस्त्रक्रिया नियोजित करून यशस्वीरित्या पार पाडण्यात आली. ही शस्त्रक्रिया ईसीएमओ तज्ज्ञ डॉ. चेतन शर्मा, डॉ. राहुल हिवांज, डॉ. सुमित नारंग, डॉ. समीर अर्बट (इंटरव्हेन्शनल पल्मोनोलॉजिस्ट), डॉ. अवंतिका जयस्वाल, ऍनेस्थेटिस्ट, डॉ. बारोकर, डॉ. विजया लांजे आणि डॉ. बेलेकर यांच्या नेतृत्वाखालील बहुवैद्यकीय तज्ज्ञांच्या टीमने यशस्वीरीत्या पार पाडली.

५ जून २०२५ रोजी रुग्णावर रिजिड ब्रॉन्कोस्कोपिक क्रायोबायॉप्सी आणि इलेक्ट्रोकॉटरीद्वारे ट्युमर काढण्याची यशस्वी प्रक्रिया पार पडली. यावेळी श्वसनमार्ग खुला राहावा म्हणून वाय-आकाराचा एअरवे स्टेंट बसवण्यात आला. ही शस्त्रक्रिया व्हीव्ही-ईसीएमओ सपोर्ट (फुफ्फुसांना आधार देणारी विशेष तंत्रज्ञान) आणि यांत्रिक व्हेंटिलेशनच्या सहाय्याने पार पाडण्यात आली, कारण शस्त्रक्रियेच्या दरम्यान रक्तस्राव होण्याची आणि श्वासनलिका कोसळण्याचा धोका खूप मोठा होता.

शस्त्रक्रिया यशस्वी झाली आणि रक्तस्राव प्रभावीपणे नियंत्रणात ठेवण्यात आला. रुग्णाला आयसीयूमध्ये बारकाईने देखरेखीखाली ठेवण्यात आले तिच्या पुनर्प्राप्तीसाठी रक्त चढविणे व औषधोपचार देण्यात आले.. ७ जून रोजी करण्यात आलेल्या फॉलोअप ब्रॉन्कोस्कोपीमध्ये दोन्ही श्वसनमार्ग खुले असल्याचे स्पष्ट झाले आणि रुग्णाने उपचारांना सकारात्मक प्रतिसाद दिला.

डॉ. समीर अर्बट यांनी सांगितले की, ही एक अत्यंत दुर्मिळ आणि जीवघेणी केस होती. वेळीच केलेली आधुनिक ब्रॉन्कोस्कोपी प्रक्रिया आणि ईसीएमओ सपोर्टमुळे रुग्णाचे प्राण वाचवता आले. त्यांनी या यशस्वी उपचारामागे असलेल्या संपूर्ण वैद्यकीय टीमच्या उत्कृष्ट समन्वय आणि कौशल्याचे विशेष कौतुक केले. सध्या रुग्णाची प्रकृती स्थिर असून कॅन्सरसाठी पुढील वैद्यकीय उपचार घेत आहे. ही केस वेळेवर निदान, प्रगत पल्मोनोलॉजी प्रक्रिया आणि काळजीपूर्वक क्रिटिकल केअर उपचार यांचे महत्त्व अधोरेखित करते जे अशा आपत्कालीन प्रसंगात जीव वाचवण्यास महत्त्वाचे ठरतात.

## कैकयीमध्ये कणखरपणा, प्रामाणिकपणा आणि ममता हे गुण होते, पण तिच्यातील महत्त्वाकांक्षाच सगळ्यांच्या लक्षात राहते : हुनर हाली गांधी



**मुंबई, २० जून :** बाल हनुमनाच्या जीवनाचा आढावा घेणाऱ्या सोनी सबवरील वीर हनुमान या पौराणिक मालिकेत कैकयीची व्यक्तिरेखा उत्कृष्ट साकारल्याबद्दल हुनर हाली गांधीचे कौतुक होत आहे. अभिनयातील भावनिक गहनता आणि डौल यांच्याबद्दल ओळखल्या जाणाऱ्या हुनरने लोकांच्या तिरस्कारास पात्र ठरलेल्या कैकयीच्या व्यक्तिरेखेतील बारकावे सुंदर पद्धतीने दाखवले आहेत.

दिलखुलास गप्पांच्या ओघात हुनरने राणी कैकयीची भूमिका करण्याचा तिचा अनुभव आणि हनुमानाबद्दल आपल्याला वाटणारी श्रद्धा याविषयी आणि इतरही बरेच काही सांगितले.

१. जेव्हा तुला राणी कैकयीची भूमिका देऊ करण्यात आली तेव्हा तुझी प्रतिक्रिया काय होती?

मला खूपच आनंद झाला. चार वर्षांपूर्वी रुक्मिणीची भूमिका केल्यानंतर पुन्हा पौराणिक मालिकेत काम करण्याची माझी इच्छा होती. आणि त्याच वेळी वीर हनुमान मालिकेतील कैकयीच्या भूमिकेचा प्रस्ताव मला मिळाला. येथील कामकाजाचे वातावरण पोषक आणि व्यावसायिक आहे; खरोखर एका विशेष मालिकेचा भाग असल्यासारखे वाटते.

२. राणी कैकयीची भूमिका करण्यातील सर्वात समाधानकारक आणि कठीण भाग कोणता आहे?

या मालिकेत खूप बारीक सारिक तपशीलांवर लक्ष दिले आहे. शूटिंग करताना अवजड आभूषणे, विग, मुकुट आणि पोशाख परिधान करणे हे उन्हाळ्याच्या दिवसात फारच त्रासदायक असते. तरीही मी चेहऱ्यावर हसू कायम ठेऊन हे करते, कारण त्याद्वारे प्रेक्षकांशी जे नाते जुळते, तेच माझे बक्षीस असते. प्रेक्षक जेव्हा भावनिक स्तरावर तुमच्या व्यक्तिरेखेशी जोडले जातात, तेव्हा कष्टांचे चीज झाल्याचे समाधान मिळते.

३. कैकयी या भारतीय पुराण कथांमधील सुपरिचित आणि गुंतागुंतीची व्यक्तिरेखा असलेल्या भूमिकेत शिरण्यासाठी तू काय तयारी केलीस?

पौराणिक कथा सादर करताना एक ठहराव, डौल आणि उच्चार आणि हालचाली यांच्यात अचूकता अपेक्षित असते. कैकयी एक उत्कृष्ट योद्धा होती. त्यामुळे फिटनेस आणि समतोल गरजेचा होता. तिचे भावनिक विश्व, तिची भक्ती, श्रीरामाविषयीचे तिचे प्रेम आणि मनातील अंतर्द्वंद्व यावर मी लक्ष केंद्रित केले. बऱ्याचदा कैकयीकडे एका ठराविक दृष्टिकोनातून पाहिले जाते. पण श्रीरामाला वनवासात पाठवण्याच्या तिच्या निर्णयाच्या पलीकडे देखील तिचे व्यक्तिमत्व व्यापक आहे. ती प्रेमळ होती आणि शूर होती.

४. एक आई आणि राणी म्हणून कैकयीच्या कृतींशी तुझे भावनिक संधान कसे आहे? तिने केलेल्या निवडीबद्दल तुला सहानुभूती वाटते का?

होय. मला हे जाणवते की, बऱ्याचदा आपल्या एका चुकीवरून जग आपली परीक्षा करत असते. त्याच्या समोर इतर अनेक सत्कृत्य विसरली जातात. कैकयीच्या बाबतीत नेमके हेच झाले आहे. तिचे सामर्थ्य, प्रामाणिकपणा, ममता यांसारखे गुण असूनही ती फक्त तिच्यातील महत्त्वाकांक्षेबद्दलच ओळखली जाते. वीर हनुमान मालिकेत तिच्यातील सौम्य बाजू देखील दाखवली आहे. छोट्या श्रीरामासोबतची माझी जी दृश्ये आहेत त्यात आपलेपणा आणि प्रेम ओतप्रोत भरलेले आहे. कैकयीच्या रूपात मला एक बहु-आयामी माता आणि स्त्री दाखवण्याची संधी मिळाली आहे.

५. पौराणिक मालिकांमध्ये भरजरी पोशाख, भारदस्त भाषा आणि सेट्स असतात. सेटवर पहिल्या दिवशी या सगळ्यांचा अनुभव घेताना तुला काय वाटले?

मी अवाक झाले होते! मी स्वतः माता नसताना साक्षात श्रीरामाची माता होणे ही भावनिक आनंद देणारी बाब आहे. हीच तर अभिनयातील गंमत आहे. खऱ्या जीवनात तुम्हाला कधीही अनुभवता येणार नाही, अशा भूमिका आणि नाती तुम्हाला अभिनयाच्या माध्यमातून जगता येतात. कैकयीचा लुक आणि उपस्थिती यामुळे मला भारदस्त, कणखर वाटले आणि त्या पत्राशी मी अगदी पहिल्या दिवसापासून तद्रूप झाले.

६. या मालिकेत हनुमानाचा पराक्रम, ताकद आणि भक्ती या गुणांवर प्रकाश टाकला आहे. तुला त्यापैकी कोणता गुण सर्वाधिक प्रिय आहे?

हनुमान हा निष्ठा, निःस्वार्थता आणि विनम्रता यांचे प्रतीक आहे. दुर्दैवाने ही मूल्ये आजच्या जगात लुप्त होत चालली आहेत. विश्वास खूप क्षणभंगुर असू शकतो. घट्ट मैत्री अचानक तुटताना मी अनुभवली आहे. त्यामुळे प्रामाणिकपणा आणि इमानदारी हे गुण मला फार मौल्यवान वाटतात. नात्यामधील निखळपणा आणि अहंकाराशिवाय सेवा करण्यातील ताकद हनुमान आपल्या चारित्रातून दाखवतो.

७. तू अलीकडेच शूटिंग सुरू केले आहेस, तुझ्या सहकलाकारांशी तुझे नाते कसे आहे?

छोट्या श्रीरामाची भूमिका करणारा तन्मय ऋषी भलताच गोड आहे. पडद्यावर त्याच्याशी नाते अस्सल दिसावे, यासाठी मी त्याचे त्याच्या खऱ्या आईशी असलेले नाते समजून घेतले. तो खूपच गोड आहे आणि पटकन मदत करतो. इतक्या लहान वयात त्याच्यात जी व्यावसायिकता आहे, ती कौतुकास्पद आहे. सेटवर सगळ्यांशी मिळून मिसळून राहण्याचा आणि कामकाजाचे वातावरण सकारात्मक ठेवण्याचा माझा प्रयत्न असतो.

## ऑरिक, आयएसएके, फिक्स माय कर्ल्स हे ठरले ॲमेझॉनच्या प्रोपेल ग्लोबल बिझनेस ॲक्सेलरेटर सीजन ४ चे विजेते



नवी दिल्ली, १८ जून २०२५: ॲमेझॉन इंडिया ने आज ऑरिक, आयएसएके, फिक्स माय कर्ल्स या ब्रँडना ॲमेझॉन च्या प्रोपेल ग्लोबल बिझनेस ॲक्सेलरेटर सीजन ४ चे विजेते म्हणून जाहीर केले. हा उपक्रम भारतीय ब्रँड्सना डी टू सी (डायरेक्ट टू कंझ्यूमर) भागात ई-कॉमर्स एक्स्पोर्ट्सद्वारे जगभरातील ग्राहकांपर्यंत पोहोचण्यासाठी समर्पित पाठबळ देण्याच्या दृष्टीने डिझाइन करण्यात आला आहे. दीपक अग्रवाल यांनी स्थापन केलेला ऑरिक, विदुषी विजयवर्गीय यांनी स्थापन केलेला आयएसएके फ्रॅग्रन्स आणि अंशिता मेहरोत्रा यांनी स्थापन केलेला फिक्स माय कर्ल्स या तिन्ही ब्रँडना एकत्रितपणे ॲमेझॉन कडून १ लाख अमेरिकन डॉलर इतकी इक्विटी फ्री ग्रँट देऊन गौरविण्यात आले. त्यांच्या जागतिक पातळीवर विकास करण्याच्या प्रयत्नांसाठी ही ग्रँट देण्यात आली आहे.

ॲमेझॉन ग्लोबल सेलिंग इंडिया प्रमुख श्रीनिधी कल्वापुडी म्हणाले, प्रोपेल ग्लोबल बिझनेस ॲक्सेलरेटर सीजन ४ चे सर्व विजेते आणि अंतिम फेरीत आलेल्या ब्रँडचे मी हार्दिक अभिनंदन करतो. भारतभरातून जागतिक ब्रँड्स उभारण्यासाठी दिसणारी नवकल्पना आणि महत्वाकांक्षा पाहून खूप प्रेरणा मिळते. ई-कॉमर्स एक्स्पोर्ट्सचा वेगाने होत असलेला अंगिकारच यातून दिसून येतो. भारतीय उद्योजकांना ही संधी उपलब्ध करून देण्यासाठी आमच्या भागीदारांनी दिलेल्या पाठबळाबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत. आमचा उद्देश विविध प्रकारच्या व्यवसायांना जागतिक ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याचा आहे. प्रोपेल ची सुरुवात उदयोन्मुख कंपन्यांना जागतिक ओळख मिळवून देण्यासाठी झाली. गेल्या चार वर्षांत आम्ही मिनिमलिस्ट, सिरोना, शूमी, पीएलआईएक्स, बटरफ्लाय एज्यु, कॉन्फेक्ट यांच्यासह १२० हून अधिक भारतीय डी२सी ब्रँड्सना पाठबळ दिले. प्रोपेल एस५ च्या माध्यमातून आम्ही यावर्षी आणखी १०० भारतीय डी२सी ब्रँड्सना जागतिक बाजारात प्रवेश मिळवून देण्याचे लक्ष्य ठेवले आहे. २०३० पर्यंत भारतातून ८० अब्ज अमेरिकन डॉलरच्या ई-कॉमर्स एक्स्पोर्ट्सचे उद्दिष्ट साध्य करण्याचा हा एक महत्त्वाचा भाग आहे.

## ॲमेझॉन इंडिया भारतभरातील आपल्या ऑपरेशन्स नेटवर्कमध्ये वाढ करण्यासाठी २००० कोटी रूपयांहून अधिक गुंतवणूक करणार

**नागपूर, २० जून :** भारतात सर्वात सुरक्षित, सर्वात गतीशील आणि सर्वात विश्वसनीय ऑपरेशन्स नेटवर्क निर्माण करण्यासह ऑपरेट करण्याप्रती आपल्या कटिबद्धतेचा भाग म्हणून अमेझॉन २०२५ मध्ये २००० कोटी रूपयांहून अधिक (जवळपास २३३ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स) गुंतवणूक करणार आहे. ऑपरेशन्स पायाभूत सुविधा विस्तारित व अपग्रेड करण्यासाठी, सहयोगी सुरक्षितता व स्वास्थ्य उपक्रमांमध्ये सुधारणा करण्यासाठी आणि कंपनीच्या फुलफिलमेंट नेटवर्ककरिता नवीन टूल्स व तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी या गुंतवणूकीचा वापर करण्यात येईल. ही नवीन गुंतवणूक अमेझॉनच्या ऑप्स नेटवर्क तयार करण्याच्या गुंतवणूकीवर आधारित आहे, जी कंपनीला भारतातील सर्व सेवायोग्य पिन-कोडपर्यंत पोहोचण्यास मदत करते.

भारतात दशकाहून अधिक काळापासून कार्यरत असण्यासह आम्ही दर्जात्मक लॉजिस्टिक्स पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे, जी देशभरातील ग्राहकांना सुरक्षितपणे, त्वरित, मोठ्या प्रमाणात आणि विश्वसनीयरित्या सेवा देते. या नवीन गुंतवणूकांमधून आमच्या फुलफिलमेंट, सॉर्टेशन आणि डिलिव्हरी नेटवर्कमधील ऑपरेशन्स सतत विस्तारित व अपग्रेड करत राहण्याप्रती आमची कटिबद्धता दिसून येते. आमच्या पायाभूत सुविधा क्षमता प्रबळ करत, प्रक्रिया क्षमता वाढवत आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाची अंमलबजावणी करत आम्ही ॲमेझॉनला भारतभरातील ग्राहकांना उत्तमप्रकारे सेवा देण्यासाठी सुसज्ज करत आहोत, तसेच या सर्व प्रक्रियांमध्ये महत्त्वपूर्ण असलेले आमचे कर्मचारी, सहयोगी व भागीदारांना पाठिंबा देत आहोत,'' असे ॲमेझॉन इंडिया व ऑस्ट्रेलियाच्या ऑपरेशन्सचे उपाध्यक्ष अभिनव सिंग म्हणाले.

पायाभूत सुविधा विस्तारीकरण आणि अपग्रेडेशन

ॲमेझॉनची या गुंतवणूकांचा फायदा घेत नवीन साइट्स लाँच करण्याची आणि त्यांच्या फुलफिलमेंट, सॉर्टेशन व डिलिव्हरी नेटवर्कमधील विद्यमान सुविधा अपग्रेड करण्याची योजना आहे. ही गुंतवणूक प्रक्रिया क्षमता वाढवेल, फुलफिलमेंट गती सुधारेल आणि कंपनीच्या ऑपरेशन्स नेटवर्कमध्ये कार्यक्षमता वाढवेल, ज्यामुळे ॲमेझॉनला भारतभरातील ग्राहकांना जलदपणे आणि अधिक विश्वसनीयरित्या सेवा देण्यास मदत होईल. ॲमेझॉनच्या विद्यमान व नवीन ऑपरेशन्स नेटवर्कमधील बिल्डिंग्स अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि कार्यक्षम बिल्डिंग सिस्टम्ससह डिझाइन करण्यात आल्या आहेत, जेथे ऊर्जा वापर कमी केला जातो. ॲमेझॉन फुलफिलमेंट सेंटर्स विकलांग व्यक्तींसाठी सुरक्षित व अधिक सहजसाध्य असण्याकरिता डिझाइन करण्यात आले आहेत. कंपनी स्वास्थ्य व सुरक्षिततेच्या खात्रीसाठी कूलिंग सोल्यूशन्स, सुरक्षितता उपक्रम आणि विश्रांती कक्षांमध्ये सुधारणा करण्यावर सतत लक्ष केंद्रित करते, तसेच सर्वोत्तम कामाचे वातावरण देते. या धोरणात्मक गुंतवणूकांमधून भारतभरातील आपली ऑपरेशनल उपस्थिती मजबूत करण्यावर, तसेच विक्रेत्यांना सक्षम करण्यावर, ग्राहक सोयीसुविधा वाढवण्यावर आणि स्थानिक अर्थव्यवस्थांसाठी विकासाला गती देण्यावर ॲमेझॉनचा सातत्यपूर्ण फोकस दिसून येतो.

# कोटक सिक्युरिटीजतर्फे कोटक स्टॉकशाळेचा शुभारंभ

**मुंबई, २० जून :** भारतातील आघाडीच्या ब्रोकरेज घराण्यापैकी एक असलेल्या कोटक सिक्युरिटीजने देशभरातील गुंतवणूकदार तसेच शेअरबाजारात समभाग आणि वायदा व्यवहार करणाऱ्या व्यापाऱ्यांना (ट्रेडर्स) भांडवल बाजाराचे शिक्षण देण्यासाठी 'कोटक स्टॉकशाळा' या मोफत बहुभाषिक शिक्षण मंचाचा प्रारंभ करत असल्याची घोषणा केली आहे. कोटक निओ पवरही हा मंच उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. हा मंच दोन स्वरूपात उपलब्ध आहे:

१. व्हिडिओ-आधारित अभ्यासक्रम: हा त्रिस्तरीय अभ्यासक्रम असून त्यामध्ये लहान आणि सहज समजण्यायोग्य प्रकरणे आहेत. त्यात प्रामुख्याने मूलभूत आणि प्रगत संकल्पना समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत. हा अभ्यासक्रम सध्या हिंग्लिशमध्ये उपलब्ध आहे. तो लवकरच इंग्रजीमध्ये सुरु केला जाणार आहे.

२. मजकूर-आधारित अभ्यासक्रम: समजण्यास अतिशय सोप्या असलेल्या २०० हून अधिक प्रकरणांमध्ये हा व्यापक अभ्यासक्रम विभागलेला आहे. तो इंग्रजी आणि हिंदीमध्ये उपलब्ध आहे. लवकरच अतिरिक्त प्रादेशिक भाषेतही हा अभ्यासक्रम सुरू केला जाणार आहे.

भारतात मार्च २०२५ पर्यंत ४.९२ कोटींहून अधिक सक्रिय डीमॅट खातेधारक आहेत. त्यामुळे बहुस्तरीय आणि व्यावहारिक गुंतवणूक शिक्षणाच्या पर्यायांची गरज वाढवली आहे. भारताच्या विविध प्रदेशातून शेअरबाजारात सहभागी होण्यास इच्छुक असलेल्या व्यक्तींना कोटक स्टॉकशाळा आर्थिक साक्षरता तसेच भांडवली बाजारांबाबत उच्च-गुणवत्तापुर्ण तसेच समजण्यास सोपी, सुटसुटीत व सुलभ सामग्री उपलब्ध करुन देत ही मागणी पूर्ण करत आहे.

या नाविन्यपूर्ण शैक्षणिक व्यासपीठाच्या शुभारंभप्रसंगी बोलताना कोटक सिक्युरिटीजचे एमडी आणि सीईओ श्रीपाल शाह म्हणाले की, आर्थिक सक्षमीकरणाचा प्रारंभ ज्ञानापासून सुरू होतो, यावर कोटक सिक्युरिटीजचा ठाम विश्वास आहे. आमचे नवीन शैक्षणिक व्यासपीठ कोटक स्टॉकशाळेमध्ये व्यापक व्हिडिओ आणि मजकूर-आधारित मोफत सामग्री आहे. या सुविधेतून आम्ही प्रत्येक भारतीयासाठी, मग त्यांची पार्श्वभूमी किंवा अनुभव काहीही असो, गुंतवणूक शिक्षण अतिशय सुलभ आणि सोपे करत आहोत. अतिशय जटिल संकल्पना कोणीही समजू शकेल आणि त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी करू शकेल, अशा सोप्या, आकर्षक धड्यांमध्ये विभागून आत्मविश्वासू गुंतवणूकदारांना ज्ञानी करणे हे आमचे ध्येय आहे.

भांडवली बाजारातील ज्ञानाचे लोकशाहीकरण करण्यासाठी कोटक स्टॉकशाळेची निर्मिती करण्यात आलेली आहे. त्यामुळे प्रत्येक गुंतवणूकदार आणि ट्रेडर्सला त्यांची गुंतवणूक आणि शेअरबाजाराबाबतची समज अधिक विस्तृत होईल. तसेच त्यांचा गुंतवणूक प्रवास प्रदीर्घ काळ सुरु राहण्यास मदत होईल. वर्षाच्या अखेरीस १० अभ्यासक्रमांचा समावेश करण्यासाठी या मंचाचा विस्तार करण्याचे फर्मचे उद्दिष्ट आहे.

कोटक सिक्युरिटीजचे अध्यक्ष आणि मुख्य डिजिटल व्यवसाय अधिकारी आशिष नंदा म्हणाले, आजच्या गतिमान आर्थिक परिस्थितीत, सतत शिकणे हा केवळ एक फायदा नव्हे तर ती एक गरज आहे. आमचा नवीन मंच नवख्या आणि अनुभवी ट्रेडर्सना सेवा पुरविण्यासाठी तयार करण्यात आलेला आहे. बाजारात प्रथमच प्रवेश करणाऱ्यांचा पाया मजबूत करण्यासाठी आम्ही विविध स्तरात त्यांना समजण्यास सोपी शैक्षणिक सामग्री प्रदान करत आहे. तर अनुभवी ट्रेडर्सची धोरणे सुधारण्यासाठी आणि बाजारातील प्रवाहांच्या ते सदैव पुढे राहण्यासाठी आम्ही त्यांच्यासाठी प्रगत मॉड्यूल तयार करण्याची योजना आखत आहोत. प्रत्येक गुंतवणूकदाराला यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेल्या ज्ञानाने सक्षम करण्याची आमची वचनबद्धता या उपक्रमातून प्रतिबिंबित होते.

## ईस्टमन कंपनीने प्रगत सौर उत्पादनांच्या श्रेणीसह महाराष्ट्रात केला अक्षय ऊर्जा क्षेत्रात विस्तार

**नागपूर, २० जून :** सौरऊर्जा उत्पादनांच्या क्षेत्रातील आघाडीची कंपनी ईस्टमन ऑटो ॲण्ड पॉवर लिमिटेड ने महाराष्ट्रात उच्च कार्यक्षमतेच्या सौरऊर्जा उत्पादनांच्या व्यापक श्रेणीसह विस्तार सुरू केला आहे.राज्यातील विश्वासार्ह आणि शाश्वत ऊर्जेची वाढती गरज लक्षात घेता, ईस्टमन आता ग्रीड टाय इन्व्हर्टर, हायब्रिड इन्व्हर्टर, ऑफ-ग्रीड इन्व्हर्टर, लीड-ॲसिड व लिथियम बॅटऱ्या आणि सौर पॅनेल्स यांचा समावेश असलेली उत्पादनांची सशक्त श्रेणी सादर करत आहे. ही सर्व उत्पादने निवासी, व्यावसायिक आणि औद्योगिक ग्राहकांच्या गरजा लक्षात घेऊन विकसित करण्यात आली आहेत. ईस्टमनची इन्व्हर्टर श्रेणी रूफटॉप सौर प्रणालीशी अखंडपणे एकत्रित होईल, अशा प्रकारे डिझाइन करण्यात आली आहे. या प्रणालीच्या साहाय्याने वापरकर्त्यांना अतिरिक्त सौरऊर्जा निर्माण करून ती ग्रीडमध्ये पाठविता येते. परिणामी, वीज बिलात लक्षणीय घट होते आणि पर्यावरणपूरक ऊर्जेच्या वापराला प्रोत्साहन मिळते. महाराष्ट्र आपल्या सौरऊर्जा प्रयत्नांना गती देत असताना, ईस्टमनच्या प्रगत सौर उपायांचा उद्देश पारंपरिक ऊर्जा स्रोतांवरील अवलंबित्व कमी करणे आणि राज्याच्या स्वच्छ ऊर्जा उद्दिष्टांमध्ये योगदान देणे हाच आहे. पुणे, छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नागपूर, लातूर, सांगली आणि कोल्हापूर यांसारख्या प्रमुख बाजारपेठांमध्ये वेगाने वाढणारी उपस्थिती असलेल्या ईस्टमनने, मजबूत डीलर नेटवर्कद्वारे सर्व सौरऊर्जा उत्पादनांची सहज उपलब्धता सुनिश्चित केली आहे. हा एकच समाधानकारक दृष्टिकोन तुमच्या सर्व सौरऊर्जेशी संबंधित गरजांची पूर्तता करतो, ज्यास तज्ज्ञांचे तांत्रिक सहाय्य आणि शहरी तसेच ग्रामीण भागांमध्ये विश्वासार्ह विक्री-पश्चात सेवा लाभते.

## उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिकेत कैरी आणि तिची भावंडे युगच्या घरात राहायला जाणार म्हणजे नक्कीच गोंधळ माजणार!

**मुंबई, २० जून :** सोनी सबवर नुकत्याच सुरू झालेल्या उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिकेचे आगळेवेगळे कथानक आणि त्यातील जिवंत पात्रे, यांच्यामुळे ही रोमँटिक मालिका लोकांना आवडते आहे. अगदी सुरुवातीपासून आता कथानकात काय घडणार याची प्रेक्षकांना उत्कंठा वाटू लागली आहे. त्यात युग सिन्हा (शब्बीर अहलूवालिया) आणि कैरी शर्मा (आशी सिंह) यांच्यात तणाव वाढतो आहे आणि भूतकाळातील वादळाने त्यांना घेरले आहे. अलीकडच्या भागांमध्ये, कैरी युगला कोर्टात हरवते त्यामुळे त्याचा बदला घेण्याचे सत्र सुरू होते. पण हे सगळे काही अचानक बदलते, जेव्हा युगच्या आईला कैरीमध्ये तिच्या दिवंगत मुलीची-लताची झलक दिसते!

मायरी (सुप्रिया शुक्ला)चा अपघात होतो आणि कैरी तिच्या मदतीस धावून येते. त्यामुळे युगला त्याच्या मनाविरुद्ध, कैरीला त्यांच्या घरी आणण्यासाठी ती भाग पाडते. युग कैरी आणि तिच्या भावंडांना आपल्या घरी घेऊन येतो. आता सिन्हा आणि शर्मा एका छताखाली आल्यामुळे भयंकर, अनियंत्रित गोंधळ माजतो. हा गोंधळ कमी करण्यासाठी युग त्यांना आउटहाऊस मध्ये राहण्याची जागा देतो. पण तरीही शांतता मिळत नाहीच. युग आणि कैरी यांच्यात चकमक होतच राहते. कधी खेळकरपणे तर कधी घोटाळा होऊन ते एकमेकांचे कपडे घालतात. नकळत त्यांच्यात एक नाते निर्माण होऊ लागते. त्याच वेळी कैरीचे वडील कुंदन (माधवेंद्र झा) धमकी देऊन जातात की तिच्या भावंडांना ते हिरावून नेतील. युगला नाईलाजाने आपल्या क्लेशदायक भूतकाळाशी सामना करावा लागतो, ज्यामध्ये त्याच्या भावंडांबद्दलचे काही तरी गुपित आहे, खोट्या सह्या केल्याचे प्रकरण आहे आणि लखनौशी संबंधित एक कहाणी आहे. रोमान्स आणि भीती यांची टक्कर होते आणि युग आणि कैरी यांना आपल्या प्रियजनांसाठी काय पणाला लावावे लागणार आहे हा प्रश्न उभा राहतो.


## आज का अंदाज

शनिवार २१ जून २०२५

पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ५ | ६ | ९ | ३ | ७ | ८ | ० |
| १५६ | २३० | १६९ | २३४ | १५७ | २६९ | १२५ | १९० |
| २३७ | ३५७ | २४० | ४५० | ३३७ | २४० | २२४ | २८० |
| ३३६ | १२२ | ३५८ | ३६० | २२९ | ४४९ | ३७८ | ४६० |
| २३ | ५३ | ६४ | ९४ | ३२ | ७१ | ८२ | ०३ |
| २१ | ५१ | ६० | ९० | ३५ | ७३ | ८५ | ०४ |
| २७ | ५७ | ६८ | ९८ | ३६ | ७८ | ८९ | ०५ |

२१ जून : सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| ०२ | १२ | ४३ | ७३ |
| ०६ | १६ | ४४ | ७७ |
| ०९ | १९ | ४५ | ७५ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


## राशीभविष्य

**मेष :** कामाच्या ठिकाणी वरिष्ठ अधिकाजयाकडून मार्गदर्शन आणि आदर मिळाल्याने तुम्ही भारावून जाल. प्रेमसंबंधांमध्ये एकमेकांवरील विश्वास आणि प्रेम वाढेल. दारूपासून दूर राहा.

**वृषभ :** आज तुम्हाला तुमच्या सासरच्या लोकांकडून चांगली बातमी मिळेल. बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये काम करणाजया लोकांना परदेशात जाण्याचे आमंत्रण मिळेल. प्रगती होईल आणि यशही मिळेल.

**मिथुन :** आज संपत्ती आणि मालमत्तेत वाढ होईल. कामासोबत इतर जबाबदारीमुळे तुम्हाला थकवा जाणवेल. बेरोजगारांना रोजगार मिळेल. चैनीच्या वस्तूंवर जास्त पैसे खर्च कराल.

**कर्क :** आज तुम्हाला व्यवसायात किंवा नोकरीत अडथळे येऊ शकतात. कामाच्या ठिकाणी संघर्षानंतर काही यश मिळण्याची शक्यता आहे. तुमच्या स्वत:च्या चुकांमुळे तुम्हाला नुकसान सहन करावे लागू शकते.

**सिंह :** कामाच्या ठिकाणी येणारे अडथळे काही प्रमाणात कमी होतील. जवळच्या सहकाजयांशी मतभेद निर्माण होऊ शकतात. काळजीपूर्वक वागा. समन्वय बिघडू देऊ नका.

**कन्या :** आज आरोग्याशी संबंधित समस्या असतील. हाडे, पोट आणि डोळ्यांशी संबंधित आजारांपासून सावधगिरी बाळगा. निष्काळजीपणा गंभीर समस्येला आमंत्रण देऊ शकतो, तब्येतीची काळजी घ्या.

**तुळ :** आज तुम्हाला एखाद्या नको असलेल्या प्रवासाला जावं लागण्याची शक्यता आहे. तुमचे वरिष्ठ जे काही सांगतात ते नेहमी मान्य करा. आज तुमच्या कामात बदल होऊ शकतो.

**वृश्चिक :** आज एखादी अशी घटना घडू शकते ज्यामुळे कामाच्या ठिकाणी तुमचा प्रभाव वाढेल. राजकीय लोकांना उच्चपदस्थ व्यक्तीकडून मार्गदर्शन मिळेल. सरकारमधील लोकांशी जवळीक वाढेल.


**धनु :** नोकरीसाठी दिलेल्या मुलाखतीत किंवा परीक्षेत तुम्हाला यश मिळू शकते. तुमच्या कमकुवतपणा सुधारण्याचा प्रयत्न करा. समस्या जास्त वाढू देऊ नका. त्या लवकर सोडवण्याचा प्रयत्न करा.

**मकर :** तुमच्या कामात सुरू असलेल्या समस्या सुटतील. प्रगती आणि लाभाचे मार्ग खुले होतील.प्रवासादरम्यान तुम्हाला नवीन मित्र मिळतील. शेतीच्या कामातील अडथळे दूर होतील.

**कुंभ :** अनोळखी व्यक्तीवर डोळे झाकून विश्वास ठेवू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते. कार्यक्षेत्रात प्रगती आणि नफा मिळण्याची शक्यता आहे. तुमच्या कामाला सकारात्मक दिशा द्या.

**मीन :** आर्थिक बाबींमध्ये, भांडवली गुंतवणूक इत्यादी काळजीपूर्वक विचार करून निर्णय घ्या. नवीन मालमत्ता खरेदी आणि विक्रीसाठी हा काळ चांगला असेल. पैसे परत मिळण्यास उशीर झाल्यामुळे तुम्ही अस्वस्थ व्हाल.

# शब्दकोडे क्रमांक २१४२




**आडवे शब्द :-**
१) हाकलून देणे
७) सद्वर्तनी, शीलयुक्त
१०) वधू
११) गोजी, पाडी
१३) पोळी भाजण्याचे पात्र
१४) पंख
१६) कपाची जोडीदार
१७) धुणे
१९) कावळा
२१) वेल
२३) वकिलीचे प्रमाणपत्र
२६) प्रज्वलित, तापलेले
३०) सुंदर युवती
३२) हिंदीत मोठेपणा
३३) दारुचा एक प्रकार
३४) हावरटपणा
३५) रस्ता, मार्ग
३६) दाभाड, तोंड
३७) जिवलग मित्र
३८) वृद्धत्व
३९) नम्र, वाकलेला
४०) बालक, मूल
४१) नाग
४२) जैन साधु
४४) दहा
४६) दया, कीव
४८) रवाळ
५०) सेवक
५१) रम्य
५४) चिमण्यांचा मंजूळ आवाज
५७) मेंढा, अज
६०) मज्जाव
६२) अन्न जळू लागणे
६३) चरण
६४) अपमान
६६) गुणाकार
६७) वेदनेची उसळी
६८) गणपती
७०) गाय
७१) बायको
७३) किंमत
७५) पुष्परस
७६) मृत्तिका पात्र
७९) माशी
८०) रविवासर
८१) शपथ
८२) सडपातळ

**उभे शब्द :-**
२) कानाजवळचा भाग
३) बारीक केस
४) कसोटी, चाचणी
५) टरफल
६) मुख
७) चंद्र
८) सत्ता
९) बारा वर्षांचा काळ
११) अरण्य
१२) वड
१५) पंचवीसाव्या वर्धापन दिवसाचा सण
१८) लसुणाची पाकळी
२०) पुष्कळ
२२) धुंद, मस्त, जहाजातून आणलेला माल
२४) ओलसर हवा
२५) मनसोक्त
२७) फळांपासून केलेले पेय
२८) रक्तवाहिनी
२९) खाऱ्या पाण्याचा समुद्र
३१) चामखीळ
३५) स्तुती
३६) पिता, सीतेचे वडील
३७) पचपचीत
४०) माराची उमटलेली खूण
४३) क्वचित
४५) मंदवासर
४६) कौशल्य
४७) चकणी
४९) कीर्ती, आवाज
५२) बंदी
५३) जावळा
५५) चिकटणारा, लगटणारा
५६) फुटपाथवरील छोटेसे दुकान
५८) ललाट
५९) अभिप्राय
६१) अनेक प्रकार
६४) सुरुवातीला, प्रथम
६५) गुप्तपणे शत्रुची माहिती काढणारा
६६) धरणे, स्वयंपाक घरातील एक चिमटा प्रकार
६७) युक्ती
६९) एक शब्दालंकार
७२) प्रवेशकर
७४) सूर्याचे एक नाव
७५) करपलेला भाग
७७) कुंतल
७८) दोन मैलाचे अंतर

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## महत्त्वाचे

### भाजपच्या विकसित भारत चित्र रथाचे बोपेगाव येथे स्वागत

**दिंडोरी ।** मोदी सरकार स्थापनेला 11 वर्ष पूर्ण झाल्याबद्दल भारतीय जनता पार्टी च्या वतीने सेवा, सुशासन, गरीब कल्याण या त्रिसूत्रीच्या



आधारे केंद्र सरकारने केलेल्या विकासकामांची माहिती देणारा चित्ररथ आज बोपेगाव येथे आला असता ग्रामस्थांच्या वतीने स्वागत करण्यात आले. देशातील मोदी सरकारला 11 वर्ष पूर्ण झाले असून या काळात विकसित भारताचा अमृत काळ सेवा, सुशासन, गरीब कल्याणाची 11 वर्ष या उपक्रमांतर्गत संपूर्ण देशभरात विविध उपक्रम राबवण्यात येत असून चित्ररथा द्वारे व माहिती पत्रकाद्वारे जनतेला शासनाच्या विविध योजनाची माहिती दिली जात आहे. नाशिक दक्षिण जिल्हाध्यक्ष प्रा सुनील बच्छाव यांच्या नेतृत्वाखाली सरचिटणीस मनिषाताई बोडके, शरद कासार, अमोल पवार, रणजीत देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण जिल्हाभर मंडळ निहाय गावोगावी हा चित्ररथ जाणार असून आज वणी मंडळातर्गत आला असता मौजे बोपेगाव, वणी, लखमापूर फाटा या ठिकाणी नागरिकांनी उस्फूर्तपणे स्वागत केले. यावेळी वणी मंडळ भारतीय जनता पार्टी अध्यक्ष वसंतराव कावळे, बोपेगाव उपसरपंच योगेश कावळे, महेश कावळे, अविनाश कावळे, बबनराव पगार, बाळासाहेब पगार, सोमनाथ वाघचौरे, रंगनाथ भवर, रामनाथ कावळे, राजेंद्र कावळे, प्रदीप कावळे, केशव कावळे, विलास कावळे, बाळासाहेब कावळे आदींसह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

### ओझरला पावसामुळे जनजीवन विस्कळीत

**ओझर ।** परिसरात गेल्या काही दिवसांपासून होत असलेल्या मुसळधार व संततधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे.



आठवडे बाजारात देखील याचा परिणाम दिसून आला.ओझरच्या बाजारपेठेत व परिसरातील उपनगरांमध्ये चिखलाचे साम्राज्य पाहायला मिळाले. संततधारेमुळे बाणगंगा नदीला देखील पहिलाच पुर आला आहे. मारुती वेशी जवळ असलेल्या पुलाला पाणी लागले आहे. काल रात्री साडे सात वाजेला जोरदार मुसळधार पावसाला सुरवात झाली मुसळधार पावसामुळे सर्व रस्त्यावर पाणी दुथडीभरुन वाहत होते. रस्त्यांना नदीचे स्वरूप प्राप्त झाले.साडेसात वाजेला सुरु झालेला मुसळधार पाऊस रात्रभर व दुसऱ्या दिवशी दुपारी अडीच वाजेपर्यंत सततधार सुरु होता. नित्य दिसणारा ढगांचा गडगडाट व विजांचा कडकडाट नसला तरी मुसळधार पावसामुळे ठिक ठिकाणी असलेल्या सखल भागात पाणी साचल्याने तेथे तळ्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. दरम्यान सर्वदूर पडत असलेल्या संततधार पावसामुळे ओझर येथे बाणगंगा नदीला पुर आला आहे. पूर पाहाण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली.

### इच्छामणी विद्यामंदिर शाळेत परदेशी पाहुण्यांचे आगमन

**नाशिक ।** उपनगर इच्छामणी विद्यामंदिर एज्युकेशन सोसायटी संचलित इच्छामणी विद्यामंदिर या शाळेत इन्फोटेक फौंडेशन व डब्लएनएसच्या संयुक्त विद्यमाने शाळेत संगणक वर्ग घेतले जातात. त्याच डब्लू एन एस संस्थेचे



लिओनार्ड म्यॅकुली, जेस रिपब्लिक स्कॉटल्यांड यांनी शाळेस भेट दिली. परदेशी पाहुण्यांचे स्वागत लेझीम पथकाने व औक्षण करून करण्यात आले. मंचावर लिओनार्ड, संस्थेचे सेक्रेटरी प्रा.मधुकर कऱ्हाडकर, माध्यमिक मुख्याध्यापिका संगीता कपिले, प्राथमिक मुख्याध्यापिका सुलक्षणा कोकणे, इंग्रजी माध्यम मुख्याध्यापिका अंजली दलाल, शाळा समन्वयक ज्योती सोनावणे, डब्लू एन एस चे सागर शिंदे, योगेश जाधव, यादव, मृणाली उगले आदी उपस्थित होते. पाहुण्यांच्या हस्ते सरस्वती पूजन झाले. स्वागतगीतातूनच स्वागत करण्यात आले. पाहुण्यांचा सत्कार संस्थेचे सेक्रेटरी यांनी केला. शाळेच्या कार्याची माहिती भाग्यश्री जाधव यांनी सांगितली. विद्यार्थ्यांनी भारतीय सांस्कृतिक कार्यक्रम व योग प्रात्यक्षिक सादर केली. लिओनार्ड म्याकुलींनी त्यांचे मनोगत सादर केले. प्रत्यक्ष वर्गात व संगणक कशात भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. संस्थेचे सेक्रेटरी मधुकर कऱ्हाडकर यांनी शाळेच्या योगा साठी उषा प्रतिष्ठान तर्फे शाळेस 5001 रोख देणगी दिली. योगाचे महत्व इंग्रजी माध्यमाचा विद्यार्थी अवेध भवर यानी सांगितली.सूत्रसंचलन साक्षी हिवाळे व चैत्राली शेजवळ यांनी केले.

## खर्डे निवाणे बारी घाटाची साफसफाई

### वाहनधारकांमध्ये समाधान



**देवळा ।** जिल्हा परिषदेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने येथील निवाणेबारी घाटात वाहतुकीला अडथळा होऊ पहाणाऱ्या रस्त्यावरील दुतर्फा दगड जेसीबीच्या सहाय्याने बाजूला सारून घाट रस्त्याची साफसफाई केल्यामुळे वाहनधारकांनी समाधान व्यक्त केले आहे. देवळा व कळवण तालुक्याला जोडणारा निवाणे बारी घाट रस्ता खर्डे पंचक्रोशीतील नागरिकांसाठी लाभदायक असल्याने या मार्गावरून दिवसेंदिवस वाहतुकीची वर्दळ वाढली आहे. पावसाळ्यात या घाटात दरड कोसळण्याचा प्रकार घडतो. यामुळे वाहनधारकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होते. निवाणे गावाकडून घाट माथ्या पर्यंत काँक्रीटीकरण करण्यात आले असून तालुक्यातील मुलूखवाडी ते घाट माथ्यापर्यंत डांबरी रस्ता आहे. मात्र घाटाच्या मध्यवर्ती भागात रस्त्यावर मोठं मोठे दगड पडले असल्याने वाहतुकीला याचा अडथळा निर्माण झाला होता. याची जि. प. च्या सार्वजनिक बांधकाम विभागाने दखल घेऊन मंगळवार दि. १७ रोजी जेसीबीच्या साह्याने दुतर्फा पडलेले दगड हटवण्यात येऊन साफसफाई करण्यात येऊन रस्ता मोकळा करण्यात आला. यामुळे वाहनधारकांनी सुटकेचा निःश्वास सोडला असून, समाधान व्यक्त करण्यात आले आहे . माजी राज्यमंत्री स्व. ए. टी. पवार यांच्या विशेष प्रयत्नांतून डोंगर फोडून घाट रस्ता तयार करण्यात आला आहे. देवळा तालुक्यातील खर्डे सह कणकापूर, शेरी, वार्शी, मुलूखवाडी या परिसरातील नागरिक या मार्गाचा कळवणकडे जाण्यासाठी या मार्गाचा वापर करत असून, भविष्यात या मार्गावरून एसटी बस सेवा सुरू झाल्यास अधिक सोयीचे होणार आहे. याकामी लोकप्रतिनिधींनी लक्ष घालावे, अशी मागणी या परिसरातील नागरिकांनी केली आहे.

## उमराणे येथे जाणता राजा मित्र मंडळातर्फे वही विक्री केंद्राचा शुभारंभ

**देवळा ।** उमराणे येथे हिंदवी स्वराज्य संकल्पक राजमाता जिजाऊ मासाहेब यांच्या स्मरणार्थ जाणता राजा मित्र मंडळाच्या वतीने चालू शैक्षणिक वर्षासाठी शालेय विद्यार्थांसाठी "ना नफा ना तोटा" या तत्वावर आधारित वही विक्री केंद्राचा शुभारंभ करण्यात आला . कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजेंद्र देवरे होते. जाणता राजा मित्र मंडळाच्या स्थापनेपासून म्हणजेच गेल्या ३२ वर्षापासून प्रत्येक क्षेत्रात विविध समाजकल्याणकारी उपक्रम राबवले जातात. यावर्षीही छत्रपती संभाजीराजे चौकात प्रथमतः राजमाता जिजाऊ मासाहेब यांच्या प्रतिमेचे पूजन विस्तार अधिकारी नंदकुमार देवरे यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच "ना नफा ना तोटा" तत्वावर आधारित वही विक्री केंद्राचे उद्घाटन सेवा निवृत्त लिपिक कैलास देवरे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणुन माजी



चेअरमन नानाजी देवरे, भरत देवरे, हिरामण देवरे, शांताराम जमधाडे, शिक्षक हेमंत देवरे, रामराव देवरे, संजय देवरे, केदा देवरे, पुंडलिक गायकवाड, राजाराम देवरे, गोरख देवरे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मंडळाचे अध्यक्ष नंदन देवरे यांनी प्रस्ताविक केले. राजेंद्र देवरे यांनी जाणता राजा मित्रमंडळाच्या वतीने विविध समाजपयोगी उपक्रम गेल्या अनेक वर्षापासून अखंडपणे सुरु असल्याने नवतरुणांना आदर्श निर्माण करण्याचे काम मंडळाच्या माध्यमातून होत असल्याने या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले.

## राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र येतील विषयाला आता पूर्णविराम : पाटील

**देवळा ।** राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र येतील या भ्रमात न राहता या विषयाला आता पूर्णविराम मिळाला असून, आगामी होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकीसाठी गट, गणनिहाय नियुक्त्या करून पक्षाशी प्राणिक व निष्ठावंतांना संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहोत अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) जिल्हाध्यक्ष दत्तात्रय पाटील यांनी दिली.



त्यासाठी स्थानिक पदाधिका-यांनी कामाला लागावे. भाजपा हा आपला विरोधक असल्याने आपण आपल्या पक्षाच्या चिन्हावर निवडणुका लढणार आहोत. वरिष्ठ पातळीवरून पक्षनिरीक्षकांची नेमणूक करण्यात आली असून ते तालुका निहाय आढावा घेणार आहेत. यासाठी आपल्या तालुक्यात तशी तयारी ठेवा, असेही पाटील यांनी सांगीतले. आगामी होऊ घातलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या पंचवार्षिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर देवळा येथे ता. १८ रोजी मोजक्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली. यावेळी खासदार भास्कर भगरे उपस्थित होते.

खा.भगरे यांनी सांगितले की, होऊ घातलेल्या निवडणुकीसाठी बूथ कमिट्या तयार करा, गट गण निहाय बैठका घेऊन त्याची रूपरेषा तयार करा. म्हणजे वेळेवर धावपळ होणार नाही. तरुणांना संधी मिळेल असे अपेक्षित आहे. याप्रसंगी मविप्रचे संचालक विजय पगार, माजी संचालक डॉ. विश्राम निकम, तालुका अध्यक्ष पंडितराव निकम, वासोळचे सरपंच स्वप्नील पाटील, उमराणे बाजार समितीचे संचालक प्रा. सतीश ठाकरे, आर. एन. शिरसाठ, चिंतामण आहेर, डॉ. संजय निकम, जितेंद्र आव्हाड युवा मंचचे जिल्हाध्यक्ष सचिन सूर्यवंशी, डॉ. चंद्रकांत पाटील आदी पदाधिकारी उपस्थितीत होते.

## सटाणा रस्त्यावरील अपघातात वृद्धेचा जागीच मृत्यू, चार जण जखमी

**देवळा ।** राज्यमार्ग क्रमांक २७ वरील सटाणा-खामखेडा रस्त्यावर खामखेडा शिवारात बुधवारी (दि. १८) सकाळी अकराच्या सुमारास एक दुर्दैवी अपघात घडला. तीन चाकी रिक्षा पलटी होऊन झालेल्या या दुर्घटनेत एका ६८ वर्षीय वृद्ध महिलेचा जागीच मृत्यू झाला असून चार प्रवासी जखमी झाले आहेत. मालेगाववरून कळवणकडे जाणारी रिक्षा (क्रमांक MH 19 AX 9784) खामखेडा चौफुलीच्या अलीकडे असताना चालकाचे नियंत्रण सुटल्यामुळे पलटी झाली. काही अंतर फरफटत गेल्याने रिक्षातील शांताबाई रामदास राऊत (वय ६८, रा. सोयगाव, ता. मालेगाव) या रस्त्यावर आदळून डोक्याला गंभीर इजा झाली व तीव्र रक्तस्त्रावामुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला.



रिक्षामधील सर्व प्रवासी मुलगी पाहण्याच्या कार्यक्रमासाठी जात असताना हा अपघात घडला. यामध्ये सुनीता कैलास मोरे, भोला कैलास मोरे, गुंडू कैलास मोरे (सर्व रा. मालेगाव कॅम्प) तसेच वीर युवराज कुवर (रा. द्याने, ता. मालेगाव) हे जखमी झाले असून अपघाताची माहिती मिळताच खामखेडा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या रुग्णवाहिकेने तातडीने घटनास्थळी धाव घेऊन जखमींना कळवण उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेबाबत देवळा पोलीस ठाण्यात अपघाताचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे . अधिक तपास पोलीस निरीक्षक सार्थक नेहेते करीत आहेत.

## रस्ता सुरक्षिततेचे भान राखणे ही प्रत्येक नागरिकांची जबाबदारी : आ. बनकर



**पिंपळगाव बसवंत ।** वाढत्या अपघातांमुळे होणारे प्राणहानीचे प्रमाण अत्यंत चिंताजनक आहे. त्यामुळे प्रत्येकाने वाहतुकीच्या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. शिक्षण, स्वयंसेवी संस्थांनी आणि नागरिकांनी एकत्र येऊन रस्ता सुरक्षेबाबत जनजागृती केली पाहिजे. रस्त्यावर सुरक्षिततेचे भान राखणे ही केवळ सरकारची नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन निफाड तालुक्याचे आमदार दिलीपकाका बनकर यांनी यांनी केले. मविप्र संस्थेच्या कर्मवीर काकासाहेब वाघ महाविद्यालय पिंपळगाव बसवंत येथे रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते. यावेळी पोलीस उपनिरीक्षक परदेशी, प्राचार्य डॉ. सुरेश जाधव, पोलीस हवालदार तुषार झाल्टे, राहुल मोरे, प्रकाश सगळे, उपप्राचार्य दिलीप माळोदे, प्रा.हेमंत पाटील, प्रा. राजेंद्र खांडगे, प्रा.संदीप जगताप आदी उपस्थिती होते.

यावेळी प्राचार्य जाधव यांनी शाळकरी मुलांमध्ये रस्ता सुरक्षा जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यावर भर दिला, त्याबद्दल पोलिस प्रशासनाने कामगिरीचे कौतुक केले. अपघात टाळण्यासाठी हेल्मेट, सीट बेल्टचा वापर, सिग्नल पाळणे यासारख्या नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. हेमंत पाटील यांनी केले, तर आभार प्रा. संदीप जगताप यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील शिक्षक वृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मल्हारवाडी ग्रामपंचायतच्या सरपंचपदी अश्विनी खैरनार यांची बिनविरोध

**नांदगाव ।** तालुक्यातील मल्हारवाडी ग्रामपंचायतच्या सरपंच पदी सौ आश्विनी मुकुंदा खैरनार यांची बिनविरोध निवड झाली. आवर्तन पद्धतीने ठरल्यानुसार चित्रा मधुकर इघे यांनी आपल्या सरपंच पदाचा राजीनामा दिला होता. राजीनामा दिल्यानंतर रिक्त झालेल्या सरपंच पदासाठी दिनांक 17 जून 2025 रोजी मंगळवारी मारवाडी ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामपंचायत सदस्य यांची विशेष सभा बोलविण्यात आली होती. या सभेत सरपंच पदासाठी आश्विनी खैरनार यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांचा बिनविरोध निवडीचा मार्ग सुकर झाला. निर्णय अधिकारी तथा मंडळ अधिकारी सुवर्णा गोडे व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तलाठी सचिन मोरे यांनी अश्विनी खैरनार यांची सरपंच पदी बिनविरोध निवड झाल्याचे घोषित केले.



त्यांना ग्रामपंचायत अधिकारी आर एम मगर, ग्रामपंचायत कर्मचारी कृष्णा बावणे यांचे सहाय्य लाभले.

या विशेष सभेस मल्हारवाडी ग्रामपंचायतचे उपसरपंच दीपक खैरनार, ग्रामपंचायत सदस्य सारिका जेजुरकर, चित्रा इघे, मीना गोविंद, सरला काकळीज, शोभा पिठे, सुनंदा झेंडे, ग्रामपंचायत सदस्य राहुल पवार आदी उपस्थित होते. या निवडीनंतर ढोल ताशांच्या गजरात व फटाक्यांच्या आदेश बाधित जल्लोष साजरा करण्यात आला. नवनिर्वाचित सरपंच अश्विनी खैरनार यांचे नांदगाव तालुक्याचे आमदार सुहास अण्णा कांदे यांच्यावतीने युवा नेते सागर हिरे, नांदगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक अमोल नावंदर, तसेच नांदगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती सतीश बोरसे, अर्जुन (बंडू) पाटील यांनी सत्कार करून अभिनंदन केले.

यावेळी नाशिक जिल्हा परिषदेचे माजी सदस्य रमेश बोरसे, शिवाजीराव पाटील, संजय सानप, संतोष गुप्ता, डॉक्टर वाय पी जाधव, बाजार समितीचे सचिव अमोल खैरनार, नानू कवडे यांनी उपस्थित राहून अभिनंदन केले. यावेळी दीपक काशीवाल, गोकुळ खैरनार, बाळासाहेब गोराडे, संदीप खैरनार, ओमप्रकाश अग्रवाल, श्याम सुंदर धुत, अशोक पाटील, भैय्या सांगवे, आनंदशेठ चोरडिया, समाधान भोसले, सुनील भवर, समता परिषदेच्या सौ. बोरसे यांचे सह मल्हारवाडी येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नाशिक जिल्हा न्यायालय इमारतीसाठी ३१० कोटींचे सुधारित बजेट

### नाशिक वकील संघाच्या पाठपुराव्याला यश : सप्टेंबरमध्ये होणार उद्‍घाटन

नाशिक । नाशिकच्या वैभवात भर टाकणाऱ्या नाशिक जिल्हा न्यायालयाच्या नवीन इमारतीसाठी महाराष्ट्र शासन आणि उच्च न्यायालय, मुंबई यांच्या मंजुरीनंतर राज्य शासनाने ३१० कोटींच्या सुधारित प्रस्तावास प्रशासकीय मान्यता दिली आहे. यासंदर्भात राज्याच्या विधी विभागाने गुरुवारी (दि.१९) शासन आदेश जारी केला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून नाशिक वकील संघाकडून सुरु असलेल्या पाठपुराव्याला अखेर यश आले असल्याची प्रतिक्रिया वकील संघाच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे. सुमारे ४ लाख चौ. फुटाचे बांधकाम असलेल्या नवीन पर्यावरणपूरक भव्य इमारतीचे बांधकाम पूर्णत्वाकडे आले आहे. येत्या तीन महिन्यांत इमारतीचे उद्घाटन होणार असल्याचा मनोदय सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती भुषण गवई यांनी जाहीर केला आहे. पोलीस खात्याची जागा जिल्हा न्यायालयाला मिळावी, म्हणून नाशिक वकील संघाने अनेक वर्षे संघर्ष करून सदर जागा मिळविली. अध्यक्ष ॲड. नितीन ठाकरे यांच्या नेतृत्त्वाखाली व बार कौन्सिलचे सदस्य ॲड. जयंत जायभावे, ॲड.अविनाश भिडे यांच्यासह सर्व पदाधिकारी यांनी सतत पाठपुरावा करून हा भव्य प्रकल्प पुर्णत्त्वास नेला आहे. ४ वर्षांपूर्वी इमारत बांधकामासाठी १७१.७७ कोटी इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर ४ लाख फूट भव्य व आधूनिक इमारतीचे काम सुरू झाले. आता शासनाने ३१० कोटींच्या खर्चास शासन आदेशानुसार सुधारित प्रशासकीय मान्यता दिली आहे. येत्या सप्टेंबर २०२५ मध्ये या इमारतीचे उद्घाटन करण्याचा मनोदय सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती भुषण गवई यांनी मुंबई येथे जाहीर केला आहे. इमारतीच्या या प्रकल्पासाठी नाशिक वकील संघाने सतत पाठपुरावा केला आहे. शासन आदेश काढल्याबद्दल नाशिक बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. नितीन ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्य न्यायमूर्ती आराधे सो. व न्यायमूर्ती भूषण गवई यांचे मनःपूर्वक आभार मानले आहे. तसेच लवकरच उद्घाटनाचा भव्य सोहळा होणार असल्याचे प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे. प्रसिद्धीपत्रकावर बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. नितीन ठाकरे, बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र व गोवाचे सदस्य ॲड. जयंत जायभावे व ॲड. अविनाश भिडे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



> सध्याच्या नाशिक न्यायालयाच्या ब्रिटीशकालीन हेरिटेज इमारतीच्या पाठीमागील बाजूला ही नवीन इमारत होणार आहे. त्यामुळे सहाजिकच न्यायालयाच्या भव्यदिव्यतेचे सौदर्य आणखी खुलणार आहे. मागच्या बाजूला अद्यावत पर्यावरणपूरक इमारत आणि पुढच्या बाजूला हेरिटेज वास्तू म्हणजे बांधकाम क्षेत्राला एक दिशा देणार आहे. महाराष्ट्रातील न्यायालयीन इमारतीत ही नाशिकची इमारत आधुनिक व आदर्श ठरणार आहे.
>
> **– ॲड. नितीन ठाकरे, अध्यक्ष, नाशिक बार असोसिएशन**

# अरण्यऋषी!



**मराठी भाषेला शब्दांची देणगी**

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी इंग्रजी शब्दांना मराठीत दिलेले पर्यायी शब्द आज रुळलेत. तसेच कार्य जंगलाच्या बाबतीत मारुती चितमपल्ली यांनीही करून ठेवले आहे. अरण्य आणि त्याभोवताल विणल्या गेलेल्या विश्वातील कितीतरी घटकांना चितमपल्ली यांनी आपल्या शब्दांमध्ये गुंफले आहे.

पक्षी असोत? की वनस्पती, कितीतरी नवी नावे केवळ त्यांच्यामुळे मराठी साहित्यात नोंदली गेली आहेत. या मूळ तेलगू भाषिक माणसाने मराठीला सुमारे एक लाख शब्दांचा खजिना उपलब्ध करून दिला आहे. चितमपल्लींनी पक्षिशास्त्रातील अनेक संज्ञांचे मराठी नामकरण केले आहे. जसे कावळ्यांच्या वसाहतीला इंग्रजीत रूकरी असा शब्द आहे. चितमपल्लींनी त्यासाठी काकागार हा शब्द योजला. तसेच हेरॉनरी (बगळे, ढोकरी ह्या पक्ष्यांची वीण वसाहत) ला सारंगागार असा समर्पक शब्द मराठीत तयार केला आहे. रूस्टिंग प्लेससाठी रातनिवारा हा शब्द वापरला आहे. टणटणी (घाणेरी) चे रायमुनिआ (हिंदीभाषक) तर बहाव्याचे अमलताश हे नाव चितमपल्लींमुळे नागरी वाचकांस माहित झाले.

**संशोधन आणि संस्थांमधील सहभाग**

मारुती चितमपल्ली यांनी वने, वन्यप्राणी, वन्यजीव व्यवस्थापन, आणि पक्षि जगताविषयी उल्लेखनीय संशोधन केले; आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सहभाग आणि निबंधवाचन केले.

सेवाकाळात आणि निवृत्तीनंतर अनेक संस्था, समित्या यांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. राज्य वन्यजीव संरक्षण सल्लागार समिती, मराठी अभ्यासक्रम समिती (औरंगाबाद) चे ते सदस्य होते. तसेच महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचेही ते संचालक होते.

**वन्यजीव लेखन**

मारुती चितमपल्ली यांना त्यांच्या निसर्ग क्षेत्रातील अभ्यासामुळेच पक्षितज्ज्ञ व निसर्गलेखक ही ओळख मिळाली. त्यांची अनेक पुस्तके प्रकाशित झाली.

**पुरस्कार आणि सन्मान**

पद्मश्री (२०२५)

मारुती चितमपल्ली यांना भारती विद्यापीठाचा जीवनसाधना पुरस्कार मिळाला आहे.

नागपूरच्या सिटिझन्स फोरमचा नागभूषण पुरस्कार (२००८)

एस.डी. पाटील ट्रस्टचा ह्खासदार एस.डी. पाटील समाजसेवक पुरस्कारह्व (२०१२)

त्यांना सहकारमहर्षी (कै) शंकरराव मोहिते पाटील प्रतिष्ठानचा सहकार महर्षी साहित्य पुरकारही मिळाला आहे.

रानवाटा (१९९१) - ह्या पुस्तकाला ९१-९२ सालचा उत्कृष्ट साहित्यानिर्मितीचा राज्य पुरस्कार, भैरू रतन दमाणी साहित्य पुरस्कार व मृण्मयी साहित्य पुरस्कार मिळालेले आहेत. १९९३ साली या पुस्तकाची आकाशवाणी पुणे केंद्रावर वाचण्यासाठी निवड झाली होती तसेच पाठ्यपुस्तकात देखील यातील अरणी ही कथा होती.

पुण्याची अॅडव्हेंचर फाउंडेशन ही संस्था २००६पासून निसर्ग संशोधनाचे किंवा निसर्ग संवर्धनाचे काम करणाऱ्या व्यक्तीला 'मारुती चितमपल्ली' यांच्या नावाचा निसर्गमित्र पुरस्कार देते.

इ.स.२००६ मध्ये सोलापूरला झालेल्या ८३ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद

महाराष्ट्र राज्याच्या मराठी विभागाकडून दिलेला विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार (२०१७)

१२व्या किर्लोस्कर चित्रपट महोत्सवाचा जीवनगौरव पुरस्कार (८-१-२०१८)

**चितमपल्ली यांनी लिहिलेली पुस्तके**

आनंददायी बगळे (संस्कृत साहित्यातील काही पक्षी), (२००२)

चकवाचांदण : एक वनोपनिषद, (आत्मचरित्र)

रातवा, (१९९३), (१९९३-९४चा महाराष्ट्र राज्य साहित्य पुरस्कार)

नवेगाव बांधचे दिवस

आपल्या भारताचे साप

केशराचा पाऊस

घरट्यापलीकडे, (१९९५)

चित्रग्रीव - एका कबुतराची कथा

चैत्रपालवी, (२००४)

जंगलाची दुनिया (२००६)

निळावंती, (२००२)

निसर्गवाचन

पक्षिकोश, (२००२)

पक्षी जाय दिगंतरा, (१९८३)

मृगपक्षिशास्त्र, (१९९३)

शब्दांचं धन, (१९९३)

सुवर्णगरुड, (२०००)

रानवाटा, (१९९१), (१९९१-९२चा महाराष्ट्र राज्य साहित्य पुरस्कार), (भैरुरतन दमाणी साहित्य पुरस्कार-१९९१), (मृण्मयी साहित्य पुरस्कार-१९९१)

जंगलाचं देणं, (१९८५) (महाराष्ट्र राज्य साहित्य पुरस्कार प्राप्त-१९८९), (विदर्भ साहित्य संघ पुरस्कार-१९९१)श

आगामी

मत्स्यकोश, वृक्षकोश, वृक्षायुर्वेद, वगैरे

• • •

उत्तरार्ध

### मारुती चितमपल्ली यांची खास वाक्ये

- निसर्ग हा पुस्तकापेक्षा मोठा गुरू आहे, तो रोज शिकवतो आणि रोज नव्याने समजतो.
- पक्ष्यांच्या किलबिलाटात माणसाने शांत राहायला शिकावं.
- माणसाने निसर्गाकडे पाहण्याची नजर बदलली, की तो देवाकडेही नव्यानं पाहू लागतो.
- शिकारीची नशा हे एक वेड आहे; पण वन्यजीव पाहण्याचं वेड म्हणजे शुद्ध आनंद आहे.
- पानगळ म्हणजे झाडाची वृत्ती – जुनं झडून नवं उगमायला तयार होणं.
- मी जंगलात गेलो की, मला माज्या आतल्या माणसाचा आवाज ऐकू येतो.
- माणसाला माणूस बनवायला शहर नाही लागत, जंगल पुरेसं असतं.

# शिवसेनेचा इतिहास आणि धडा शिकविण्याची गरज!






ज्या अजित पवार यांनी शिवसेनेतून बंडखोरी करणारे कधीही निवडून येत नाहीत, असे राणा भीमदेवी थाटात विधानसभा सभागृहात सांगितले आणि ज्या एकनाथ शिंदे यांच्या साथीदारांनी अजित पवार यांच्या बद्दल तक्रारी केल्या होत्या त्याच अजितदादांच्या नेतृत्वाखाली शरद पवार यांच्या पक्षातून बंड करीत फडणवीस शिंदे सरकार मध्ये जाऊन बसले.

उत्तरार्ध

१३ मे २०२२ रोजी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी एकनाथ शिंदे यांच्या पुढाकाराने तयार झालेल्या धर्मवीर मुक्काम पोस्ट ठाणे चित्रपटाचे उद्घाटन केले आणि २० मे २०२२ रोजी एकनाथ शिंदे यांना विचारले की, एकनाथ, तुम्हाला मुख्यमंत्री व्हायचंय का ? तेंव्हा ते एकदम आश्चर्यचकित होत नाही नाही असे म्हणू लागले.



**योगेश वसंत त्रिवेदी**
**मुंबई.**
**९८९२९३५३२१.**
**(लेखक ज्येष्ठ राजकीय विश्लेषक आहेत)**

उद्धव ठाकरेंनी माज्यावर, माज्या मुलावर उपकार केले आहेत, मी त्या उपकारांची परतफेड करु शकत नाही, असे ठासून सांगितले. पण त्यांचे तर ठरलेलेच होते. त्याबरहुकूम पुढच्या चाली खेळल्या गेल्या. ५ डिसेंबर २०२४ रोजी मुख्यमंत्री पदावरुन उपमुख्यमंत्री पदावर यावे लागले आणि पुन्हा एकदा देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकार मध्ये नाखुशीनेच जावे लागले.

पुन्हा अजित पवार यांच्या कडून तुटपुंज्या निधीवर बोळवण होऊ लागली. तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करावा लागत आहे. पण शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि युवा सेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या नांवाने शिव्याशाप देण्याची अहमहमिका लागली. बाळासाहेब ठाकरे असते तर त्यांनी उद्धव ठाकरे यांना माफ केले नसते, त्यांनी कधी कॉंग्रेस बरोबर जाण्याचे धाडस केले नसते, अशा वल्गना केल्या आहेत.

इतकेच नव्हे तर धर्मवीर २ च्या माध्यमातून धर्मवीर आनंद दिघे यांच्या सांगण्यावरून शिवसेना फोडली, असे भासविण्याचा, संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. राज ठाकरे यांनी स्वतंत्र संघटना काढली, एकनाथ, तू काय करणार आहेस? असे आनंद दिघे यांनी सांगतांनाच एका खांद्यावर हिंदुत्व आणि एका खांद्यावर शिवसेना घेऊन तू वाटचाल कर, असा जणू आदेशच दिघेसाहेबांनी आपल्या पट्टशिष्य म्हणवणाऱ्या एकनाथ शिंदे यांना दिला असल्याचा देखावा धर्मवीर २ मध्ये उभा केला आहे. प्रत्यक्षात आनंद दिघे काय होते? त्यांचे तत्त्व काय होते? बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेची वाटचाल कशी झाली? २००२ साली नरेंद्र मोदी यांच्यावर बाळासाहेब ठाकरे यांनी अडवाणी यांच्या माध्यमातून अटलबिहारी वाजपेयी यांच्याकरवी होणारी कारवाई रोखायला लावून नरेंद्र मोदी यांना वाचविले.

६ एप्रिल १९८० रोजी स्थापन झालेल्या भारतीय जनता पक्षाला बाळासाहेब ठाकरे यांनी वारंवार पाठिंबा देत गगनभरारी घेण्यासाठी सहकार्य केले. दिल्लीत भाजप शिवसेना आणि महाराष्ट्रात शिवसेना भाजप असे बाळासाहेब ठाकरे यांनी ठासून सांगितले होते. या उपकाराची कोणत्या पद्धतीने परतफेड होत आहे, हे देशवासिय जाणून आहेत.

> बाजपाईजी, नरेंद्र मोदी को हाथ मत लगावो, मोदीको मत हटावो, मोदी गया तो समझो गुजरातसे बीजेपी गया !॰ आशा सुस्पष्ट शब्दांत हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे यांनी लालकृष्ण अडवाणी यांच्या मार्फत पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांना निरोप दिला. २००२ साली आदरणीय बाळासाहेब ठाकरे यांनी नरेंद्र मोदी यांना वाचविले. आदरणीय बाळासाहेब ठाकरे यांचे हे विधान आजही गुजरातच्या प्रत्येक निवडणुकीत ऐकविण्यात येते. त्याची परतफेड श्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना फोडून करताहेत काय ? असा संतप्त सवाल हिंदुस्थानातील तमाम हिंदु बांधव, मराठी माणूस आणि शिवसेनाप्रेमी जनता करीत आहे.

आज वाजपेयी अडवाणी यांचा भाजप राहिलेला नाही. या संदर्भात शिवसेनेचा इतिहास आणि धडा शिकविण्याची गरज आज निर्माण झाली आहे. ज्यांनी कधी मातोश्रीचा उंबरठा पाहिला नाही, ज्यांनी कधी आनंद दिघे यांना पाहिले नाही, ते आता त्यांची मोठमोठाली छायाचित्रे लावून प्रचार प्रसार करण्याच्या गोष्टी करीत आहेत.

वारंवार शिवसेनेच्या पाठीत खंजीर खुपसणारे उद्धव ठाकरे यांच्यावर धोका दिल्याचा आरोप करताहेत. परंतु १९६६ चा व बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांनी भारलेला, भारावलेला हिंदू, मराठी माणूस कडवा शिवसैनिक हे कधी सहन करणार नाही. योग्यवेळी योग्य निर्णय घेणारच. सध्या सत्ताधारी उपभोगताहेत आणि सर्वसामान्य मराठी, हिंदू भोग भोगतोय. हेही दिवस निघून जातील. कुणीही अमरपट्टा घेऊन आलेला नाही. तूर्तास इतकेच ! जय महाराष्ट्र !!



# मन:शांती आणि निरोगी जीवन देणारी योगविद्या!

**सौ. अंजली पाध्ये**
**सनातन संस्था, नागपूर.**
**९९७५५३६९०३**



विसाव्या शतकाच्या प्रारंभी स्वामी विवेकानंद यांनी अमेरिकेतील सर्वधर्म परिषदेत सहभाग घेऊन भारतीय तत्त्वज्ञान आणि अध्यात्म यांची दिव्य गुढी उभारून भारताच्या गौरवशाली आणि वैभवशाली संस्कृतीची खरीखुरी ओळख संपूर्ण जगाला करून दिली.

आपल्या याच गौरवशाली आणि वैभवशाली संस्कृतीचा भाग असलेल्या योगशास्त्राचे महत्त्व जगभरातील इतर देशांना आता पटलेले आहे. २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून जगभर साजरा केला जातो. गेली १ वर्षाहून अधिक काळ कोरोनामुळे संपूर्ण जगाला ग्रासलेले असताना आयुर्वेद, योग, प्राणायाम यांचा अवलंब केल्याने अनेकांना कोरोनावर मात करता आली. योगाचे असंख्य फायदे असून मनःशांती आणि निरोगी जीवन देणाऱ्या योगविद्येविषयी या लेखात थोड्क्यात पाहूया.

**जगाला मन:शांती आणि व्याधीमुक्त जीवन प्रदान करणारी योगविद्या!**

भारतीय ऋषिमुनींच्या दैवी चिंतनातून, आत्मसाक्षात्कारातून आविष्कृत झालेली ही योगविद्या म्हणजे कोणताही धर्मभेद, जातीभेद, लिंगभेद न करता संपूर्ण मानवजातीचे कल्याण इच्छिणारे एक ईश्वरी वरदानच आहे. संसाररूपी भट्टीत पोळलेल्यांना मनःशांती देणारी, व्याधीग्रस्तांना शारीरिक आणि मानसिक तापापासून मुक्त करणारी, योगसाधकांना जीव-शिवाची भेट घडवून आणणारी, मानवाची मोक्षपदाची अंतिम इच्छा पूर्ण करणारी, ही योगविद्या आहे.

आमच्या परोपकारी पूर्वजांनी जगाच्या कल्याणासाठी जतन करून ठेवलेला हा अनमोल खजिना आहे. अशा या अनमोल खजिन्याचे आम्ही वारसदार असून या योगभूमीत आम्ही जन्मलो, हे आमचे सौभाग्य आहे; पण असे असूनही बहुतेक भारतीय आजही योगविद्येपासून दूर राहिले आहेत, हे आमचे दुर्दैव आहे. जगातील इतर राष्ट्रांनी मात्र या योग खजिन्याचा भरपूर लाभ घेतलेला आहे आणि घेत आहेत.

भोगवाद, भौतिकवाद आणि अनेक प्रकारच्या व्याधींनी ग्रस्त असलेल्या पाश्चिमात्य राष्ट्रांतील जनतेला मनःशांती आणि निरोगी जीवन हवे आहे. यासाठी संपूर्ण जग भारताकडे आशेने पहात आहे; कारण योगविद्येसारखे रामबाण औषध असलेल्या भारताविना अन्य कोणताही देश जगाला मनःशांती आणि व्याधीमुक्त जीवन प्रदान करू शकत नाही.

भारतीय योगविद्येमध्ये एवढे मोठे दिव्य सामर्थ्य आणि क्षमता आहे, याची विदेशी पंडितांनी प्रत्यक्ष अनुभूती अन् प्रचीती घेतलेली आहे.

दुर्बल शरिराची कार्यक्षमता वाढवण्याचे सामर्थ्य योगाभ्यासामध्ये असणे रासायनिक विषारी खते आणि कीटकनाशके फवारून पिकवलेले कडधान्य, फळे, भाजीपाला आदी खाऊन स्वतःचे शरीर कळत-नकळत हळूहळू व्याधीग्रस्त होत चालले आहे. त्यामुळे स्वतःची शारीरिक आणि मानसिक दुर्बलता वाढली आहे, हे बहुतेकांना ठाऊकच नाही.

अशा वेळी ही योगविद्या फारच उपयुक्त ठरते. विषारी द्रव्ये बाहेर टाकून दुर्बल शरिराची कार्यक्षमता वाढवण्याचे सामर्थ्य या योगाभ्यासामध्ये आहे.

शरीर एक पवित्र यज्ञकुंड असून त्याचे पावित्र्य राखणे आवश्यक

स्वतःचे शरीर एक पवित्र यज्ञकुंड आहे. या यज्ञकुंडातील जठराग्नीत मांसाहार, दारू, तंबाखू, फास्ट फूड आदी पदार्थ टाकून (खाऊन) हा पवित्र यज्ञ कोणीही भ्रष्ट करू नये. असे करणाऱ्या व्यक्तींकडून केलेली योगसाधना सफल होत नाही.

मोक्षप्राप्ती हे नरदेहाचे अंतिम ध्येय आहे. परमात्मा परमेश्वराची कृपादृष्टी संपादन करण्यासाठी, मोक्षपदाचा अधिकारी होण्यासाठी योगसाधकाने स्वतःचे आचार, विचार आणि उच्चार यांतून या पवित्र यज्ञकुंडाचे पावित्र्य राखावे. योगी होऊन परोपकारी आणि पारमार्थिक जीवन जगण्यामध्येच नरजन्माचे सार्थक ह्योगह्ल या शब्दाचा भावार्थ ह्यआपल्या आत असलेल्या जीवात्म्याची चराचरात असलेल्या परमात्म्याशी भेट घडवून आणणे, एकरूप होणे किंवा मिलन होणे अथवा समरस होणे, असा आहे.


या सृष्टीतील ८४ लक्ष योनीला (जीवमात्राला) सृष्टीकर्त्या परमेश ?वराकडून ऊर्जा पुरवली जाते. त्यामुळेच तुम्ही-आम्ही सर्व आता या क्षणापर्यंत जिवंत आहोत. या ऊर्जेर्लाच ह्यजीवात्मा-अंशात्माह्ल म्हणतात. आमच्या भोगवादी वृत्तीमुळे, ह्यमीह्लपणाच्या अहंकारामुळे, भक्तीभावाच्या अभावामुळे आमच्या शरिरातील या दिव्य शक्तीचे, आमच्या देहचालकाचे आम्हाला विस्मरण झालेले असते. योगविद्येच्या माध्यमातून योगसाधकाला ह्यआपण परमात्मा परमेश ?वराचे अंश आहोतह्ल, याचे स्मरण होते. स्वतः प्रकाशित होऊन दुस ?यांनाही प्रकाशित करण्याचे दैवी सामर्थ्य या योगसाधनेमध्ये आहे. भोगी होऊन रोगी जीवन जगण्यापेक्षा, योगी होऊन परोपकारी आणि परमार्थिक जीवन जगण्यामध्येच नरजन्माचे सार्थक आहे. हे सर्व साध्य करण्यासाठी योगसाधकाने स्वानुभवी योग शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली योगसाधना करावी.

**योग साधनेतूनच आध्यात्मिक दृष्टी आणि राष्ट्रभक्तीने भारावलेले भूमीपुत्र निर्माण होणे**

गौरवशाली, वैभवशाली, सुसंस्कारित, व्याधीमुक्त, आत्मनिर्भर, स्वावलंबी आणि जगद्गुरुपदाला लायक असा भारत घडवायचा असेल, तर त्यासाठी लागणारे सद्गुण, तेजस्वी विचारधारा, देव-धर्म, देश, संस्कृती आस्था, आध्यात्मिक दृष्टी आणि राष्ट्रभक्ती यांनी भारावलेले भूमीपुत्र या योग साधनेतूनच घडणार आहेत.

अशा या शारीरिक आणि मानसिक व्याधीतून मुक्त करणाऱ्या, कोरोनासारख्या विषाणूला यशस्वीपणे प्रतिकार करू शकणाऱ्या, मोक्षप्राप्तीचे ध्येय साध्य करून जीव-शिवाची भेट घडवून आणणाऱ्या, जगद्गुरुपदाची इच्छा पूर्ण करू शकणाऱ्या या सर्वगुणसंपन्न योगविद्येचा देश-विदेशांत निष्काम वृत्तीने प्रसार-प्रचार करणाऱ्या सर्व भारतीय संस्था, योगाचार्य, योग साधक आणि योगकार्यात तन-मन-धनाने योगदान देणारे हितचिंतक यांचे योगदिनानिमित्त अभिनंदन!

■ ■



# आरोग्यासाठी योगा, पारंपरिक खेळ व वृक्ष लागवड काळाची गरज

संयुक्त राष्ट्र परिषदेत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्याचा प्रस्ताव ठेवला होता. त्यानंतर ११ डिसेंबर २०१४ ला संयुक्त राष्ट्र महासभेने दरवर्षी २१ जूनला जागतिक योग दिन म्हणून मान्यता देण्याचे मान्य केले आणि २१ जून २०१५ ला पहिले आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरे केल्या गेले.

योगाला भारत सरकारने जागतिक दर्जा देवून भारताची मान जगात उंचावली आहे याचे मी स्वागत करतो. योग व्यायामाचे आणि आरोग्याचे प्रभावशाली माध्यम असुन शरीरांच्या अवयवांचाच नव्हे तर मन, मेंदू आणि आत्म्याचे संतुलन ठेवण्याचे काम योगाच्या माध्यमातून होत असते.

योग ही भारतातील ५ हजार वर्षे जुनी परंपरा असुन शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक साधना आहे. त्यामुळे ऋषी-मुनी, तपस्वी यांनी योग संस्कृती अवलंबली होती. आरोग्य रक्षणासाठी योगा व व्यायाम अती आवश्यक आहे. अत्याधुनिक युगात व बदलत्या काळानुसार मानवजातीला मनमोकळे पणाने बागडण्या करीता जागा किंवा ग्राउंड अपुरे पडताना दिसतात. कारण आधुनिक युगात आपण कुठेही नजर फिरवली तर आपल्याला गगनचुंबी इमारती, कारखाने, उद्योगधंदे मोठ्या प्रमाणात दिसुन येतात.

अशा परीस्थितीत लहान-मोठी,आबाल-वृध्द खुल्या हवेत बागडु शकत नाही.परंतु शरीराला व्यायाम सुध्दा आवश्यक असतो. अशा वेळेला आपण योगा,व्यायाम शाळा व जिमचा सहारा घेवून शरीराला सुदृढ ठेवण्याचा प्रयत्न सर्व करतात. पुर्वी अनेक मातीतील खेळ खेळले जायचे व जखमा सुध्दा व्हायच्या परंतु या जखमा त्याच मातीने दुरूस्त सुध्दा व्हायच्या.

अशा परीस्थितीत शरीराच्या प्रत्येक अवयवांचा व्यायाम होत असे. परंतु कालांतराने मोबाईलच्या छंदामुळे संपूर्ण जुने छोटे-मोठे खेळ लुप्त होतांना दिसतात. परंतू शरीर सुदृढ व निरोगी ठेवण्यासाठी व्यायाम अती आवश्यक आहे. योगाच्या सहाय्याने आपण घरबसल्या व्यायाम करू शकतो.

आज जगातील १९० देशांनी योगाभ्यास अंगीकारला आहे.यात अनेक मुस्लिम राष्ट्र सुध्दा आहेत.हा भारताचा मोठा मान आहे.कारण समाजातील प्रत्येक कुटुंबातील लहान-मोठे योगाभ्यास करून आपले आरोग्य सुदृढ ठेवु शकतो.

आजच्या परिस्थितीत मुल पुढील भविष्याच्या वाटचालीकरीता अभ्यात मग्न असतात आणि मनोरंजनाचे साधन म्हणून भारतासह जगातील ८० टक्के जनता मोबाईलच्या व कांम्पुटरच्या आदीन झाल्याचे दिसून येते.

यामुळे डोक्यावर ताण येणे, डोळे दुखणे, मेंदुवर परीनाम होने इत्यादी अनेक विकार मोबाईलमुळे व कांपुटरमुळे होतांना आपण पहातो. परंतु यावर निराकरण करण्याचे काम योगा करणे, व्यायाम करणे, जिमनॅस्टिक किंवा जिमच्या माध्यमातून शरिरयष्टी सुदृढ ठेवने अत्यंत गरजेचे आहे.

आपण योगाभ्यासचा विचार केला तर भारतात अनेक युगानु- युगापासुन योगाभ्यास ऋषी-मुनी, साधु-संत, महायोगी, तपस्वी इत्यादी अनेक महान विभूती झाडाखाली योगसाधना करायची.

परंतु आज वाढते प्रदुषण, धावपळीचे जीवन, ग्लोबल वार्मिंग, वाढते औद्योगिकीकरण, शहरीकरण व बदलते हवामान यामुळे खुला व्यायाम करण्यास अनेक अडचणी निर्माण होतात. परंतु योगाभ्यास चार भिंतींच्या आत सुध्दा करता येतो. त्यामुळेच जगातील अनेक देशांनी योगाभ्यासला जास्त महत्व दिले आहे.

भारताने योगाला जागतिक पातळीवर नेऊन भारत योगगुरू बनला आहे. त्याचप्रमाणे भारताने योगाभ्यास जागतिक पातळीवर नेऊन जगाला व्यायामाची व शरिर सुदृढ ठेवण्याची मोठी दीशा देण्याचे काम सुद्धा केले आहे.भारत जागतिक पातळीवर लोकांचे जीवन उंचावण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील रहाला आहे.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**स्वतंत्र पत्रकार, नागपूर.**
**९९२१६९०७७९**

योग दिनाच्या निमित्ताने सर्वांनीच योगाभ्यास अंगीकारला पाहिजे. योग दीनाच्या निमित्ताने प्रदुषणावर मात करण्यासाठी प्रत्येकांनी घर तीथे झाड ही मोहीम राबवुन या दीवसाला आगळेवेगळे ऐतिहासिक महत्व देवुन वृक्षारोपण केले पाहिजे. आरोग्यासाठी वृक्ष ही सर्वांसाठी संजीवनी आहे.

आपल्या राज्यात ३६ जिल्हे, प्रत्येकात साधारण ५ तालुके, म्हणजे १८० तालुके व राज्यात आमदार २८८ (वि.परिषदचे वेगळेच) वृक्षारोपण हा मुद्दा आमदार, कलेक्टर, बीडीओ,असे अनेक जबाबदार अधिकारी मिळून प्रशासनाने व सामाजिक संघटनांनी योग दिनाचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करायला हवी.

जागतिक योग दिवस महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात साजरा होणार आहे. आजच्या परिस्थितीत ज्याप्रमाणे मनुष्याच्या आरोग्यासाठी योगाकरणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे ऑक्सिजनची मात्रा वाढविण्यासाठी वृक्षारोपण करने अत्यंत गरजेचे आहे. याकडे मुख्यत्वेकरून प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे.

योग दिनाच्या निमित्ताने प्रशासने,शाळा, महाविद्यालये, एसटी स्टॅंड, संपूर्ण प्रशासकीय ठिकाणे, कारागृह या संपूर्ण ठिकाणी जागतिक योग दिनाच्या निमित्ताने वृक्षारोपण व्हायला हवे.

यामुळे जागतिक विक्रम होईलच सोबत आरोग्याची जोपासना सुध्दा होईल.अशाप्रकारे योगासोबत आरोग्यासाठी वृक्षारोपण चळवळ पुढे नेली पाहिजे. कारण ह्या संपूर्ण बाबी आरोग्याशी निगडित आहे.

योगाभ्यासमुळे शारिरिक, मानसिक, आध्यात्मिक, आरोग्य आणि शांतीसाठी याचा मोठ्या प्रमाणात लाभ मिळतो. त्यामुळेच जगातील १९० देशांनी योगाला स्विकारले आहे. भारतातच नाही तर संपूर्ण जगात वाढते नवीन-नवीन आजार चिंतेचा विषय आहे. त्यामुळे योग साधना करून व्यायाम करणे तेवढेच आवश्यक आहे. कारण आरोग्य हिच संपत्ती हा मुलमंत्र सर्वांनीच अंगीकारला पाहिजे.

योग दिनाच्या निमित्ताने केंद्र सरकारने व राज्य सरकारने राष्ट्रीय खेळांना महत्व देवून व्यायाम करण्याची प्रवृत्ती जागृत करण्याची गरज आहे. जगातील प्राचीन संस्कृती भारतात आताही आहे. त्यामुळे आपल्याला योग परंपरेच्या माध्यमातून ती पहायला मिळते. त्यामुळे आज योगाभ्यास जगासाठी अनमोल रत्न व संजिवनी सिध्द होत आहे. याचा भारतीयांना अभिमान आहे.

योग दिनाच्या निमित्ताने ऑक्सिजनची मात्रा वाढवीन्यासाठी आपण सर्वांनी वृक्षारोपणाचा संकल्प करावयास पाहिजे. कारण पुर्वी ऋषी मुनी, तपस्वी, महाग्यानी झाडाखालीच योगाभ्यास करायचे, पुर्वी शिक्षण सुध्दा झाडाखालीच व्हायचे यावरून स्पष्ट होते की वृक्षा शिवाय पुढचे पाऊल अवघड असते. त्यामुळे आरोग्याच्या दृष्टीने व योग दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्रासह भारतात जास्तीत जास्त वृक्षारोपण कसे करता येईल याकडे सरकारने व सामाजिक संघटनांनी लक्ष देण्याची गरज आहे. योगा करूया;व्यायाम करूया; वृक्ष लावुया; वृक्ष जगवुया आणि निसर्गाचा समतोल राखण्याचा संकल्प करूया. जय हिंद!

■ ■ ■ ■



# शेअर बाजारात जोरदार उसळी
## सेंसेक्स 1000 अंकांनी वधारला

**शुक्रवारी सर्वच सेक्टोरल निर्देशांक वाढीसह बंद झाले.निफ्टी कॅपिटल मार्केट निर्देशांकात सर्वाधिक २.८४ टक्क्यांची, निफ्टी रिअल्टी निर्देशांकात २.११ टक्के, निफ्टी इंडिया डिफेन्समध्ये १.८९ टक्के, निफ्टी पीएसयू बँकमध्ये १.६४ टक्क्यांची वाढ झाली.**

**मुंबई, दि. २० प्रतिनिधी**

शुक्रवारी भारतीय शेअर बाजारात जोरदार तेजी पाहायला मिळाली. बाजाराचे दोन्ही प्रमुख निर्देशांक सेंसेक्स आणि निफ्टी ५० हे हरित चिन्हावर बंद झाले. हे वाढलेले व्यवहार इराण आणि इस्रायल यांच्यातील तणावाच्या पार्श्वभूमीवर झाले असले तरी गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास टिकून असल्याचे दिसले.

सेंसेक्सने दिवसभरात ८१,३५४ च्या पातळीवर व्यवहार सुरू केला आणि १.२९ टक्क्यांनी वाढून ८२,४०८ वर बंद झाला. त्याचप्रमाणे निफ्टी ५० ने २४,७८७ वर सुरुवात करत १.२९ टक्क्यांची वाढ नोंदवून २५,११२ या पातळीवर क्लोजिंग दिले. बाजाराच्या या उभारीमुळे बीएसई मिडकॅप निर्देशांकात १.२० टक्क्यांची वाढ तर स्मॉलकॅप निर्देशांकात ०.५५ टक्क्यांची वाढ झाली.

बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल मागील सत्रात सुमारे ४४३ लाख कोटी रुपये होते, जे वाढून जवळपास ४४७ लाख कोटी रुपयांपर्यंत गेले. त्यामुळे गुंतवणूकदारांना केवळ एका सत्रातच ४ लाख कोटी रुपयांचा नफा झाला.

निफ्टी ५० निर्देशांकातील सर्वाधिक वधारलेला स्टॉक जिओ फायनान्शियल सर्व्हिसेसचा होता ज्यात ३.५८ टक्क्यांची वाढ झाली. त्यानंतर भारती एअरटेलमध्ये ३.१९ टक्के, ट्रेंटमध्ये ३.०५ टक्के, महिंद्रा अँड महिंद्रामध्ये २.९ टक्के आणि भारत इलेक्ट्रॉनिक्समध्ये २.४४ टक्क्यांची वाढ झाली.

**सेन्सेक्स 82,408**

**निफ्टी 25,112**

दुसरीकडे, सर्वाधिक घसरण बजाज ऑटोच्या शेअरमध्ये झाली जो १.४८ टक्क्यांनी खाली आला. त्याखालोखाल हिरो मोटोकॉर्पमध्ये १.०५ टक्के, मारुती सुझुकीमध्ये ०.१२ टक्के आणि डॉ. रेड्डीजमध्ये ०.०७ टक्क्यांची घसरण नोंदवली गेली.

शुक्रवारी सर्वच सेक्टोरल निर्देशांक वाढीसह बंद झाले. त्यात निफ्टी कॅपिटल मार्केट निर्देशांकात सर्वाधिक २.८४ टक्क्यांची वाढ झाली. निफ्टी रिअल्टी निर्देशांकात २.११ टक्के, निफ्टी इंडिया डिफेन्समध्ये १.८९ टक्के, निफ्टी पीएसयू बँकमध्ये १.६४ टक्के, निफ्टी इंडिया कंझ्युमरमध्ये १.४९ टक्के, निफ्टी सर्व्हिस सेक्टरमध्ये १.३४ टक्के आणि निफ्टी फायनान्शियल सर्व्हिसेसमध्ये १.३३ टक्क्यांची वाढ झाली.

# सातारा जिल्ह्याच्या पश्चिम भागातील पर्यटनस्थळे दोन महिने बंद

**सातारा, दि. २० प्रतिनिधी**

सातारा आणि जिल्ह्याच्या घाटमाथ्यावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी आणि पर्यटकांसाठी एक महत्त्वाची सूचना समोर आली आहे. आंबेनळी घाट संध्याकाळी सात वाजल्यापासून ते सकाळी सात वाजेपर्यंत बंद राहणार आहे. त्यामुळे महाबळेश्वर ते पोलादपूरला जोडणारा आंबेनळी घाट बंद राहणार आहे. रायगड जिल्ह्यातील आंबेनळी घाटात दोन ठिकाणी दरड पडल्याची घटना घडली. या घटनेनंतर दोन्ही जिल्ह्यातील प्रशासकीय यंत्रणा कडून हा निर्णय घेण्यात आलाय. महाबळेश्वर ते पोलादपूर घाटामध्ये मोठ्या प्रमाणावर धुके असल्यामुळे त्याचबरोबर मागील दोन ते तीन दिवसापासून सलग मुसळधार पाऊस या ठिकाणी पडत असल्यामुळे दरड पडण्याच्या



भीतीमुळे हा निर्णय घेण्यात आला आहे. परिणामी हा घाट पुढच्या आदेशापर्यंत संध्याकाळी सात ते सकाळी सातपर्यंत बंद राहणार आहे.

दुसरीकडे प्रशासकीय यंत्रणेच्या अजब कारभाराचा अजब आदेश बघायला मिळतोय. सातारा जिल्ह्याच्या पश्चिम भागातील पर्यटनस्थळे तब्बल दोन महिने बंद ठेवण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. २० जून ते १९ ऑगस्टपर्यंत हा बंदचा आदेश लागू असणार आहे. अजिंक्यतारा किल्ला, ठोसेघर धबधबा, केरळली सांडवली धबधबा, वजराई धबधबा, कासपुष्प पठार, एकीव धबधबा, कास तलाव , बामनोली, सडा वाघापूर उलटा धबधबा, ओझर्डे धबधबा, घाटमाथा धबधबा, लिंगमळा धबधबा, तसेच महाबळेश्वर आणि पाचगणी पर्यटन स्थळ त्याचबरोबर धरण अशा पर्यटन स्थळाच्या परिसरामध्ये पर्यटक गर्दी होत असते. त्यावर पर्यटकांच्या सुरक्षितेच्या दृष्टिकोनाने सातारा जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी निर्बंध घातले आहेत. तर या आदेशाचे उल्लंघन केल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल. असेही सांगण्यात आले आहे. रायगडमध्ये दिवसभर कोसळलेल्या मुसळधार पावसामुळे रायगड जिल्ह्यातील अनेक भागात मोठा फटका बसला . त्यानंतर आता पोलादपूर आंबेनळी घाटामध्ये देखील तीन ठिकाणी दरड कोसळण्याची घटना समोर आली आहे. या दरडीसोबत रस्त्यावर माती देखील मोठ्या प्रमाणात वाहून आल्याने आंबेनळी घाटातील वाहतूक जवळपास दोन तासांहून अधिक वेळ बंद आहे. प्रशासनाकडून तीनही ठिकाणी दरड बाजूला घेण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे.

# सिगारेटवरून झालेल्या वादातून हत्या


**पुणे, दि. २० प्रतिनिधी**

पुणे शहरातील पाच जण मित्र पानशेत परिसरात फिरण्यासाठी गेले असताना त्यांनी केलेल्या कृत्याने त्यांना आता तुरूंगात जावं लागलं आहे. फिरायला गेलेल्या या पाच मित्रांनी अगदी किरकोळ कारणावरून तेथील एका स्थानिक युवकाचा खून केला आहे. हा संपूर्ण प्रकार वेल्हा पोलिस स्टेशनच्या हद्दीतील पानशेत परिसरात परिसरामध्ये घडला आहे. खून केल्यानंतर हे पाचही जण पसार झाले होते. मात्र, पुणे ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखा आणि वेल्हा पोलीस स्टेशनच्या पथकाने या पाचही जणांना बेड्या ठोकल्या आहेत. या घटनेत मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव रोहिदास काळूराम काटकर असे आहे.

अटक झालेल्या आरोपींची नावे आकाश सुभाष भिसे (वय २१), भागवत मुंजाजी आसुरी (वय २०), रितेश उत्तम जोगदंड (वय १९) रमेश उर्फ भैय्या रामभाऊ शेळके (वय २१), पांडुरंग भानुदास सोनवणे (वय १९) हे पाचही तरुण परभणी जिल्ह्यातील मूळ रहिवासी असून, सध्या पुण्यातील नऱ्हे परिसरात राहतात. आरोपींनी सर्वांनी मिळून त्याला मारहाण केली आणि एकाने तर त्याच्या छातीवर दगड मारला. यामध्ये रोहिदास काटकर या तरुणाचा जागीच मृत्यू झाला होता. या प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर ग्रामीण पोलिसांनी सीसीटीव्हीच्या मदतीने तपासाला सुरुवात केली आणि यातील सर्व आरोपींना अटक केली

मिळालेल्या माहितीनुसार, १५ जून रोजी हे पाचही मित्र पानशेत परिसरात फिरायला गेले होते. यातील काही तरुणांनी नंदाबाई कुंभार मावशीच्या हॉटेलसमोर सिगारेट ओढायला सुरुवात केली. त्यावेळी स्थानिक रहिवासी रोहिदास काटकर यांनी त्यांना विरोध केला. त्यावरून बाचाबाची झाली आणि रागाच्या भरात पाचही आरोपींनी त्याला मारहाण केली. यातील एका आरोपीने रोहिदासच्या छातीत दगड मारल्याने त्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला. घटनेनंतर पाचही आरोपी पसार झाले होते. मात्र पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानीय गुन्हे शाखा आणि वेल्हा पोलीस ठाण्याच्या पथकाने सीसीटीव्ही फुटेजच्या मदतीने तपास करून सर्व आरोपींना अटक केली आहे. या घटनेमुळे पानशेत परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून, पर्यटनस्थळांवरील शिस्त आणि सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

# अलमट्टीत ५५.५३ टक्के पाणीसाठा
## ७० हजार क्युसेक विसर्ग सुरू



**विजापूर, दि. २० वृत्तसंस्था**

महाराष्ट्रात सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे अलमट्टी जलाशयात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक होत आहे. खबरदारीच्या उपाययोजनांतर्गत ७० हजार क्युसेक पाण्याचा विसर्ग नदीत करण्यात आला आहे. ३० जूनपर्यंत जलाशयात ५० टक्केच पाणीसाठा करावा, अशी विनंती महाराष्ट्राने केली असली तरी सध्या ५५.५३टक्के पाणीसाठा करण्यात आला आहे.

अलमट्टी जलाशयात गुरुवारी सकाळी ५० हजार क्युसेक इतका असलेला विसर्ग संध्याकाळी ७० हजार क्युसेकपर्यंत वाढविण्यात आला आहे. महाराष्ट्रातील पश्चिम घाटात पावसाचा जोर कायम असून कोयना, नवजा, महाबळेश्वर, राधानगरी, दूधगंगा, वारणा आणि इतर भागात मुसळधार पाऊस सुरू आहे. पावसाचा जोर कमी झालेला नाही. त्यामुळे कल्लोळ बॅरेजकडे मोठ्या प्रमाणात पाणी वाहून येत आहे. त्यानुसार खबरदारीचा उपाय म्हणून विसर्ग वाढविण्यात आला आहे. ५१९.६० मीटर इतक्या कमाल उंचीच्या जलाशयात सध्या ५१५.५५ मीटरपर्यंत पाणी साठवले गेले आहे. सध्या जलाशयात एकूण ६८.३४३ टीएमसी पाणीसाठा असून ते ५५.५३ क्केपर्यंत भरले आहे. संध्याकाळपर्यंत जलाशयात ७८.२५० क्युसेक इतकी पाण्याची आवक होती. पाण्याची आवक अधिक झाल्यास विसर्ग अजून वाढवण्यात येईल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

# एअर इंडियाने रद्द केली 8 उड्डाणे

**नवी दिल्ली, दि. २० वृत्तसंस्था**

अहमदाबाद प्लेन क्रॅशनंतर चर्चेत असलेल्या एअर इंडियाने आज ८ विमानांची उड्डाणे रद्द केली. यात ४ आंतराष्ट्रीय विमानांचा समावेश आहे. रद्द करण्यात आलेली विमानं चेन्नई, दिल्ली, दुबई, मेलबर्न, पुणे, अहमदाबाद, हैदराबाद आणि मुंबई येथून उड्डाण करणार होते. मिळालेल्या माहितीनुसार, विमानांची तांत्रिक तपासणी, खराब हवामान आणि हवाई क्षेत्रावरील निर्बंध लक्षात घेत, हा निर्णय घेण्यात आला आहे. एअर इंडियाने जारी केलेल्या निवेदनानुसार, 'एअर इंडियाची दुबई ते चेन्नई AI906, दिल्ली ते मेलबर्न AI308 आणि मेलबर्न ते दिल्ली AI309 ही आंतरराष्ट्रीय उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत.'

एअर इंडियाने दिलेल्या माहितीनुसार, "दुबई-हैदराबाद विमानही रद्द करण्यात आले आहे. पुण्याहून दिल्ली, अहमदाबादहून दिल्ली, हैदराबादहून मुंबई आणि चेन्नईहून मुंबईची फ्लाइटदेखील रद्द करण्यात आली आहे. देखभाल आणि ऑपरेशनल कारणांमुळे हा निर्णय घेण्यात आला आहे." यासंदर्भात बोलताना एअरलाइन कंपनीने म्हटले आहे की, ज्या लोकांचा प्रवास प्रभावित झाला आहे, त्यांना रिफंड करण्यात येईल. याशिवाय पर्यायी प्रवासाचा प्लॅनही त्यांच्यासोबत शेअर करण्यात येईल. तसेच, या असुविधेबद्दल आम्ही खेद व्यक्त करतो. प्रवाशांना जलद आणि सुरक्षितपणे आपला प्रवास करता यावा, यासाठी आमचे कर्मचारी पर्यायी हवाई प्रवास प्रदान करण्यास तत्पर आहेत. प्रवाशांना संपूर्ण रिफंड आणि रिशेड्यूलिंगची ऑफर देण्यात येत आहे.

# पहिली पासून हिंदीला विरोधच हवा

**राज्याच्या शिक्षण धोरणाचा एक भाग म्हणून पहिली इयत्तेपासून हिंदी विषय सर्व शाळांमधून सक्तीचा करण्याचा अतार्किक निर्णय राज्याच्या शालेय शिक्षण मंत्र्यांनी अचानक जाहीर केला आणि लागलीच महाराष्ट्राच्या मायबोली मराठीला दुय्यम लेखून हिंदीला महत्व देणाऱ्या या निर्णयाविरोधात सर्व स्तरातून कडाडून विरोध होऊ लागलेला आहे. सर्व शाळांमधून सक्तीच्या हिंदीच्या या निर्णयाबद्दलच जेष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ.वसंत काळपांडे यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.**

**साप्ताहिक संवाद**

१]पहिलीपासून हिंदी भाषेला नेमका विरोध का आहे?

महाराष्ट्र वगळता गुजरात, आंध्र प्रदेश, केरळ, तामिळनाडू, बिहार अशा कोणत्याही राज्यांमध्ये हिंदी भाषेची सक्ती नाही. मग हिंदी हि राष्ट्रभाषा नसताना आणि केवळ एका ठराविक राज्याची भाषा असताना आपल्या मातृभाषेला डावलून हिंदी भाषेलाच सक्ती आणि तीही महाराष्ट्रातच का?हा खरा मार्मिक प्रश्न आहे. शाशन निर्णयामध्ये अनिवार्य हा शब्द वगळण्यात आला आहे म्हणजेच सरकारला छुप्या पद्धतीने हिंदीची सक्ती करायची आहे. राज्य अभ्यासक्रम आराखड्यात पहिलीपासून तिसरी भाषा हिंदी शिकविण्याचा कुठेही उल्लेख नाही. म्हणूनच या धोरणाला सर्वांचा विरोध आहे.

२] हिंदी भाषेची सक्ती करण्यामागे राज्याच्या शिक्षण विभागाचा नेमका हेतू काय आहे?

लहान मुले नव्या गोष्टी पटापट शिकतात. विशेषतः नवीन भाषा मुलं अगदी पटकन आत्मसात करतात. मराठी आणि इंग्रजी या माध्यमांच्या खेरीज अन्य म्हणजे उर्दू,कन्नड,गुजराथी,हिंदी आदी माध्यमांच्या विद्यार्थ्यांना पहिलीपासून त्यांची माध्यम भाषा मराठी आणि इंग्रजी या तीन भाषा शिकवल्या जात आहेत. त्यामुळे मराठी आणि इंग्रजी या शालमधील विद्यार्थ्यांसाठी तिसरी भाषा हिंदी सक्तीने आणली जात आहे. हाच शिक्षण विभागाचा हेतू आहे मात्र तो चुकीचा आहे.

३]मातृभाषेतून शिक्षण या सरकारच्या उपक्रमाची हिंदीच्या सक्तीमुळे वाट लागणार का ?

नक्कीच. शासनाच्या शिक्षण विभागाने यापूर्वीच विद्यार्थ्यांना मातृभाषेतून शिक्षण हा अभिनव उपक्रम सुरु केला आहे. या शासन निर्णयात एका तुकडीतील किमान २० विद्यार्थयांनी इतर भाषेचा पर्याय स्वीकारल्यास ती भाषा शिकवली जाईल. असे म्हटले आहे. मात्र प्रत्यक्षात राज्यात २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांची संख्या सहा हजारांच्या घरात आहे. त्यामुळे या सहा हजार शाळांमध्ये हिंदी शिवाय इतर पर्यायी भाषा शिकवली जाणे शक्यच नाही. म्हणजेच मातृभाषेतून शिक्षण या सरकारच्या उपक्रमाला यामुळे हरतालच फसला जाणार आहे.

**लोकरंग**

# 3,500 कोटींचे शेअर्स फक्त 1.2 कोटींना घेतले
## माजी केंद्रीय मंत्री दयानिधी मारन यांचा मोठ्या भावावर आरोप

**चेन्नई, दि. २० वृत्तसंस्था**

भारतातील सर्वात मोठ्या टीव्ही चॅनलपैकी एक असलेल्या सन टीव्ही चॅनल नेटवर्कमधील कौटुंबिक वाद समोर आला आहे. कोट्यवधींच्या साम्राज्यासाठी दोन भाऊ एकमेकांसमोर उभे ठाकले आहेत. कोट्यवधींच्या शेअर्सवरून माजी केंद्रीय मंत्री दयानिधी मारन आणि त्यांच्या भावात चांगलाच वाद पेटला आहे. सध्या मारन बंधूच्या कौटुंबिक वादाची चांगलीच चर्चा रंगली आहे.

माजी मंत्री दयानिधी मारन यांनी त्यांचे मोठे बंधू कलानिधी मारन यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. कलानिधी मारन यांनी २००३ मध्ये सन टीव्ही प्रायव्हेट लिमिटेडचे १२ लाख शेअर्स फक्त १.२ कोटी रुपयांना खरेदी केले असून तेव्हा त्या शेअर्सची वास्तविक किंमत सुमारे ३,५०० कोटी रुपयांच्या घरात होती, असा आरोप दयानिधी मारन यांनी केला आहे. त्यांच्या या आरोपामुळे एकच खळबळ उडाली आहे.



या संदर्भात दयानिधी मारन यांनी कायदेशीर नोटीसमध्ये आरोप केला की कलानिधी मारन यांनी योग्य मूल्यांकन आणि इतर भागधारकांची संमती किंवा कोणत्याही योग्य मोबदल्याशिवाय हा प्रकार केला आहे. त्यामुळे ते बेकायदेशीरपणे भागधारक बनलेले आहेत. नियमानुसार १५ सप्टेंबर २००३ पर्यंत कलानिधी यांचा कंपनीत एकही हिस्सा नव्हता. पण त्याच वर्षी सप्टेंबरमध्ये त्यांचे काका मुरासोली मारन यांच्या गंभीर आजारादरम्यान कलानिधी यांनी मूळ प्रवर्तकांच्या होल्डिंग्जमध्ये घट करून प्रत्येकी १० रुपयांच्या दर्शनी मूल्यावर स्वतःला शेअर्स वाटप केले, असा आरोप नोटीसमध्ये करण्यात आला आहे.

दरम्यान, माजी केंद्रीय मंत्री दयानिधी मारन यांचा असा दावा आहे की हे कृत्य फसवं असून नियमांचं उल्लंघन आहे. नोटीसमध्ये असंही म्हटलं की, २३ नोव्हेंबर २००३ रोजी मुरासोली मारन यांच्या मृत्यूनंतर फक्त तीन दिवसांनी त्यांचा मृत्यू प्रमाणपत्र जारी होण्यापूर्वीच समूह कंपन्यांकडून शेअर्स हस्तांतरित करण्यात आले होते. २६ नोव्हेंबर २००३ रोजी कोणत्याही पक्षाला कोणतेही वैध मृत्यू प्रमाणपत्र किंवा कायदेशीर वारसा प्रमाणपत्र उपलब्ध असू शकत नाही, असं दयानिधी मारन यांचं म्हणणं आहे. त्यामुळे ते हस्तांतरणच फसवं असल्याचं दयानिधी मारन म्हटलं आहे. या बरोबरच दयानिधी यांनी कलानिधी यांच्यावर असाही आरोप केला आहे की सन टीव्हीच्या स्वतःच्या निधीचा वापर करून दयालू अम्मल यांच्याकडून १०० कोटी रुपयांचे शेअर्स खरेदी करण्याचा देखील समावेश आहे.

# मिल्टेनी बायोटेक आणि बीआयआरएसीत जीन थेरपी परिसंस्थेकरिता सामंजस्य करार



भारताच्या अत्याधुनिक बायोथेरप्यूटिक्समधील नेतृत्वाला बळकट करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, मिल्टेनी बायोटेक इंडिया प्रायव्हेट लिमिटेड आणि बायोटेक्नॉलॉजी इंडस्ट्री रिसर्च असिस्टन्स कौन्सिल यांनी BIO इंटरनॅशनल कन्व्हेन्शन 2025 दरम्यान एक धोरणात्मक समजुतीचा करारावर स्वाक्षरी केली. ही परिषद याच आठवड्यात बॉस्टनमध्ये सुरू झाली आहे. या LOI मध्ये बहुआयामी सहकार्याची रूपरेषा मांडण्यात आली आहे, ज्याचा उद्देश भारताच्या सेल आणि जीन थेरपी क्षमतेला पुढे नेणे हा आहे. या सहकार्याच्या माध्यमातून क्षमता निर्माण, क्लिनिकल संशोधनाला चालना देणे आणि स्थानिक पातळीवर सेल थेरपीजचे उत्पादन करून अपूर्ण वैद्यकीय गरजांवर उपाय शोधणे यावर भर दिला जाणार आहे.या ऐतिहासिक कार्यक्रमाचा एक भाग म्हणून, मिल्टेनी बायोटेक इंडिया यांना BIRAC आणि जैवतंत्रज्ञान विभाग यांच्या वरिष्ठ प्रतिनिधींसह इंडिया पॅव्हिलियनचे उद्घाटन करण्याचा सन्मान मिळाला. यामध्ये औपचारिक फित कापण्याचा सोहळा देखील पार पडला, जो भारतातील जैवतंत्रज्ञान नवोपक्रमातील जागतिक स्तरावर वाढत्या उपस्थितीचे अभिमानास्पद क्षण ठरला. या भागीदारीद्वारे, मिल्टेनी बायोटेक आणि BIRAC यांचे उद्दिष्ट CGT उत्पादन, विश्लेषण आणि गुणवत्ता नियंत्रण या क्षेत्रांमध्ये डॉक्टर, संशोधक आणि तंत्रज्ञ यांच्यासाठी संरचित प्रशिक्षण आणि क्षमता-विकास कार्यक्रम राबवून राष्ट्रीय क्षमता निर्माण करणे आणि वैज्ञानिक कौशल्ये विकसित करणे.भारतामध्ये अपूर्ण वैद्यकीय गरजांवर उपाय शोधण्यासाठी, विशेषतः कर्करोग, स्वयंप्रतिरक्षात्मक आजार आणि दुर्मिळ आजारांमध्ये, पुढील पिढीच्या उपचारांवर लक्ष केंद्रित करून शैक्षणिक संस्था आणि मल्टी-सेंटर अभ्यासांचे सह-विकास माध्यमातून ट्रान्सलेशनल रिसर्च उपक्रम विस्तारणे,मिल्टेनीचे क्लिनीएमएसीएस प्रॉडिजी सारखे स्वयंचलित उत्पादन प्लॅटफॉर्म वापरून भारतभर पॉइंट-ऑफ-केअर CAR-T केंद्रे स्थापन करणे, जेणेकरून वैयक्तिकृत CGT उपचार अधिक किफायतशीर आणि मोठ्या प्रमाणावर सहज उपलब्ध होतील हे आहे.

**नोंद**

# किल्ले जयपूर



जयपूर शहर, गुलाबी शहर म्हणून प्रसिद्ध, राजस्थानची राजधानी आहे आणि विविध आकर्षणांसाठी ओळखले जाते. जयपूरच्या दोलायमान शहरामध्ये शाही भव्यता आणि वास्तुशास्त्रीय भव्यतेपासून ते स्ट्रीट फूड आणि रंगीबेरंगी बाजारपेठांपर्यंत अनेक गोष्टी आहेत. जयगड किल्ला हा जयपूरकडे दुर्लक्ष करणारा सर्वात प्रेक्षणीय किल्ला आहे. जगातील सर्वात मोठी तोफ मानल्या जाणाऱ्या जैवना तोफेसाठी ती प्रसिद्ध आहे. जयगड किल्ला १७२६ मध्ये सवाई जयसिंग II ने आमेर किल्ल्याच्या संरक्षणासाठी बांधला होता. त्याच्या बिल्डरच्या नावावर, ते म्हणून देखील ओळखले जाते विजयाचा किल्ला कारण तो कधीही जिंकलेला नाही. जयगड हे काटेरी झुडपांनी आच्छादलेल्या टेकड्यांमध्ये उभे आहे आणि मुख्य गेट, डुंगर दरवाजापर्यंत जाणारे खडे रस्ते. हा किल्ला अरवली पर्वत रांगेत चील का तीला (ईगलच्या टेकडी) वर स्थित आहे, माओठा तलाव आणि आमेर किल्ला दिसतो. दिवा बुर्ज, मध्ययुगीन काळातील एक रचना आणि 'चील का तीला' नावाचा टेहळणी बुरूज हे लोकप्रिय पर्यटन आकर्षणे आहेत जे तुम्हाला संपूर्ण शहराचे विलोभनीय दृश्य देतात.

**चला पर्यटनाला**

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# इराणने इस्रायलवर डागली क्लस्टर बॉम्ब असलेली क्षेपणास्त्रे

**तेल अविव, दि. २० वृत्तसंस्था**

इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्षाचा आठवा दिवस आहे. यादरम्यान शुक्रवारी दोन्ही देशांनी एकमेकांवर क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ले सुरूच ठेवले आहेत. इस्रायलने इराणच्या अणु पायाभूत सुविधांना लक्ष्य केले, तर तेहरानने इस्रायलवर ‘क्लस्टर म्युनिशन्स’ असलेली क्षेपणास्त्र डगली आहेत, ज्यामध्ये एका रुग्णालयाचे मोठे नुकसान झाले आहे. दोन्ही देशांमध्ये सुरू असलेल्या संघर्षात या प्रकारचे शस्त्र पहिल्यांदाच वापरण्यात आले आहे. यामुळे दोन्ही देशांमधील संघर्ष शिगेला पोहचला असून तो कमी होण्याची किंवा राजनैतिक मार्गाने तोडगा काढला जाण्याची चिन्हे सध्यातरी दिसत नाहीत.



यादरम्यान इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी इराणच्या नेतृत्वाला या रुग्णालयावरील हल्ल्याची पूर्ण किंमत चुकवावी लागेल असा इशारा दिला आहे. तसेच त्यांनी इराणविरोधातील लष्करी मोहिमेत इस्रायल वेळापत्रकात अपेक्षेपेक्षा पुढे असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

यातच व्हाईट हाऊसकडून अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे दोन आठवड्यांमध्ये इस्रायलला लष्करी पाठिंबा द्यायचा की नाही याबद्दल निर्णय घेतील असे सांगण्यात आले आहे. यामुळे या संघर्षाची व्याप्ती वाढण्याची शक्यता आहे.

यापूर्वी व्हाईट हाऊसने अयातुल्ला अली खोमेनी यांनी परवानगी दिल्यानंतर इराण निश्चितपणे दोन आठवड्यांत अण्वस्त्र तयार करू शकेल, असे म्हटले होते. या सर्व घडामोडींदरम्यान दुसरीकडे ट्रम्प यांचे विशेष दूत स्टीव्ह विटकॉफ यांनी इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराक्ची यांच्याशी फोनवरू अनेकवेळा चर्चा केल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान सध्या इस्रायल आणि इराणमधील संघर्षाची तीव्रता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. इराणने डागलेल्या क्षेपणास्त्रात इस्रायलच्या दक्षिण भागातील मुख्य रुग्णालय उद्ध्वस्त झाले. तसेच, इतर काही क्षेपणास्त्रांनी इस्रायलमधील उंच इमारती आणि इतर नागरी भागांना लक्ष्य केले आहे. यात इस्रायलमधील ४० जण जखमी झाले. या हल्ल्यांनंतर इराणचे सर्वोच्च नेते आयातुल्ला अली खामेनी यांचे अस्तित्वही उरणार नाही, असा इशारा इस्रायलचे संरक्षणमंत्री इस्रायल कॅट्झ यांनी दिला. दरम्यान, संघर्षाच्या सातव्या इस्रायलनेही इराणच्या अरक या घन जल अणुभट्टीला लक्ष्य केले.

### क्लस्टर बॉम्ब काय असतो?

क्लस्टर बॉम्ब एक वेगळ्या प्रकारचे शस्त्र आहे, ज्यामध्ये एक मोठा बॉम्ब असतो ज्याचा लक्ष्याच्या जवळ पोहचल्यानंतर हवेत स्फोट होतो आणि त्यामधून शेकडो लहान-लहान बॉम्ब बाहेर पडतात. याला बॉम्बलेट्स (Bomblets) म्हटले जाते. हे बाहेर पडून मोठी जागा व्यापतात.

विमानातून किंवा क्षेपणास्त्राच्या मदतीने हे बॉम्ब डागले जातात. लक्ष्यावर पोहचल्यानंतर बॉम्ब हवेत उघडतो आणि शेकडो बॉम्बलेट्स बाहेर पडतात. हे बॉम्बलेट्स जमीनीवर पडतात आणि यांचा लगेचच स्फोट होतो किंवा फ्यूजनुसार नंतर स्फोट होतो.

या बॉम्बलेट्सची निर्मिती अशी केली जातो की यांच्यामुळे मोठ्या भागात पसरलेल्या लष्कराच्या वाहनांचे, सैनिकांचे किंवा इतर कोणत्याही लक्ष्याचे जास्तीत जास्त नुकसान होईल. याचे प्रभावक्षेत्र अने फूटबॉल मैदानांपेक्षा अधिक असू शकते

महासागर NASHIK
Printed by S R PUBLICATION, Published by Shrikrishna Tansukhdas Chandak on behalf of Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at GODOWN NO. 8, 9, 10, Mohan Arjun Compound, Near Ghartan Pada, Vaishali Nagar, Last Bus Stop, Dahisar (East), Mumbai Suburban, Maharashtra - 400068 and published at Plot No. 5, Anandi Bungalow, Kotwal Park, Tilakwadi, Dhamankar Corner, Nashik, Maharashtra - 422002.
**Editor: Shrikrishna Tansukhdas Chandak. Resident Editor- Jayant Mahajan. PRGI Registration No.MHMAR/25/A0219**

महासागर नाशिक
मुद्रक एस. आर. पब्लिकेशन, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, यांच्या वतीने श्रीकृष्ण तनसुखदास चांडक द्वारे प्रकाशित. मुद्रण स्थळ – गोडाऊन क्र. ८, ९, १०, मोहन अर्जुन कंपाउंड, घर्तन पाडा जवळ, वैशाली नगर, शेवटचा बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई उपनगर, महाराष्ट्र – ४०००६८. प्रकाशन स्थळ – प्लॉट क्र. ५, आनंदी बंगलो, कोतवाल पार्क, टिळकवाडी, धमणकर कॉर्नर, नाशिक, महाराष्ट्र – ४२२००२. **संपादक: श्रीकृष्ण तनसुखदास चांडक. निवासी संपादक – जयंत महाजन.** **PRGI नोंदणी क्रमांक: MHMAR/25/A0219**